रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक २५९ । पृष्ठे ८ ▌RGD/016/2026-28 www.krushival.in

## राजधानी हादरली

**नवी दिल्ली :** देशाची राजधानी दिल्लीत एका व्यक्तीने आपल्या पत्नी आणि तीन अल्पवयीन मुलींची निर्घृण हत्या केली. आरोपी पतीने धारदार शस्त्राने त्यांचा गळा चिरला. यानंतर तो घटनास्थळावरून पळून गेला. पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत. सर्वोदय विद्यालयाजवळील चंदन पार्कमध्ये तीन मुली आणि एका महिलेसह चार जणांचा गळा चिरून खून करण्यात आल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचले आणि त्यांना एका खोलीत तीन मुली आणि एका महिलेचे मृतदेह आढळले.


# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. २६ फेब्रुवारी २०२६

किंमत ४ ₹



B.com Receptionst
पाहिजे वयाची अट नाही.
अर्जासह समक्ष भेटा.
साई-इन हॉटेल चोंढी,
अलिबाग-रेवस रोड अलिबाग


### तोट्यातील एसटीला महिलांचा आधार; ५० टक्के सवलत ठरली सुपरहिट

# तिजोरीत 45 कोटी




। प्रमोद जाधव ।
। रायगड ।

**परवडणारी आणि सुरक्षीत सेवा देण्यासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने महिलांसाठी तिकीट दरात ५० टक्के सवलत लागू केली. महिला सन्मान योजनेअंतर्गत ही सेवा देण्यात आली आहे. रायगड जिल्ह्यात या योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. जानेवारी ते डिसेंबर २०२५ मध्ये एका वर्षात दोन कोटी दोन लाख २० हजार ६९४ महिलांनी एसटीतून प्रवास केला. यातून एसटीला ४५ कोटी २२ लाख ६० हजार ३३८ रुपयांचे उत्पन्न मिळाले. त्यामुळे एसटीच्या उत्पन्नात जिल्ह्यामध्ये करोडोची भर पडल्याचे आकडेवारीनुसार स्पष्ट झाले आहे.**

पावसाळ्यात एसटीच्या छताला गळती, सतत बंद पडणे, एसटी बस वेळेवर न लागणे अशा अनेक कारणांमुळे एसटीकडे प्रवाशांनी पाठ फिरवली होती. अनेक प्रवासी खासगी वाहनांचा आधार घेत त्यांच्या निश्‍चितस्थळी पोहोचण्याकडे भर देत होते. त्यामुळे एसटीच्या उत्पन्नात घट होण्याचे संकट निर्माण झाले होते. एसटी तोट्यात जाऊ लागली. एसटी बद्दल प्रवाशांना आकर्षण निर्माण व्हावे, एसटीतील प्रवासी टीकून राहवे, यासाठी एसटी महामंडळाने वेगवेगळ्या योजना सुरु केल्या आहेत. या योजनांद्वारे प्रवासी वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचाच एक भाग म्हणजे एसटी महामंडळाने खास महिलांसाठी महिला सन्मान योजना सुरु केली. ही योजना १७ मार्च २०२३ पासून सुरु करण्यात आली. या योजनेअंतर्गत महिलांना तिकीटाच्या निम्म्या दरात प्रवास करण्याची सोय केली. साध्या बसपासून निमआराम, शिवशाही अशा अनेक बसमधून कुठेही प्रवास करताना तिकीट भाड्यात ५० टक्के सुट देण्याची व्यवस्था करण्यात आली. सुरक्षित आणि परवडणारी सेवा देण्याचा उद्देश महामंडळाने सुरु केला.

रायगड जिल्ह्यामध्ये अलिबाग, पेण, कर्जत, महाड, माणगाव, श्रीवर्धन, मुरूड, रोहा असे आठ आगार असून १९ बस स्थानके आहे. पेण तालुक्यातील रामवाडी येथील विभाग नियंत्रक सुनील चौरे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील कारभार चालत आहे. जिल्ह्यातील ४०० हून अधिक एसटी बसेस आहेत.

महिला सन्मान योजनेअंतर्गत जानेवारी ते डिसेंबर २०२५ या १२ महिन्याच्या कालावधीत २ कोटी २ लाख २० हजार ६९४ महिलांनी एसटीतून प्रवास केल्याची माहिती समोर आली आहे. या कालावधीत एसटीला ४५ कोटी २२ लाख ६० हजार ३३८ रुपयांचे उत्पन्न मिळाल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. या योजनेचा एसटीला चांगला फायदा झाल्याचे दिसून आले आहे.

२०२३ पासून सुरु झालेल्या या योजनेला रायगड जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ५० टक्के तिकीट दरातून कुठेही निश्‍चित स्थळी जाण्याचीसंधीएसटीमहामंडळाकडून मिळाली. त्यामुळे शहरी भागासह ग्रामीण भागातील महिलांनी या योजनेचा मोठ्या प्रमाणात लाभ घेतला. नोकरी व्यवसायासह काही कामानिमित्त तालुका जिल्हा व अन्य जिल्ह्याच्या ठिकाणी निम्म्या दरात प्रवास करण्याची संधी मिळाली. वाट पाहीन पण एसटीने जाईन या भूमिकेतून महिलांनी एसटीतून प्रवास करण्यावर भर दिला.

#### ४ लाख प्रवाशांचा विना थांबा प्रवास

वाढत्या वाहनांसह खड्डेमय रस्त्यांमुळे अलिबागहून पनवेलला जाण्यासाठी प्रवाशांना दोन ते अडीच तास लागतो. एसटी सर्वच थांबे घेत असल्याने प्रवाशांना त्यांच्या निश्‍चित स्थळी पोहचता येत नाही. त्यामुळे महामंडळाने विना थांबा सेवा सुरु केली आहे. अलिबाग -पनवेल-अलिबाग ही विना थांबा सेवा गेल्या अनेक वर्षापासून सुरु आहे. शिवशाही या वातानुकूलित बसमधून अवघ्या दीड ते पावणे दोन तासात थेट पनवेलला पोहोचता यावे यासाठी ही सेवा सुरु केली आहे. विना थांबा सेवेसाठी येता जाता प्रत्येकी ३५ फेऱ्या असून यातून एका वर्षात आठ लाख ४५ हजार १८४ प्रवाशांनी विना थांबा प्रवास केल्याची माहिती समोर आली आहे.

#### ज्येष्ठ नागरिकांकडून पसंती

एसटी महामंडळाने ज्येष्ठ नागरिकांसाठी देखील योजना सुरु केली आहे. ६५ ते७४ वयोगटातील ज्येष्ठ नागरिकांसाठी निम्म्या दरात प्रवास करण्याची संधी दिली आहे. या वयोगटातील १७ लाख ६९ हजार ६१९ ज्येष्ठ नागरिकांनी प्रवास केला आहे. यातून एसटीला चार कोटी २६ लाख ४६ हजार ४६० रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. तसेच ७५ व त्यापेक्षा अधिक वय असलेल्या ज्येष्ठ नागरिकांसाठी अमृत ज्येष्ठ नागरिक योजना सुरु केली. ही मोफत व अमर्यादीत प्रवासाची सुविधा सुरु केली. या योजनेचा २४ लाख ३० हजार २५१ ज्येष्ठ नागरिकांनी लाभ घेतला. यातून एसटीच्या उत्पन्नात १२ कोटी चार लाख ४५ हजार २१६ची वाढ झाली असल्याची माहिती विभाग नियंत्रक कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

## कर्मचाऱ्यांच्या लढ्याला शेकापचा पाठिंबा

### चित्रलेखा पाटील यांनी घेतली आंदोलनकर्त्यांची भेट



। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

जुनी पेन्शन लागू करा, चौथ्या वेतन आयोगापासून वेतन श्रेणीत असलेली तफावत दूर करून सुधारित वेतन श्रेणी लागू झाली पाहिजे अशा अनेक मागण्यांसाठी जय महाराष्ट्र शासकीय, निमशासकीय अधिकारी व कर्मचारी संघटनेच्या वतीने आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनाला शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने पाठिंबा देण्यात आला आहे. शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी बुधवारी (दि.२५) आंदोलनकर्त्यांची भेट घेऊन त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. न्याय मिळवून देण्यासाठी शेवटपर्यंत सोबत राहू, असे आश्‍वासनही चित्रलेखा पाटील यांनी दिले.

जिल्हा परिषदेमधील लिपिक व लेखा संवर्गातील कर्मचारी अनेक वर्षांपासून प्रामाणिकपणे आणि जबाबदारीने सेवा बजावत आहेत. चौथा वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी लागू करणे, जुनी पेन्शन योजना लागू करणे, तसेच पदोन्नतीतील अडचणी दूर करणे या त्यांच्या मागण्या पूर्णपणे रास्त आणि न्याय्य आहेत. शासनाने कर्मचाऱ्यांच्या भावना आणि हक्क यांचा आदर करून या मागण्यांवर तातडीने सकारात्मक पान २ वर

## जरांगेंनी पुन्हा दंड थोपटले

। गडचिरोली । प्रतिनिधी ।

गोरगरीब मराठ्यांच्या अस्तित्वाशी खेळण्याचं काम सरकार करत आहे. पुढच्या काळात सरकारने हे करू नये. नाहीतर मला नाईलाजाने जून महिन्यात पुन्हा एकदा उपोषणाला बसावं लागेल असा इशारा मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. जून महिन्यात विद्यार्थ्यांचे ॲडमिशन सुरू होतात, त्यांचे ॲडमिशन जर रद्द झाले तर मी ऐकणार नाही, एकाही मंत्र्याचं ऐकूनही घेणार नाही. हे राधाकृष्ण विखे यांनी लक्षात घ्यावं असंही जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

मनोज जरांगे पाटलांनी म्हटले की, सरकारने देऊन द्यायचं तर हे आधीच करायला पाहिजे होतं, इतक्या दिवस पान २ वर

## मतदारांपर्यंत पोहोचणाऱ्या 'आशा' दुर्लक्षित

### भत्ता देण्यास जिल्हा प्रशासन उदासीन

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

जिल्हा परिषदेसह पंचायत समितीची निवडणूक नुकतीच झाली. या निवडणुकीत मतदारांपर्यंत पोहचून त्यांना मतदान करण्यासाठी प्रवृत्त करणाऱ्या तसेच मतदानाच्या वेळी मतदारांच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या आशा मात्र दुर्लक्षित असल्याचे समोर आले आहे. मतदारांना मतदान करण्यासाठी मतदार स्लीप वाटण्याचे काम करणाऱ्या आशा सेविकांना अद्याप भत्ता देण्यात आलेला नाही. सरकारने त्यांच्याकडून मोफत काम करून घेतल्याची चर्चा सध्या सर्वत्र सुरु आहे.

रायगड जिल्हा परिषदेच्या ५९ व पंचायत समितीच्या ११८ जागांसाठी निवडणुकीची लढत झाली. जिल्ह्यात ५०२ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात उभे होते. त्यात जिल्हा परिषदेचे १७३ व पंचायत समितीचे ३२९ उमेदवार होते.

७ फेब्रुवारीला मतदान झाले. त्या निमित्ताने मतदारांपर्यंत शासकीय पध्दतीने मतदार स्लीप वाटप करण्याचे काम आशा सेविकांकडे सोपविण्यात आले. आशा सेविकांनी घरोघरी जाऊन १७ लाख मतदारांपर्यंत पोहचून त्या मतदार स्लीप वाटप करण्याचे काम केले. जिल्ह्यात २ हजार ३२३ मतदान केंद्र होते. पान २ वर

## भरतीला आलेल्या तरुणाचा मृत्यू

**मुंबई :** पोलीस बनायचे स्वप्न घेऊन मुंबईत आलेल्या बुलढाण्याच्या तरुणावर काळाने घाला घातला. मैदानी झाल्यानंतर आराम करत असताना त्याची दातखिळी बसली. इस्पितळात नेले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. अक्षय म्हसाळ असे त्या तरुणाचे नाव होते. सोमवारी सकाळी रेल्वेच्या घाटकोपर येथील मैदानात त्याची मैदानी चाचणी झाली. त्यानंतर मैदानापासून जवळ असलेल्या एका मंदिरात तो मित्रासोबत आराम करत होता. पावणेतीन वाजण्याच्या सुमारास अक्षयची दातखिळी बसली. त्यामुळे त्याला तत्काळ राजावाडी इस्पितळात नेण्यात आले, परंतु तोपर्यंत उशीर झाला होता. डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

## रायगडात केंद्रप्रमुख पदासाठी चुरस

### जिल्ह्यात ११४ पदे उपलब्ध, शिक्षकांचे परीक्षेच्या निकालाकडे लक्ष

। रायगड । प्रतिनिधी ।

राज्यातील केंद्र शाळांतील केंद्रप्रमुख अर्थात समूह साधन समन्वयक पदासाठी चुरस होणार आहे. एका पदासाठी पंधरा शिक्षक असून, परीक्षा दिलेल्या शिक्षकांचे निकालाकडे लक्ष लागले आहे. दरम्यान, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल मार्चच्या पहिल्या आठवड्यात जाहीर होण्याची शक्यता आहे.

राज्यातील समूह साधन केंद्रातील (केंद्रशाळा) समूह साधन केंद्र समन्वयकांच्या (केंद्रप्रमुख) २ हजार ४१० पदांसाठी राज्य परीक्षा परिषदेतर्फे समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्र प्रमुख) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा घेण्यात आली. परीक्षा परिषदेने २०२३ मध्येही केंद्रप्रमुख पदासाठी ही परीक्षा आयोजित केली होती. त्यावेळीही शिक्षक उमेदवारांनी अर्ज भरून नोंदणी केली होती. मात्र, तांत्रिक कारणास्तव त्यावेळीही परीक्षा होऊ शकली नव्हती. त्यानंतर पुन्हा एकदा नोव्हेंबरमध्ये परीक्षेसाठी नोंदणी प्रक्रिया राबवून ३ आणि ४ फेब्रुवारी रोजी ही परीक्षा घेण्यात आली. २ हजार ४१० पदांपैकी पुणे जिल्ह्यात १५१, नाशिक जिल्ह्यात १२२, रत्नागिरी जिल्ह्यात १२५, अहिल्यानगर जिल्ह्यात १२३, रायगड जिल्ह्यात ११४ पदे उपलब्ध आहेत. त्याशिवाय अन्य जिल्ह्यांमध्येही पदे उपलब्ध आहेत. त्यामुळे राज्यभरातील शिक्षकांचे या परीक्षेकडे लक्ष लागले होते.

परीक्षा परिषदेने दिलेल्या माहितीनुसार, एकूण ४६ हजार ६८ शिक्षकांनी या परीक्षेसाठी नोंदणी केली होती. दोन सत्रांत झालेली ही परीक्षा ३८ हजार ५५९ शिक्षकांनी दिली. तर ७ हजार ५०९ शिक्षक अनुपस्थित राहिले. मात्र, या परीक्षेसाठी मोठ्या प्रमाणात नोंदणी झाल्यामुळे निवडीसाठी चुरस होणार असल्याचे दिसून येत आहे. साधारणपणे १५ उमेदवारांतून एका उमेदवाराची या पदासाठी निवड होणार असल्याचे चित्र आहे. समूह साधन केंद्र समन्वयक पदासाठी घेण्यात आलेल्या परीक्षेच्या निकालाची पान २ वर

## सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ

**नवी दिल्ली :** शासकीय कर्मचारी तसेच पात्र कर्मचाऱ्यांना मोठी खुशखबर मिळालेली आहे. सरकारने महागाई भत्त्यात तीन टक्क्यांची वाढ केली आहे. या निर्णयानुसार आता महागाई भत्ता ५५ टक्क्यांवरून ५८ टक्के करण्यात येणार आहे. वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी निवेदन सादर केले आहे. महागाई भात्यातील ही वाढ जुलै २०२५ पासून लागू होणार आहे. जुलै २०२५ ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीतील थकबाकीची रक्कम मार्च २०२६ मध्ये अदा करण्यात येईल. नोव्हेंबर २०२५ ते जानेवारी २०२६ या कालावधीतील थकबाकीबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येणार आहे.

## सरकारविरोधात मजदूर संघ एकवटला



- जिल्हाधिकारी कार्यालयासमोर केली निदर्शने
- अलिबागमध्ये सरकार जगाव आंदोलन

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

बांधकाम कामगारांची बोगस नोंदणी रद्द करा, आशा, अंगणवाडी सेविकांना कर्मचारी म्हणून घोषित करा, अशा अनेक मागण्यांसाठी जिल्ह्यातील मजदूर संघ रस्त्यावर उतरला. सरकारच्या कामगार विरोधी धोरणाविरोधात भारतीय मजदूर संघ रायगड जिल्ह्याच्या वतीने सरकार जगाव आंदोलन करण्यात आले. अलिबागमधील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने बुधवारी (दि.२५) करण्यात आली.

यावेळी अध्यक्ष संदीप मगर, कार्याध्यक्ष सुरेश पाटील, सचिव अशोक निकम, संघटनमंत्री डी. पी. सोनावणे, कोषाध्यक्ष अवधुत नाईक, संदीप खंडागळे, किरण पाटील, अरुण घाग आदी पदाधिकारी व संघटनेचे सदस्य उपस्थित होते.

घरेलु कामगार मंडळ पुनर्गठित करून बंद योजना सुरु करा. बांधकाम कामगार मंडळातील बोगस नोंदणी रद्द करून मंडळाच्या योजनांचे लाभ पान २ वर

## महामार्गावर अपघात; १ ठार, १ जखमी

**गडब :** पेण तालुक्यातील वडखळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत मुंबई-गोवा महामार्गावर जेएसडब्ल्यू कंपनीच्या गेटसमोरील ब्रिजवर पेणकडुन नागोठणेकडे जाणाऱ्या मोटारसायकलला पाठीमागुन येणाऱ्या सिमेंट मिक्सर टँकरने धडक दिली. यामध्ये मोटार सायकलस्वार महेश बालकृष्ण जाधव (रा.पन्हाळघर, माणगाव) यांचा जागीच मृत्यू झाला तर सुजाता महेश जाधव या गंभीर जखमी झाल्या. या अपघाताची नोंद वडखळ पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास वडखळ पोलीस करीत आहेत.

### रणजित हिर्लेकर व संदीप परब यांचे महत्त्वपूर्ण संशोधन | ऐतिहासिक पुराव्यांसह शोधनिबंध प्रसिद्ध

## अमात्य नारोपंत नीलकंठ यांची समाधी प्रकाशात

। पाली /बेणसे । प्रतिनिधी ।

छत्रपती शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळातील महत्त्वाचे पद भूषवणारे अमात्य नारोपंत नीलकंठ यांच्या देवगड तालुक्यातील कुणकेश्‍वर येथील समाधी वृंदावनाचा ऐतिहासिक उलगडा झाला आहे. या महत्त्वपूर्ण शोधावर आधारित शोधनिबंध कोकण इतिहास पत्रिकामध्ये प्रसिद्ध झाला आहे.

याचे प्रकाशन संत गोन्सालो गार्सिया कला व वाणिज्य महाविद्यालय, वसई येथे नुकतेच करण्यात आले. इतिहास संशोधक रणजित हिर्लेकर आणि सुधागड तालुक्यातील संदीप परब यांनी संयुक्तपणे हा सखोल अभ्यास पूर्ण




केला आहे. कोकणच्या विशेषतः मराठा कालखंडातील इतिहासाच्या दृष्टीने हा शोध अत्यंत मोलाचा मानला जात आहे.

या शोधनिबंधासाठी संशोधकांनी केवळ मौखिक परंपरांवर अवलंबून न राहता, भक्कम ऐतिहासिक पुराव्यांची मांडणी केली आहे. यामध्ये ऐतिहासिक कागदपत्रे, उपलब्ध पत्राचार आणि समकालीन दप्तरांचा चिकित्सक अभ्यास. महसुली नोंदी सन १८७४ मधील वृंदावन नोंदी आणि ७/१२ उतारे यांचा आधार घेण्यात आला आहे. नकाशांच्या आधारे नोरोपंत अमात्य यांची समाधी कुणकेश्‍वर मंदिरालगत असल्याचे सिद्ध झाले आहे. विशेष म्हणजे या परिसराशी आणि कुणकेश्‍वर देवालयाशी अमात्यांच्या वंशजांचा असलेला दीर्घकालीन संबंध या संशोधनातून अधोरेखित झाला आहे. हा शोधनिबंध इतिहासप्रेमी, संशोधक आणि अभ्यासकांसाठी एक महत्त्वपूर्ण संदर्भ ग्रंथ ठरेल, असा विश्‍वास व्यक्त केला जात आहे.

#### प्रशासकीय वारसा व पाच छत्रपतींसोबत काम

नारोपंत नीलकंठ अमात्य हे स्वराज्याच्या इतिहासातील एक अत्यंत विश्‍वासू आणि कर्तबगार नाव. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्यापासून ते छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज, महाराणी ताराराणी, छत्रपती शाहू महाराज आणि कोल्हापूरकर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्यकाळापर्यंत अत्यंत सक्रिय आणि निकटवर्तीय प्रशासक म्हणून जबाबदारी सांभाळली.

#### इतिहासाला नवी दिशा

नारोपंत नीलकंठ यांनी स्वराज्याच्या प्रशासनात अमात्य म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली होती. मात्र, त्यांच्या समाधी स्थानाबाबत अनेक वर्षे अनभिज्ञता होती. हिर्लेकर आणि परब यांच्या या प्रयत्नांमुळे आता कुणकेश्‍वर येथील त्या वृंदावनाला ऐतिहासिक ओळख प्राप्त झाली आहे. या निष्कर्षांमुळे कोकणातील मराठा इतिहासाच्या अभ्यासाला एक नवे परिमाण मिळाले असून, पर्यटनाच्या दृष्टीनेही या स्थानाचे महत्त्व वाढणार आहे.

## शिंदे गटाची अध्यक्षपदासाठी केविलवाणी धडपड

। रायगड । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा परिषदेची निवडणूक एकहाती जिंकून सत्ता मिळवू अशा अविर्भावात असणाऱ्या रायगड जिल्ह्यातील शिवसेना शिंदे गटाच्या आमदारांना अर्थपूर्ण राजकारण करूनही मॅजिक फिगर गाठता आली नाही. असे असले तरी शिंदे गटाचे आमदार अजूनही रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद आमच्याकडेच येणार अशा वल्गना करीत आहेत. अध्यक्षपदासाठी आवश्यक असणाऱ्या संख्याबळापर्यंत पोहचणे अशक्यप्राय असतानाही रायगड जिल्ह्यातील शिंदे गटाच्या आमदारांनी केविलवाणी धडपड सुरु ठेवली आहे.

जिल्हा परिषद निवडणुकीपूर्वी शिंदे गटाने भाजप राष्ट्रवादीबरोबर युती न करता एकला चलोची भूमिका घेतली होती. या निवडणुकीत आम्ही एक हाती सत्ता घेऊ, युतीची गरज नाही अशा वल्गना देखील शिंदे गटाच्या नेत्यांनी केल्या होत्या. जिल्हा परिषदेचे निकाल लागल्यानंतर भाजप राष्ट्रवादीने निवडणुकीपूर्वीची युती सत्तेसाठी कायम ठेवली आणि शिंदे गटाला बाजूला सारले. आता सत्तेच्या हव्यासापोटी शिंदे गटाच्या आमदारांनी भाजप आणि राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेत्यांकडे पायघड्या घालण्यास सुरुवात केली आहे. यापूर्वी शिंदे गटाच्या आमदारांनी मुख्यमंत्र्यांचा दरवाजा ठोठावला होता. आता या तिन्ही आमदारांनी सत्तेत पान २ वर

कृषीवल | रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028



## वैद्यकीय अधिक्षक आणि मुख्याधिकारी यांच्या विरोधात

# साखळी उपोषण सुरु

| कर्जत | प्रतिनिधी |

कर्जत उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक आणि कर्जत नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्या मनमानी कारभारा विरोधात पोलीस मित्र संघटना प्रदेश उपाध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते रमेश कदम यांनी साखळी उपोषण सुरु केले आहे.



कर्जत मधील लोकमान्य टिळक चौकात रमेश कदम उपोषणाला बसले असून त्यांनी उप जिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. विजय मस्कर आणि नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तानाजी चव्हाण हे प्रशासक असताना केलेल्या मनमानी कारभारा विरोधात हे उपोषण सुरु केले आहे. डॉ. मस्कर हे रुग्णांना अपमानास्पद वागणूक देतात. तसेच रुग्णांना औषधे उपलब्ध नसल्याचे कारण सांगून बाहेरून औषधे आणायला सांगतात. ५ फेब्रुवारी २०२६ रोजी एक आदिवासी महिला बेबी वाघमारे रा. गौरकामत हिचे नैसर्गिक बाळंतपण झाले असता. तीला बाहेरील रुग्णालयात पाठवले. तेथे वेळेत उपचार न मिळाल्याने तिचा मृत्यू झाला. याला कोण जबाबदार याची चौकशी व्हावी. अशा अनेक मागण्या त्यांनी केल्या आहेत. डॉ. पाटील यांनी त्रिसदसीय समिती स्थापना करून चौकशी सुरु केली आहे. असे स्पष्ट केले.

मुख्याधिकारी तानाजी चव्हाण यांनी प्रशासकीय काळात केलेल्या कारभाराबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त करून आमराई मधील नाट्यगृहाच्या दयनीय अवस्थेबद्दल संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी. अनधिकृत अतिक्रमण, गृहनिर्माण संस्थेतील पार्किंग जागेवरील अतिक्रमण हटविणे. नगरपरिषदेच्या सर्व स्वच्छता गृहांची स्वच्छता व तेथे पाण्याची व्यवस्था करावी. महिलांसाठी वेगळे स्वच्छतागृह असावीत. बेकायदेशीर फलकांवर कारवाई करावी. आठवडा बाजार चक्राकार पद्धतीने भरवावा अशा अनेक मागण्या आहेत.

कदम सकाळी उपोषणास बसले व लगेचच दुपारी शल्य विशारद डॉ. निशिकांत पाटील उपोषण स्थळी आले. त्यावेळी कदम यांनी डॉ. विजय मस्कर यांची त्वरित बदली करावी. त्यांना रायगड जिल्ह्यात ठेऊ नये. अशी मागणी केली. याप्रसंगी उपगराध्यक्ष संतोष पाटील, नगरसेवक महेंद्र चंदन, प्रशांत पाटील, राजा कोठारी, माजी नगरसेवक मिलिंद चिखलकर, दीनानाथ देशमुख, अतुल कडू, अरुण देशमुख आदी उपस्थित होते. माझे उपोषण नवनिर्वाचित नगराध्यक्ष, उपगराध्यक्ष, नगरसेवक यांच्या विरोधात नाही मुख्याधिकारी तानाजी चव्हाण यांच्या विरोधात आहे. असे कदम यांनी स्पष्ट केले.

## वणव्यात अडकलेल्या अजगराला जीवदान

| खोपोली | प्रतिनिधी |



खोपोली शहरातील लव्हेज गावाजवळील डोंगरपट्ट्यामध्ये भीषण वणवा पेटला होता. वनकर्मचारी आणि स्थानिक आदिवासी जीवाची पर्वा न करता वणवा आटोक्यात आणण्याचे प्रयत्न करत होते.

याच दरम्यान त्यांच्या नजरेस एक हृदयद्रावक दृश्य पडले, तेथे अजगर जातीचा साप धगधगत्या ज्वाळांमधून जीव वाचवण्यासाठी धडपड करत होता. परिस्थितीची गंभीरता ओळखून त्यांनी तात्काळ वनपाल भगवान दळवी यांच्या माध्यमातून हेल्प फाउंडेशनचे गुरुनाथ साठेलकर यांच्याशी संपर्क साधला. क्षणाचाही विलंब न करता गुरुनाथ साठेलकर आणि दिनेश ओसवाल यांनी घटनास्थळी धाव घेत वनपाल भगवान दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे सात ते आठ फूट लांबीच्या अजगराला अत्यंत दक्षतेने सुरक्षित पकडले.

सभोवताली पेटलेल्या वणव्याच्या ज्वाळांमधून मार्ग काढत त्या अजगराला सुरक्षित स्थळी हलविण्यात आले. तज्ज्ञांकडून त्याच्यावर आवश्यक उपचार करून त्याला सुरक्षित वनक्षेत्रात सोडण्यात येणार आहे, अशी माहिती दिनेश ओसवाल यांनी दिली. ही केवळ एका सापाची सुटका नव्हे, तर रानव–तेने निसर्गाशी जोडलेले नाते जपण्याची जिवंत साक्ष आहे.

वनपाल भगवान दळवी यांनी यावेळी भावनिक शब्दांत सांगितले की,वणवे विझवण्यासाठी आमचे प्रयत्न सतत सुरू असतात; मात्र असे वणवे लागूच नयेत यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढे येणे गरजेचे आहे.

## मुंबई–गोवा महामार्गावरील गतिरोधक धोकादायक

| कोलाड | प्रतिनिधी |

मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्ग ६६ वरील पुई स्टॉप जवळ दोन्ही बाजूच्या रस्त्याला गतिरोधक बसविण्यात आले आहेत. हे गतिरोधक वेगाची नशा अपघाताचे कारण ठरत आहेत. या गतिरोधकामुळे आठ दिवसात तीन ते चार अपघात झाले असून येथील अपघात टाळण्यासाठी या ठिकाणी सिग्नल बसविण्यात यावे अन्यथा या गतिरोधकामुळे एखाद्या प्रवाशाचा नाहक बळी गेला तर याला जबाबदार कोण अशी संतप्त प्रतिक्रिया प्रवासी वर्गातून व्यक्त करण्यात येत आहे.



मुंबई–गोवा महामार्गावरील पुई स्टॉपजवळ अपघात टाळण्यासाठी गतिरोधक बांधणे गरजेचे होते. गतिरोधक ही बांधण्यात आले. परंतु रस्त्याला बांधण्यात आलेल्या गतिरोधकाची उंची योग्य असणे आवश्यक होती .तसेच गतिरोधक गोलाकार असावे. त्याची रुंदी ३.६ मीटर व उंची ६ ते ८ इंचपेक्षा जास्त नसावी जेणेकरून वाहने आपटणार नाही याची दक्षता घेण्यात यायला पाहिजे होती. तसेच लांबून दिसण्यासाठी धोक्याची सूचना म्हणून ४० मीटर अगोदर सूचना दिसणारे फलक किंवा सिग्नल लावणे आवश्यक होते. परंतु पुई स्टॉपजवळ रस्त्याला बांधण्यात आलेल्या गतिरोधकाची उंची जास्त असल्यामुळे व गतिरोधक एकमेकांना खेटून बांधण्यात आल्यामुळे या गतिरोधकावरून वाहने जाताना आदलली जात आहेत. यामुळे वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. वाहनचालकांना मणक्याचा त्रास होत आहे.तसेच गतिरोधकाला लावण्यात आलेले पांढरे पट्टे देखील वाहनांच्या घर्षणाने निघून गेले आहेत. शिवाय गतिरोधकाची उंची जास्त असल्यामुळे थोड्या प्रमाणात असणारे पांढरे पट्टे वाहनचालकांना दिसत नाही. वाहन चालकांचा वाहनांवर नियंत्रण ठेवणे कठीण जात असल्याने अपघात वाढले आहेत.

> **कोकणात होळी उत्सवासाठी लाखो चाकरमानी गावाला येत असतात. त्यांचा प्रवास सुखकर व्हावा यासाठी पुई स्टॉपजवळ अपघात टाळण्यासाठी दोन्ही बाजूच्या गतिरोधकाच्या अगोदर सिग्नल बसविने आवश्यक आहे. तसेच रस्त्याला बांधण्यात आलेल्या गतिरोधकांची उंची कमी करून त्यावर पांढरे अथवा पिवळे पट्टे मारण्यात यावे तसेच गतिरोधकाच्या ४० मीटर अगोदर सावधानतेचे फलक लावावे.– दिनकर सानप, सामाजिक कार्यकर्ते, पुई**

## परीटआळी येथे संत गाडगे महाराज जयंती

**तळा** : राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या जयंती निमित्त शहरातील परीट आळीमध्ये विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. यानिमित्ताने परीट आळी येथील संत गाडगे महाराज मंदिरात सत्यनारायणाची महापूजा आयोजित करण्यात आली होती. तसेच चिवे जांभूळपाडा येथील विशाल यादव यांच्या कीर्तनाने उपस्थितांची मने जिंकली. भरत चव्हाण यांच्या भजनाने मंत्रमुग्ध केले. भजन आटोपल्यावर कार्यक्रमाची सांगता झाली.

## मजगाव येथे प्राणप्रतिष्ठा सोहळा

| मुरुड जंजिरा | प्रतिनिधी |

मजगाव गावी श्री विठ्ठल रखुमाई व श्री. संत शिरोमणी गोरोबाकाका मंदिराचा प्राणप्रतिष्ठा सोहळा व विविध कार्यक्रमांनी संपन्न झाला. यावेळी कुंभार समाजातील तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी मंदिरात येऊन दर्शन घेतले.

मजगावमध्ये अठरा पगड जातींबरोबर येथे छोटी कुंभार समाजाची वस्ती आहे. त्यांनी ५० वर्षांपूर्वी बांधलेले विठ्ठल रखुमाई व संत शिरोमणी गोरोबाकाका यांचे सुंदर मंदिर काही वर्षांपासून जीर्ण झाले होते. मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम होत असल्याने मंदिर गावातील प्रमुख धार्मिक केंद्रापैकी एक आहे. त्यामुळे सदर मंदिर जिर्णोद्धार करण्याचे समाज बांधवानी दोन वर्षांपूर्वी ठरवले. विशेष म्हणजे कोणत्याही राजकीय व्यक्ती किंवा धनिकाकडून मंदिरास मदत न घेता समाज बांधवांनी स्व:वर्गणीतून मंदिराचा जिर्णोद्धार केला. प्राणप्रतिष्ठा, मिरवणूक, मारती कोल्हाटकर यांचे कीर्तन, सत्यनारायणाची महापूजा, हळदीकुंकू अशा कार्यक्रमांबरोबरच झालेल्या डबलबारी भजनांच्या जंगी सामन्याने सोहळ्याची सांगता झाली.

**पनवेल महानगरपालिका, पनवेल**
**ई- निविदा सुचना**
**विद्युत विभाग**

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने ई - निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ब - १ नमुन्यातील खालील नमूद कामांची निविदा महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील विद्युत विभागाकडील नोंदणीकृत ठेकेदाराकडुन मागविण्यात येत आहे.

| अ क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय (GST सोडुन) | निविदा अनामत रक्कम (रु) | कोरी ई निविदा किंमत (रु) |
|---|---|---|---|---|---|
| १. | पमपा/ विद्युत/ १२/ २०२५ | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील खारघर रेल्वे स्टेशनला लागून असलेला स्कायवॉक वर पारेषण संलग्न ६३० KWP (On Grid) क्षमतेचा सौर उर्जा संच स्थापित करून कार्यान्वित करणे (द्वितीय वेळ) | रू. ४,५७,६३,७८४ | रू. २,२८,८१९/- | रू. २,३६०/- |

या निविदेबाबतची विस्तृत माहिती पनवेल महानगरपालिका संकेत स्थळ https://mahatenders.gov.in या साईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. याची सर्व संबंधित निविदाधारकांनी नोंद घ्यावी.
जा.क्र./पमपा/विद्युत/२०२५/प्र.क्र.०२/१५०/२०२६
दिनांक- २५/०२/२०२६

Sd/-
**अतिरिक्त आयुक्त** (I)
पनवेल महानगरपालिका

## पान १ वरून

### कर्मचाऱ्यांच्या लढ्याला शेकापचा पाठिंबा

निर्णय घ्यावा. प्रशासनाचा कणा म्हणून काम करणाऱ्या शासकीय आणि निमशासकीय लिपिक कर्मचाऱ्यांना योग्य सन्मान, वेतन आणि सुरक्षा मिळणे ही केवळ त्यांची मागणी नसून तो त्यांचा अधिकार आहे. त्यांच्या न्याय्य लढ्याला संपूर्ण नैतिक पाठिंबा असून शासनाने लवकरात लवकर सकारात्मक तोडगा काढावा अशी मागणी चित्रलेखा पाटील यांनी केली. शांततामय व शिस्तबध्द मार्गाने आंदोलन सुरु आहे. त्यांनी आपली एकजुट कायम ठेवावी, असेही त्यांनी सांगितले.

### मतदारांपर्यंत पोहोचणाऱ्या 'आशा' दुर्लक्षित

या मतदान केंद्रामध्ये आशा सेविकांकडे जबाबदारी सोपविण्यात आली होती. आरोग्य कीटसह मतदानासाठी येणाऱ्या मतदारांच्या आरोग्याची काळजी घेण्याचे काम आशा सेविकांनी केले. सकाळी सात वाजल्यापासून मतदान होईपर्यंत सायंकाळपर्यंत आशा सेविका मतदान केंद्राच्या बाहेर बसून होत्या. शासनाने दिलेली जबाबदारी त्यांनी खंबीरपणे पार पाडली. निवडणूकीत काम केल्यावर अनेकांना निवडणूक भत्ता दिला जातो. मात्र आशा सेविकांना हा भत्ताच दिला नसल्याची माहिती समोर आली आहे. याबाबत जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधला, मात्र तो होऊ शकला नाही.

### जरांगेंनी पुन्हा दंड थोपटले

विनाकारण समाजाचा छळ का करायचा? गोरगरिबांच्या प्रवेशाचा प्रश्न असतो शिक्षणाचा प्रश्न असतो. फडणवीस यांनी मोठ्या मनाने हा जीआर काढला, त्याला शिंदेंचा सुद्धा सपोर्ट आहे मग अडवणूक का करायची? असा सवाल जरांगे पाटील यांनी विचारला.

पुढे बोलताना जरांगे पाटील म्हणाले की, मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष विखे पाटील यांच्यावर समाजाने विश्वास टाकला आहे. विखे पाटलांनी जीआर काढला की मराठवाड्यातला मराठा १००% आरक्षणात जाणार, मग हा जो विश्वास टाकला त्या विश्वासाचा गैरविश्वास विखे यांनी होऊ देऊ नये. ज्यांचे कुणबी प्रमाणपत्र दिले त्यांच्या व्हॅलिडीटी दिल्या जात नाही. स्थानिक चौकशी अहवालानुसार जर चौकशी केली असेल तर कुणबी प्रमाणपत्र द्यायला काय हरकत आहे असा प्रश्नही जरांगे पाटलांनी उपस्थित केला आहे.

### सरकारविरोधात मजदूर संघ एकवटला

पोहोचण्यात यावे. फेरीवाल्यांना व्यवसाय करू द्या. फेरीवाला धोरण जाहीर करण्यात यावे. आशा, अंगणवाडी सेविकांना कर्मचारी म्हणून घोषित करण्यात यावे. त्यांना वेतन आदी लाभ देण्यात यावे. राष्ट्रीय आरोग्य अभियान कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करावे. बंद असलेली इंडिया लेबर कॉन्फरन्स पुन्हा सुरु करण्यात यावी. त्रिपक्षीय समित्यांचे गठण करण्यात यावे. ईएसआय मर्यादीत ४२ हजार करण्यात यावी. सुरक्षा रक्षकांना वेळेवर वेतन देण्यात यावे. सर्व माथाडी कामगारांची मंडळात नोंदणी करण्यात यावी. सामाजिक सुरक्षा देण्यात यावी, अशा अनेक मागण्यांसाठी भारतीय मजदूर संघाच्या वतीने निदर्शने करण्यात आली. शासनाच्या वेगवेगळ्या धोरणाविरोधात नाराजीही व्यक्त करीत घोषणा देण्यात आली.

### शिंदे गटाची अध्यक्षपदासाठी केविलवाणी धडपड

बसण्यासाठी उदय सामंत यांना राष्ट्रवादीचे नेते खा. सुनील तटकरे यांची भेट घेऊन मनधरणी करण्याचा प्रयत्न केल्याची चर्चा रायगड जिल्ह्यात आहे. रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष पदासाठीचे नोटिफिकेशन अद्याप शासनाने जरी केले नाही. आता कोणत्याही क्षणी अध्यक्षपदाची निवडणूक घेण्याचे आदेश निघण्याची शक्यता आहे. रायगड जिल्ह्यात भारतीय जनता पार्टी आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट या दोन पक्षांनी मॅजिक फिगर गाठल्याने या यतीमधील अध्यक्ष शिवतीर्थावर विराजमान होणार हे जवळपास निश्चित झाले आहे.

नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टी १६ आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी १५ असे एकूण ३१ सदस्यांचे मॅजिक संख्याबळ तयार झाले आहे. त्यात या युतीमध्ये उद्धव बाळासाहेब ठाकरे गट ५ आणि काँग्रेस पक्षाचे दोन सदस्यांनी आपला पाठिंबा जाहीर केल्याचे बोलले जात आहे. यामुळे सत्तेत भाजप राष्ट्रवादी युती बसणार यावर शिक्कामोर्तब होणार हे सांगण्यासाठी ज्योतिषाची गरज नसावी. असे अपेक्षित संख्याबळ भाजप राष्ट्रवादीकडे असताना अध्यक्ष आमचाच बसणार असे अति आत्मविश्वासाने शिंदे गटाचे नेते बोलताना दिसत आहेत. प्रत्यक्ष अध्यक्षपदाची निवडणूक होताना गोव्यात असणारे सदस्य फोडण्याची योजना बनविली तरी देखील शिंदे गटाला मॅजिक फिगर गाठता येणे अशक्य असल्याचे चित्र आहे.

कारण भाजप आणि राष्ट्रवादी हे दोन्ही पक्ष निवडणुकीच्या वेळी व्हीप बजावणार यात शंका नाही. उरलेले उद्धव ठाकरे गटाचे पाच आणि काँग्रेसचे दोन सदस्य सभागृहात येऊन शिंदे गटाबरोबर जरी गेले तरी शिंदे गट मॅजिक फिगर गाठणार नाही. कारण शिंदे गटाचे २१ उमेदवार निवडून आले आहेत. या बेरजेमध्ये घोडेबाजार उसळला तरी सत्तेचे गणित सोडविण्यासाठी त्यांना तीन सदस्यांची कमतरता भासणार आहे. कारण त्यावेळी त्यांची बेरीज केवळ २८ होणार आहे. यामुळे सत्तेच्या राजकारणाचे गणित सोडवताना शिंदे गटाच्या आमदारांची दमछाक होणार आहे. एकूणच आमचाच अध्यक्ष बसणार हे शिंदे गटाच्या नेत्यांनी पाहिलेले स्वप्न धूसर बनले आहे.

### रायगडात केंद्रप्रमुख पदासाठी चुरस

प्रक्रिया सुरू आहे. मार्चच्या पहिल्या आठवड्यात निकाल जाहीर करण्याचा प्रयत्न आहे, असे राज्य परीक्षा परिषदेचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार बेडसे यांनी सांगितले. दरम्यान, परीक्षा परिषदेने प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेनुसार, समूह साधन समन्वायक (केंद्रप्रमुख) पदासाठी जिल्हा परिषद शाळांतील कार्यरत शिक्षक पात्र आहेत. परीक्षेसाठी उमेदवार ज्या जिल्हा परिषदेमध्ये कार्यरत असेल, त्याच जिल्ह्यातील निवडीसाठी पात्र राहील. परीक्षेमध्ये १०० गुणांसाठी बुद्धिमत्ता आणि अभियोग्यता, १०० गुणांसाठी शालेय शिक्षणातील नियम, अधिनियम, शैक्षणिक नवविचार प्रवाह असे विषय असतील, असे स्पष्ट करण्यात आले होते.

## रातवड विद्यालयाची यशस्वी भरारी

| माणगाव | प्रतिनिधी |

राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करून विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.

या परीक्षेत विद्यालयातील चार विद्यार्थ्यांनी यश मिळवत शाळेचा नावलौकिक वाढवला आहे. या परीक्षेत आर्या दिगंबर पालकर हिने ९३ गुण,श्रवण प्रमोद शिर्के याने ८७ गुण,दिया प्रमोद साटम हिने ७३ गुण, तर आयुष प्रवीण म्हस्के याने ७२ गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशामुळे विद्यालयात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून भविष्यातही असेच यश संपादन करून विद्यालयाचा लौकिक वाढवावा अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

**PUBLIC NOTICE**

याची नोंद घ्यावी की, आमच्या अशिलांच्या वतीने, आम्ही **कबीर सुरेश सत्यानी** यांच्या यात याखाली लिहिलेल्या परिशिष्टामध्ये अधिक विशेषरित्या वर्णन केलेल्या गाव नंदाईपाडा, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील गट क्र. ५१, क्षेत्रफळ ००एच–२०आर–७०पी शेतकी जमीन वारसा आणि जमिनीची स्थिती तसेच गट क्र. ४१/१ असलेल्या जमिनीवरील ९ मीटर रुंदीच्या संदर्भात, येथे लिहिलेल्या अनुसूचीमध्ये (यात यानंतर '**सदर जमीन**' असा उल्लेख करण्यात आलेला आहे) संबंधातील हक्क विलेखांची चौकशी करीत आहोत.

सदर जमिनीच्या किंवा त्यातील कोणत्याही भागाच्या संबंधातील विक्री, हस्तांतरण, अदलाबदल, अभिहस्तांकन, गहाण, आकार, बक्षीस, न्यास, एकाधिकार, वारसा, भोगवटा, कब्जा, भाडेदारी, पोट–भाडेदारी, संमती नि परवानगी, अनुज्ञप्ती, काळजीवाहू तत्वावरील, भाडेपट्टा, पोट–भाडेपट्टा, धारणाधिकार, परीरक्षा, सुविधाधिकार, प्रसंविदा, अधित्याग, अधित्यजन, अनुदान किंवा अन्य कोणत्याही पद्धतीने कोणताही करार, विलेख, दस्तऐवज, लिखिते, अभिहस्तांतरण विलेख, मृत्युपत्र, मृत्युपत्रीत देणगी, उत्तराधिकार, कुटुंब व्यवस्था/ तडजोड, सामंजस्य ज्ञापन, विवाद, कोणत्याही न्यायालयाचा हुकुमनामा किंवा न्यायालयीन आदेश, करार/ करारनामे किंवा भार किंवा अन्य काही असेल तर त्याद्वारे कोणताही शेअर, अधिकार, हक्क, लाभ, हितसंबंध, दावा, आक्षेप आणि/ किंवा मागणी करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने निम्नस्वाक्षरीकर्त्यांना अशा दाव्याच्या या सूचनेच्या जाहिरातीच्या तारखेपासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत पाठींबा देणाऱ्या सर्व नोटरी केलेल्या दस्तऐवजासह लेखी स्वरुपात ज्ञात होण्यासाठी कळवावे, अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे. अन्यथा अशा व्यक्तींचा दावा, मागणी, अधिकार, हक्क, हितसंबंध, विवाद किंवा आक्षेप, जर काही असेल तर त्यांचा अधित्याग/परित्याग करण्यात आलेला आहे, असे समजण्यात येईल आणि ते आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत.

**परिशिष्ट :**
**(सदर जमिनीचे वर्णन)**

गाव – नंदाईपाडा, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील शेतकी जमीन, दायाप्ती किंवा मैदानाचा तो सर्व तुकडा आणि भाग : गट क्र. ५१, क्षेत्रफळ ००एच–१८आर–९०पी आणि एफ.एल. ००एच–०१आर–८०पी एकत्रितपणे रु.४.१५ला मूल्यांकन केले आहे आणि खालील प्रमाणेसिमित आहे.

उत्तर दिशेकडे : नंदाईपाडा गावातील गट क्र. ५२ आणि गट क्र. ४९
दक्षिण दिशेकडे : नंदाईपाडा गावातील गटक्र. ५०
पूर्व दिशेकडे : नंदाईपाडा गावातील गट क्र. ४७
पश्चिम दिशेकडे : नंदाईपाडा गावातील गट क्र. ४१/१

**आज दिनांक २६ फेब्रुवारी, २०२६**

**नेहा सेहेगल**
**भागिदार,**
**युनिव्हर्सल लिगल**
१६१/१६२, ए विंग, मित्तल कोर्ट, जमनालाल बजाज मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई–४०००२१

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार मे. इंडिबर्ग रिएल्टी प्रा. लि. तर्फे श्री. मोहम्मद असद मोहम्मद अहमद खान व इतर ३ यांनी खालील वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे मालक श्री. मोहम्मद इमरान खान व इतर २ यांचेकडून विकसन करणे कामी घेण्याचे ठरवले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे दामत, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|
| ४६ | १/ब | ००-२५-३०<br>पो. ख. ०-००-७०<br>एकूण क्षेत्र ००-२६-०० | ४ | २५ |

सबब सदर बाबत कोणाचीही दान, गहाण, साठेकरार, खरेदीखत, ताबा, कब्जा, वहीवाट, बक्षीसपत्र लिज अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत दाखल करावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार केला जाईल. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : २५/०२/२०२६
पत्ता: १०३, बुरहान प्लाझा, दिलकप कॉलेज रोड, ममदापुर नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१.
मो. ९०११९०१७२०

सही/-
**ॲड. अल्ताफ लियाकत डोंगरे**
(वकिल उच्च न्यायालय)

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार मे. फ्रॅन्क कंन्स्ट्रक्शन बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स, यांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत पैकी वहिवाटींचे हक्कांसह त्या मिळकतीचे मालक श्री. मोहम्मद साबीर अन्सारी यांचेकडून रस्ता विकत घेण्याचे ठरवले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-दामत, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रूपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|
| ५६ | १ | ०-२२-००<br>पो. ख. ०-००-७०<br>एकुण ०-२२-७० | ३ | ११ |

पैकी, ३३ फुट रूंद X ७६ फुट लांबी प्रमाणे २५०८ चौ. फुट मिळकत येणे प्रमाणे.

सबब सदर बाबत कोणाचीही दान, गहाण, साठेकरार, खरेदीखत, ताबा, कब्जा, वहीवाट, बक्षीसपत्र लिज अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत दाखल करावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार केला जाईल. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक ०९/११/२०२५
पत्ता : १०१, १०२, १०३, बुरहान प्लाझा, दिलकप कॉलेज रोड, ममदापुर पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड,- ४१०१०१
मो. ९०११५५५८०१

सही/-
**ॲड. अल्ताफ लियाकत डोंगरे**
(वकिल उच्च न्यायालय)

**जाहीर नोटीस**
**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी खालापूर, यांचे न्यायालयात**
**तालुका खालापूर, जि. रायगड**
दुरध्वनी क्रमांक ०२१९२/२७५०४८ ईमेल- tahasil.khalapur3@gmail.com
क्र.जन्म/रजि./एसआर ५२/२०२६/१०२१

१) श्री. लहानु लक्ष्मण पवार (कातकरी)
रा. न्यु.एस.ई.बी.आई. रोड कातकरीवाडी शिवनगर, पो. मोहोपाडा, ता.खालापुर, जि. रायगड — वादी

विरुद्ध

१) निबंधक, जन्म - मृत्यु नोंदणी अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत वासांबे, ता. खालापूर, जि. रायगड — प्रतिवादी

विषय:- जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) नुसार

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमूद किरकोळ फौजदारी अर्जातील अर्जदार श्री. लहानु लक्ष्मण पवार (कातकरी), रा. न्यु.एस.ई.बी.आई. रोड कातकरीवाडी शिवनगर, पो. मोहोपाडा, ता.खालापुर, जि. रायगड (अपिलार्थी) यांनी यांचे वडील कै. लक्ष्मण गणू पवार यांचा मृत्यू दिनांक ११/०४/१९६७ रोजी रिसवाडी, ता. खालापूर येथे झाला आहे. सदर मृत्यूची नोंद झाली नसल्याने या न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे मृत्यूची नोंदणी करण्याचा आदेश मिळणेबाबत या न्यायालयात किरकोळ अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणाची काही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आवश्यक त्या पुराव्याचे कागदपत्रांसह आपले लेखी म्हणणे मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर अर्जदारास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील आदेश करणेत येईल याची नोंद घ्यावी. सदरची जाहीर नोटीस आज दि. ०४/२/२०२६ रोजी माझे सहीने व शिक्क्यानिशी दिली असे.

ठिकाण:- खालापूर
दिनांक:- २४/०२/२०२६

सही/-
**(अभय चव्हाण)**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार खालापूर**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने- नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# शासकीय रुग्णालयात औषधांची वानवा

- इंदिरा गांधी रुग्णालय समस्येंच्या गर्तेत
- श्वानदंशाच्या औषधांसाठी नागरिकांची प्रतीक्षा




**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुका हा आता तिसऱ्या मुंबईच्या वाटेवर आहे. असे असतानाही या तालुक्यात अत्याधुनिक व सुसज्ज असे एकही हॉस्पिटल नाही. त्यामुळे येथील जनतेला आजही विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यातच येथील इंदिरा गांधी शासकीय ग्रामीण रुग्णालय हे समस्यांच्या गर्तेत सापडले आहे. याठिकाणी मनुष्यबळाची कमतरता असून श्वानदंशासारखी औषधे वेळेवर उपलब्ध नसल्याने नागरिकांना त्याची प्रतीक्षा करावी लागते. त्यामुळे उरणच्या नागरिकांना आरोग्याच्या चांगल्या सेवा सुविधा मिळत नसल्याने त्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

उरण तालुक्यात अत्याधुनिक सेवा सुविधा युक्त एकही हॉस्पिटल नसल्याने येथील आरोग्य सेवेचे तीन तेरा वाजले आहेत. उरणमध्ये ३५ वर्षांपूर्वी उभारण्यात आलेल्या ३० खाटांच्या इंदिरा गांधी शासकीय ग्रामीण रुग्णालयात आजही वैद्यकीय सुविधा अपुरी आहे. त्यामुळे उरणकरांना शेजारच्या पनवेल तालुक्यातील किंवा मुंबई आणि नवी मुंबई या दोन्ही महापालिकेच्या रुग्णालयावर अवलंबून राहावे लागते. तर, काही वेळा येथील उद्योग आणि खासगी व्यवसायिक यांच्याकडे मदतीसाठी धावपळ करावी लागत आहे. उरणमध्ये महिन्याला ३५० पेक्षा अधिक श्वानदंश होण्याच्या घटना घडत आहेत. इंदिरा गांधी ग्रामीण शासकीय रुग्णालय हे तालुक्यातील अँटी रेबीज औषध आणि धनुर्वात प्रतिबंध टी.टी.च्या औषधांसाठीचे एकमेव रुग्णालय आहे. परंतु, याच रुग्णालयात आता श्वानदंशानंतर लागणाऱ्या औषधांचा तुडवडा निर्माण झाला आहे. त्यामुळे दर आठवड्याला अलिबाग येथील जिल्हा सामान्य रुग्णालयातून औषधे मागवावी लागत आहेत. त्यामुळे या औषधांसाठी ग्रामीण भागातील रुग्णांना येथे कायम प्रतीक्षा करावी लागते.

वाढत्या आजारांमुळे व न परवडणाऱ्या खासगी उपचारांमुळे सामान्य नागरिक या गांधी ग्रामीण रुग्णालयात येत असतात. त्यामुळे औषधांचा तुटवडा झाल्याने रुग्णांची खूप मोठ्या प्रमाणात हेळसांड सुरु आहे. दररोज ३०० पेक्षा अधिक रुग्ण या रुग्णालयात येत आहेत. ही संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. मात्र, तरीही शासनाकडून तात्काळ औषधपुरवठाबाबत कोणतेही गांभीर्य दाखवले जात नसल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. तर, काही वेळा जीव गमावण्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे श्वानदंश झाल्यानंतर या अतिमहत्त्वाच्या औषधांचा नियमित व पुरेसा पुरवठा करण्याची मागणी उरणच्या नागरिकांकडून केली जात आहे. या आधी उरणमध्ये अत्याधुनिक व सुसज्ज शासकीय रुग्णालयासाठी नागरिकांनी अनेक आंदोलने केली आहेत. तसेच, शासनाने २०१० मध्ये शंभर खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाला मंजुरी देखील दिली आहे. मात्र, गेल्या पंधरा वर्षांपासून या रुग्णालयाच्या नवीन आराखड्याची प्रतीक्षा कायम आहे.

> काही दिवसांपासून अँटी रेबीज औषधांचा साठा पुरेसा नव्हता. त्यासाठी अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयाकडून ही औषधे मागविण्यात येत आहेत. त्यामुळे रुग्णांना वेळेत औषधपुरवठा केला जात आहे. श्वानदंशाची संख्या वाढल्याने व्यवस्थेवर ताण आहे. रुग्णांना वेळेत औषधे उपलब्ध व्हावीत यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न चालू आहेत.
>
> – डॉ. बाबासाहेब काळेल, अधीक्षक, इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय



## पोलिसांनी लावला चोरीचा छडा

**। रोहा । प्रतिनिधी ।**

गतवर्षी २६ मार्च रोजी एकाच दिवशी रोहे शहरातील नेहरूनगर येथील १ ब्लॉक, अष्टमी नाक्यारील नवीन वसाहतीतील ३ ब्लॉक तसेच भुवनेश्वर येथील चैतन्य अपार्टमेंटमधील २ ब्लॉक अशा ६ ठिकाणी घरफोडीची घटना घडली होती. यावेळी जवळपास ६ लाखाहुन अधिक किंमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम घेऊन चारेट्यांनी पलायन केले होते. विशेष म्हणजे चोरट्यांनी घरफोडी करण्यापूर्वी शेजाऱ्यांच्या घराला बाहेरून कडी लावली आणि आपली मोहिम फत्ते केली. एकाच दिवशी ६ ठिकाणी झालेल्या या घरफोडीचा धक्कादायक प्रकार घडल्यानंतर घटनास्थळी पोलिस तातडीने दाखल झाले होते. या घटनेनंतर रोहा पोलीस ठाण्यात राजेंद्र गुरव यांनी तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी तपासाचे चक्र वेगाने फिरवत संबंधित चोरट्यांना मुंबई येथून ताब्यात घेतले. त्यांच्याकडून चोरी गेलेला माल हस्तगत करण्यात आला. त्यानंतर २१ तोळे सोन्याचे दागिने संबधित महिला वर्गाच्या स्वाधीन करण्यात आले.

## निवडक



### सावित्रीबाई फुले सभागृहासाठी मागणी

**पनवेल** : क्रांतिज्योत महिला विकास फाऊंडेशन संस्थेच्या शिष्टमंडळाने महापौरांची भेट घेऊन क्रांतिसूर्य ज्योतिबा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची प्रतिमा तसेच सावित्रीबाई फुले यांचे पुस्तक भेट देत शुभेच्छा व्यक्त केल्या. त्यानंतर सभागृह उभारणीसंदर्भातील सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, स्त्री शिक्षणाचा पाया रचणाऱ्या आणि शिक्षण प्रसारासाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या सावित्रीबाई फुले यांच्या नावाने पनवेल शहरात अद्याप कोणतेही अधिकृत सभागृह किंवा स्मारक भवन उभारण्यात आलेले नाही. सामाजिक न्याय, स्त्री सक्षमीकरण आणि वंचित घटकांच्या उन्नतीसाठी त्यांचे कार्य ऐतिहासिक आणि प्रेरणादायी आहे. त्यामुळे महानगरपालिकेने नियमानुसार योग्य भूखंड निश्चित करून महासभेत ठराव मंजूर करावा व त्यांच्या नावाने भव्य सभागृह उभारण्याची प्रशासकीय प्रक्रिया तात्काळ सुरू करावी, अशी ठोस मागणी शिष्टमंडळाने केली आहे. यावेळी स्नेहा धुमाळ, प्रिया गंगावणे, ज्योती तातरे, सुषमा मयेकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.



### ड्रेनेज टँकमधून गायीची सुखरूप सुटका

**खोपोली** : शहरातील मोगलवाडी डीपी रस्त्यालगत असलेल्या एका निर्माणाधीन इमारतीच्या ड्रेनेज टँकचे झाकण तुटल्याने एका गाभण गाय त्यात अडकली. या टँकमध्ये सुमारे ७ ते ८ फूट पाणी साचलेले असल्याने गायीला हालचाल करण्यास पुरेशी जागा नव्हती. या घटनेची माहिती मिळताच हेल्प फाऊंडेशनचे सदस्य आणि खोपोली नगरपालिका अग्निशमनची टीम तात्काळ घटनास्थळी दाखल झाली. गायीच्या मालकाकडून ती गाय गाभण असल्याची माहिती मिळाल्याने बचावकार्य अधिक काळजीपूर्वक राबविण्यात आले. प्रथम सक्शन पंपाच्या सहाय्याने टँकमधील काही प्रमाणात पाणी उपसण्यात आले. त्यानंतर जेसीबी यंत्रणा आणि मानवी साखळीच्या मदतीने टँकची भिंत नियंत्रित पद्धतीने फोडण्यात आली. जवळपास दोन तास सुरू असलेल्या शर्थीच्या प्रयत्नांनंतर गायीला कोणतीही गंभीर इजा न होता सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले. या धाडसी आणि समन्वयपूर्ण बचावकार्यासाठी खोपोली नगरपालिकेचे परिवहन सभापती किशोर पाटील यांनी दोन्ही पथकांचे कौतुक केले. तसेच, गायीच्या तपासणी व उपचारासाठी पशुवैद्यांना तात्काळ पाचारण करण्यात आले. दरम्यान, अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी निर्माणाधीन ठिकाणी आवश्यक सुरक्षा उपाययोजना काटेकोरपणे राबविण्याची गरज असल्याचे स्थानिकानी सांगितले आहे.

## अश्लील व्हिडीओ प्रकरणी गुन्हा दाखल

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यात कोप्रोली येथील एका २१ वर्षीय तरुणाने प्रेयसीचे अश्लील व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. शिवम जाधव असे या तरुणाचे नाव असून पनवेल शहर पोलिसांनी त्याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

दोन वर्षांपूर्वी शिवम जाधव याची पनवेल येथील २१ वर्षीय पीडित तरुणीशी इन्स्टाग्रामद्वारे ओळख झाली होती. या ओळखीचे रूपांतर प्रेमसंबंधात झाल्यानंतर शिवम याने पीडित तरुणीशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले. त्यावेळी शिवमने तरुणीच्या नकळत स्वतःच्या मोबाइलमध्ये या खासगी क्षणांचे व्हिडिओ चित्रीकरण केले होते. दरम्यानच्या काळात काही कारणामुळे या दोघांमधील प्रेमसंबंध तुटले. त्यानंतर पीडित तरुणीने दुसऱ्या तरुणाशी लग्न केले. ही बाब शिवम याला समजल्यानंतर त्याने पीडितेची बदनामी करण्याच्या हेतूने दोघांमधील शरीरसंबंधाचे खासगी व्हिडिओ १६ फेब्रुवारी रोजी सोशल मीडियावर व्हायरल केले. तसेच, पीडित तरुणीच्या परिचयातील तरुणाला व्हॉट्सअॅपवर पाठवून दिले. त्यानंतर शिवम याने खासगी व्हिडिओ व्हायरल केल्याचे लक्षात आल्यानंतर पीडितेने पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

## कर्जतमध्ये पोलीस मित्र संघटनेचे आंदोलन

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



कर्जत शहरात असलेल्या उपजिल्हा रुग्णालयासंबंधी अनेक समस्यांना रुग्ण तसेच नागरिकांना सामोरे जावे लागत आहे. त्याचवेळी कर्जत नगरपरिषदेकडून नागरी सुविधांबाबत सहकाऱ्याची भूमिका बजावली जात नाही. त्यामुळे पोलीस मित्र संघटनेचे राज्य उपाध्यक्ष रमेश कदम यांनी शहरातील लोकमान्य टिळक चौकात बुधवार, दि.२५ फेब्रुवारीपासून उपोषण सुरू केले आहे.

कर्जत शहरातील उपजिल्हा रुग्णालयात अनेक रुग्णांना औषधे उपलब्ध नसल्याचे कारण सांगुन बाहेरून औषधे आणायला लावतात. बेबी वाघमारे गौरकामथ या आदिवासी महिलेची नॉर्मल डिलिव्हरी झाल्यानंतर तीला खासगी रुग्णालयात उपचार घेण्यासाठी पाठवले गेले. मात्र, वेळेत उपचार न झाल्यामुळे त्यात तिचा मृत्यू झाला, या प्रकरणाची चौकशी करण्यात यावी.

ज्येष्ठ नागरिकांना मुद्दाम फिटनेस सर्टिफिकेटवर जावक नंबर न टाकता सर्टिफिकेट देऊन त्यांची फसवणूक होते. तसेच, रुग्णालयातील वैद्यकीय अधिक्षकांनी ऑक्टोबर, २०२५मध्ये डॉ. किरण सोनावने यांच्या खासगी दवाखान्यात धाड टाकून उपजिल्हा रुणालयातील औषधे पकडली, त्या संदर्भात कोणती कायदेशीर कारवाई केली, याची माहिती दिली जात नाही. अशा विविध फसवणूक व गैरप्रकारांची चौकशी करण्याची मागणी रमेश कदम यांनी केली आहे. त्याचबरोबर नगरपरिषदेत बांधण्यात आलेल्या नाट्यगृहाच्या दयनीय अवस्थेची चौकशी व्हावी.नगरपरिषद हद्दीतील सर्व अनधिकृत अतिक्रमणांवर आणि गृहनिर्माण संस्थेतील पार्किंग जागेवरील सर्व प्रकारच्या अतिक्रमणांवर कायदेशीर कारवाई करावी. नगरपरिषद हद्दीतील सर्व शौचालयात पाण्याची व्यवस्था व दररोज स्वच्छता करण्यात यावी आणि महिलांसाठी आवश्यक स्वतंत्र नविन शौचालयाची सुविधा करण्यात यावी. शुक्रवार बाजार आणि दररोजचे भाजीपाला विक्रेते, फल विक्रेते व फेरीवाले विक्रेते यांचा बाजार एकच ठिकाणी भरवावा, अशा अनेक मागण्यांसाठी हे उपोषण सुरू आहे.

## रहदारीच्या समस्येबाबत बैठकीत चर्चा

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**



मुरुड-जंजिरा नगरपरिषद हद्दीतील बाजारपेठ परिसरात वाढलेल्या रहदारीच्या समस्येबाबत नगराध्यक्षा आराधना दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली नगरपरिषदेच्या सभागृहात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत शहरातील विविध समस्यांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली.

या बैठकीत मुरूड शहरातील बाजारपेठ परिसर व मुख्य रस्त्यांवरील वाढती वाहतूक कोंडी, अनियमित पार्किंग, अतिक्रमण व एस.टी. बस वाहतुकीमुळे निर्माण होणाऱ्या अडचणी यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यावर तोडगा म्हणून मुख्य बाजारपेठेतील अतिक्रमण हटविण्यासाठी विशेष मोहीम राबविणे, एस.टी. बस मार्गात आवश्यक ते बदल करून वाहतूक सुरळीत करणे, शहरात नियोजित पार्किंग व्यवस्था उभारणे या मुद्द्यांवर सखोल विचारविनिमय करण्यात आला. बैठकीच्या शेवटी पोलीस निरीक्षक व मुख्याधिकारी यांनी विशेष पुढाकार घेऊन लवकरच अंमलबजावणी आराखडा तयार करून प्रत्यक्ष कारवाई सुरू करण्याचे आश्वासन दिले. शहरातील रहदारी समस्येवर ठोस उपाययोजना करण्याच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वपूर्ण ठरली. यावेळी नगराध्यक्षा आराधना दांडेकर, उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत, मुख्याधिकारी सचिन बच्छाव, पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे, नगरपरिषदेचे प्रशासकीय अधिकारी नंदकुमार आंबेतकर, रचना अभियंता अनिकेत भोसले, बांधकाम अभियंता अनिकेत वाजे, कर निरीक्षक अनिकेत जगदाळे, संजय बामुगडे, वाहतूक पोलीस नाईक किशोर बठारे यांच्यासह व्यापारी, हॉटेल व रिक्षा, विक्रम चालक-मालक संघटना, सामाजिक कार्यकर्ते, सर्व नगरसेवक व नागरिक उपस्थित होते.



## गरजूंना आरोग्य शिबिराचा आधार

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

आर्थिक अडचणींसह धावपळीच्या जीवनात नागरिकांना स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देता येत नाही. त्यामुळे अनेकवेळा अनेक आजारांना सामोरे जाण्याची वेळ नागरिकांवर येते. ग्रामीण भागातील नागरिकांच्या आजाराच्या निदानासह त्यांचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी अलिबागमधील उज्ज्वल जनसेवा कल्याण संस्थेने पुढाकार घेतला आहे. या संस्थेच्यावतीने व डॉ. देवेंद्र खरे यांच्या मार्फत मुरूड तालुक्याती शिघ्रे येथे गरीब, गरजूंसाठी मोफत आरोग्य शिबीर घेण्यात आले. यावेळी तज्ज्ञांकडून योग्य मार्गदर्शन व मोफत औषधे देण्यात आली.

नागरिकांना स्वतःच्या आरोग्याची काळजी घेता यावी, यासाठी उज्ज्वल जनसेवा कल्याण संस्था आरोग्य शिबिराच्या माध्यमातून थेट नागरिकांच्या दारापर्यंत पोहचण्याचे काम करीत आहे. मुरूड तालुक्यातील शिघ्रे येथे या संस्थेच्या मार्फत मोफत आरोग्य शिबीर घेण्यात आले. रक्तदाब, मधुमेहाची तपासणी करून रुग्णांना मार्गदर्शन करण्याबरोबरच मोफत औषधांचा पुरवठा करण्याचे काम करण्यात आले आहे. रुग्णांची तपासणी करण्याबरोबरच डॉ. सतिश कीर, डॉ. देवेंद्र खरे, डॉ. आदिती कीर, डॉ. डायना, संदीप पाटील आदींकडून योग्य मार्गदर्शन करण्यात आले. या शिबिरात शिघ्रे येथील ग्रामस्थ व महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

## मंगळसुत्र खेचुन दुकली पसार

**पनवेल** : करंजाडे परिसरात छाया महाडकर व त्यांचे पती हे मॉर्निंग वॉक करत होते. ते करंजाडे येथील ॲक्सीस बँके समोरील सदाबहार नर्सरी जवळ आले असता एका दुचाकीवरून आलेल्या २ अनोळखी व्यक्तींनी त्यांच्या गळ्यातील मंगळसुत्र खेचून तेथून पळ काढला. हे मंगळसुत्र २० ग्राम वजनाचे २ लाख रुपये किमतीचे असून याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अंमली पदार्थ बाळगणाऱ्यांना अटक

**। पनवेल । प्रतिनिधी ।**



पनवेल रेल्वे स्टेशन रोडवरील साईबाबा मंदिरासमोरील भगत चाळ परिसरात अंमली पदार्थ विक्रीसाठी बाळगणाऱ्या २ जणांना पनवेल शहर पोलिसांनी अटक केली आहे.

सागर जोसेफ (२५) आणि गणेश जोसेफ (२१) हे पनवेल रेल्वे स्टेशन रोडवरील साईबाबा मंदिरासमोरील भगत चाळ परिसरात अंमली पदार्थ विक्रीसाठी बाळगत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर पोलीस ठाणे सपोनि प्रविण फडतरे, पोह संदेश म्हात्रे, अमोल पाटील, पोना मिथुन भोसले, पोशि किरण कराड, सचिन कोर, विशाल दुधे आदींच्या पथकाने त्यांना ताब्यात घेतले. पोलिसांनी त्यांच्याकडून १ लाख ९ हजार ९०० रुपये किंमतीचा ४.३९६ किलो वजनाचा गांजा, रोख रक्कम आणि आयफोन मोबाईल असा एकूण १ लाख ६१ हजार रुपये किमतीची मुद्देमाल हस्तगत केला आहे.

वस्तूंच्या किंमतीमध्ये पाच टक्के वाढ | धूलीवंदननिमित्त बाजारपेठा सजल्या

# रंगबेरंगी पिचकाऱ्या बाजारात दाखल

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**


(छायाचित्र : समीर मालोदे)

राज्यासह रायगड जिल्ह्यात होळीनंतर दुसऱ्या दिवशी धुलिवंदन सण साजरा केला जातो. या निमित्त एकमेकाच्या अंगावर रंगाची उधळण केली जाते. त्यासाठी लागणारे पर्यावरण पुरक रंग तसेच वेगवेगळ्या आकाराच्या व रंगाच्या पिचकाऱ्या जिल्ह्यातील प्रत्येक बाजारात दाखल झाल्या आहेत. यंदा मात्र रंगासह पिचकाऱ्यांच्या किंमतीमध्ये पाच टक्के वाढ झाली आहे. त्यामुळे एका वस्तूमागे किमान ५ रुपये अधिक मोजण्याची वेळ ग्राहकांवर येणार आहे.

धुलिवंदननिमित्त रंगाची उधळण करण्याचा खेळ ग्रामीण भागासह शहरी भागात ठिकठिकाणी साजरा केला जातो. ही परंपरा आजही जपली जाते. यावर्षी होळी सोमवारी (दि.२) आहे. या दिवशी ठिकठिकाणी होळी उभारून विधीपत पूजन केली जाणार आहे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी मंगळवारी (दि.३) धुलिवंदन आहे. या दिवशी सकाळपासून सर्वच ठिकाणी रंगाची उधळण केली जाणार आहे. एकमेकांच्या अंगावर रंग उडवून धुलिवंदनाचा आनंद लुटला जाणार आहे. धुलिवंदन अवघ्या चार दिवसांवर येऊन ठेपला आहे. धुलिवंदन साजरा करण्यासाठी लागणारे रंग, वेगवेगळ्या रंगाच्या व आकाराच्या पिचकाऱ्या बाजारात दाखल झाल्या आहेत. साध्या पिचकाऱ्यांसह बंदुकवाल्या आणि टँकरवाल्या पिचकाऱ्यांची दुकाने सजली आहेत. तसेच, मुलांच्या आवडीचे छोटा भीम, बेनटेन, बॉबी डॉलची कार्टून असलेली पिचकारी देखील बाजारात विक्रीसाठी उपलब्ध झाली आहे. या पिचकाऱ्यांची किंमत १० रुपायंपासून ३०० रुपयांपर्यंत आहे. काही ठिकाणी किंमती स्थीर आहेत. तर, काही ठिकाणी या वस्तूंच्या किंमतीमध्ये ५ ते १० टक्क्यांनी वाढ झाली आहे. वस्तू बनविण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या किंमतीमध्ये वाढ झाल्याने या वस्तूंचे दर काही प्रमाणात वाढविण्यात आले आहे. महागाईची झळ असतानाही त्यावर मात करीत धुलिवंदन सण साजरा करण्यासाठी खरेदीला पसंती दिली आहे. जिल्ह्यातील अलिबागसह अनेक बाजारात पिचकाऱ्या खरेदीला सुरुवात झाली आहे. आतापर्यंत २५ टक्के खरेदी झाली आहे. धुलिवंदनच्या दोन दिवस अगोदर म्हणजे २८ फेब्रवारी व १ मार्च या तारखेला ग्राहकांची गर्दी होण्याची शक्यता विक्रेते संदेश तुणतुणे यांनी वर्तविली आहे.

पंधरावे पुण्यस्मरण



कै.दामोदर हिरू पाटील (माजी सरपंच)
शिवाजीनगर कुर्डुस गावचे संस्थापक
स्वर्गवास :२६ फेब्रुवारी २०११

दीप उजळूनी तुमच्या स्मृतिचे दिनदिन आमचा जातो
आठवणींच्या रेशीम सरीत आम्ही रोजच न्हातो
सोडून आम्हा मागे निघून अर्ध्यातच गेलात
आठवणींच्या सोबतीचे आता आयुष्याचा प्रवास

मुलगे : श्री.जयराम, आत्माराम, परशुराम, महेंद्र, गजेंद्र
सूना: सौ.भारती, अलका, रेखा, प्रिया नातवंडे: कु.मितेश, अभिजित, प्राजक्ता, कु. पायल, मृणाली, सिद्धी, स्नेहल, स्वरांजली नातसून : स्मिता
मु.पो.कुर्डूस (शिवाजीनगर) ता.अलिबाग जि.रायगड

# आर्थिक शिस्तीची ऐशीतैशी

राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनात मंगळवारी ११ हजार ९९५ कोटींच्या म्हणजे जवळपास १२ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या. हे आर्थिक वर्ष येत्या ३१ मार्चला संपेल. त्याच्या आता पुन्हा नव्याने मागण्या करण्याचा अवसरच उरलेला नाही. म्हणूनच आपण राज्यातील जनता बचावली आहे. अन्यथा, सरकारने आणखी एकदा पुरवणी जोडायला कमी केली नसती. पुढच्या वर्षात राज्याला किती उत्पन्न मिळेल व किती खर्च होईल याचा ताळेबंद अर्थसंकल्पात मांडण्यात येत असतो. हा साधारण फेब्रुवारी किंवा मार्चमध्ये सादर होतो. एप्रिलपासून सुरु होणाऱ्या पुढच्या बारा महिन्यांचा अंदाज बांधून त्यानुसार या जमाखर्चाच्या रकमा सादर होतात. त्यात थोडेफार इकडेतिकडे होऊ शकते. पूर, दुष्काळ किंवा अन्य गोष्टींमुळे आकस्मिक खर्च उद्भवू शकतात. शेतीचे किंवा औद्योगिक उत्पादन घटल्याने उत्पन्नाचे अंदाज चुकू शकतात. त्यासाठी सरकारला वर्षभरात पुरवणी मागण्यांद्वारे अधिकचा खर्च विधिमंडळाकडून मंजूर करून घेता येतो. हा प्रसंग अपवादात्मक असावा आणि पुरवणीचा आकार छोटा असावा अशी अपेक्षा असते. अर्थसंकल्पाच्या एकूण आकाराच्या १० ते १५ टक्क्यांहून अधिक या मागण्या असू नयेत असा संकेत आहे. पण फडणवीस सरकारने गेल्या काही वर्षांमध्ये इतर अनेक क्षेत्रांप्रमाणेच हे संकेतही मोडून फेकून दिले आहेत. या सरकारच्या पुरवणी मागण्यांची हाव दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. गेल्या वर्षभरात म्हणजे २०२५-२६ या काळात फडणवीस सरकारने प्रत्येक अधिवेशनात हजारो कोटींच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. अर्थसंकल्पी अधिवेशनानंतर तीन महिन्यांच्या आत पावसाळ्यात झालेल्या अधिवेशनात तब्बल ५७ हजार कोटींच्या मागण्या मांडण्यात आल्या होत्या. हिवाळी अधिवेशनात तर कहर करण्यात आला. तब्बल ७५ हजार कोटींच्या मागण्या मांडण्यात आल्या. त्या दरम्यानच्या काळात पालिका व जिल्हा परिषद निवडणुका होणार असल्याने जिल्ह्यांसाठी निधीची खैरात तेव्हा करण्यात आली होती. या दोन मागण्यांमुळे राज्याची महसुली तूट दोन लाख कोटी रुपयांवर गेली होती. आता त्यात सुमारे १२ हजार कोटींची भर पडणार आहे. एकूणच आर्थिक शिस्तीची ऐशीतैशी करण्यात आली आहे.

## बेशिस्तीची जबाबदारी देवेंद्रांचीच

गंमत म्हणजे काल बारा हजार कोटींच्या पुरवणी मागण्या मांडल्यानंतर फडणवीसांनी आर्थिक बेशिस्तीला कसा चाप लावला आहे अशा बातम्या प्रसिध्द झाल्या. आधीच्या तुलनेत यावेळी सरकारने मांडलेल्या पुरवणी मागण्या अगदीच कमी आहेत हे खरे आहे. पण मुळात सरकारने यावर्षी आधीच सुमारे १ लाख ३० हजार कोटी जास्तीचे घेऊन झालेले आहेत आणि तरीही पुन्हा सुमारे १२ हजार कोटी रुपये मागितले जात आहेत या गोष्टीकडे पूर्ण दुर्लक्ष करण्यात आले. आर्थिक बेशिस्तीला फडणवीस आता चाप लावत असतील तर ती बेशिस्त अजित पवारांची होती काय असा प्रश्न विचारायला हवा. कालपरवाच याच अजितदादांवर प्रचंड स्तुतीसुमने उधळण्यात आली. पवार हे न झालेले उत्कृष्ट मुख्यमंत्री होते असे फडणवीस म्हणाले. गेली नऊ वर्षे तरी पवारच अर्थमंत्री होते व ते पैशांच्या वापराबाबत काटेकोर होते असा निर्वाळा सर्वांनी दिला. अशा या शिस्तबध्द अर्थमंत्र्याला पुरवणी मागण्यांची बेशिस्त करायला कोण व का भाग पाडत होते असा प्रश्न या निमित्ताने विचारायला हवा. याचे उत्तर सर्वांनाच ठाऊक आहे. तरीही ते सांगायला हवे. या अंदाधुंदीची सर्व जबाबदारी फडणवीसांवरच येते. पण ही बेशिस्त जणू विरोधी पक्षांनी आणली होती व फडणवीस ती सुधारू पाहत आहेत असा प्रचार करणे हा खास भाजपचा खोटारडेपणा आहे. खरी स्थिती अशी आहे की, फडणवीस, शिंदे आणि पवारांना विधानसभा व इतर निवडणुका जिंकायच्या होत्या. म्हणून त्यांनी लाडकी बहीण व इतर पैसे उधळणाऱ्या योजना आणल्या. त्यात झालेल्या भ्रष्टाचाराकडे दुर्लक्ष केले. हजारो अपात्र लोकांना पैसे दिले गेले. पण तेव्हा या सर्वांना मते प्यारी होती. आता सर्व निवडणुका तूर्त तरी संपल्या. त्यामुळे आर्थिक शिस्तीच्या वगैरे गोष्टी केल्या जात आहेत. यावेळच्या १२ हजार कोटी मागण्यांपैकी ९ हजार कोटी या कार्यक्रमांतर्गत खर्चाच्या आहेत. उद्योग, उर्जा, खनिकर्म इत्यादी विभागांवर हे पैसे खर्च केले जायचे आहेत. याची कल्पना अर्थसंकल्पात का करण्यात आली नव्हती व उद्योग व खनिकर्म विभागाद्वारे कोण्या अदानीला उपयोगासाठी या रकमा खर्ची पडणार आहेत काय याचा तलास विरोधकांनी करायला हवा.

## कर्जमाफीची प्रतीक्षा

येत्या सहा मार्चला पुढच्या वर्षीचा अर्थसंकल्प सादर होईल. पण त्यानंतर लगेचच शेतकरी कर्जमाफी करण्याची वेळ येईल. जूनपर्यंत ती करू असा शब्द सरकारने दिला आहे. त्यासाठी अर्थसंकल्पात कितीही तरतूद केली तरी सरकारला तूट जाणवणार आहेच. दुसरीकडे लाडकी बहीण योजना ही सरकारचे कायमचे लोढणे होऊन बसली आहे. ती चालूच राहील असे दर निवडणुकीत शिंदे मोठ्या आवाजात सांगत असतात. तिच्यापायी होणारा खर्च कोठून भरून काढायचा हा मोठा प्रश्न आहे. यासाठी मग इतर विभागांच्या पैशांवर डल्ला मारला जातो. गेल्या वर्षी मराठवाडा तसेच सोलापूर, नगर इत्यादी भागात आलेल्या महापुराच्या वेळी पूरग्रस्तांना ८९ हजार कोटींचे पॅकेज जाहीर करण्यात आले होते. विमा योजनेमधून शेतकऱ्यांना पैसे दिले जावेत अशी अपेक्षा होती. प्रत्यक्षात एक पैसाही त्यांना मिळालेला नाही असे थकबाकी अनेक महिन्यांपासून बाकी आहे. ती द्यायला सरकारकडे पैसे नाहीत. बार्टीसारख्या मागास विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे पैसे देण्यातही दिरंगाई चाललेली असते. शिक्षण, आरोग्य वगैरे विभागात हजारो पदे रिक्त आहेत. सरकारी इस्पितळे सुधारण्यासाठी सरकारकडे पैसा नाही. अर्थसंकल्पात याची तरतूद केली तर ठीक. अन्यथा हा पैसा पुरवणी मागण्यांच्या रुपानेच घ्यावा लागणार आहे. यामुळे आता ज्या आर्थिक शिस्तीचे गोडवे गायले जात आहेत तिचा लवकरच बोजवारा उडणार आहे. सरकारकडे उत्पन्नापेक्षा खर्च जास्त झाला की, तोटा किंवा तूट येते. सरकार नोटा छापू शकत नाही. त्यामुळे ही तूट खुल्या बाजारातील कर्जाद्वारे भरून काढली जाते. यासाठी रिझर्व्ह बँकेच्या नियमांचे पालन करावे लागते. कर्ज अधिक असेल तर राज्याची बाजारातील पत कमी होते. साहजिकच आपल्याच चढ्या व्याजदराने कर्ज घ्यावे लागते. म्हणजे उत्पन्नातला अधिकाधिक भाग व्याज फेडण्यातच खर्ची पडतो. पुन्हा रोजचे खर्च करायला कर्ज घेण्याची पाळी येते. प्रकल्प किंवा अन्य मोठ्या गोष्टींसाठी भांडवली खर्च करायला सरकारकडे पैसाच शिल्लक राहत नाही. मग हे प्रकल्प रेंगाळतात. किंवा मग अदानीसारख्या खासगी कंपन्यांना ते चालवायला दिले जातात. आपल्याकडे उत्तम सार्वजनिक बांधकाम विभाग असूनही भांडवल घालायची ऐपत नसल्याने आपले बहुतांश मोठे रस्ते बांधण्याची कंत्राटे रिलायन्स, अदानी इत्यादींना दिली जातात. इथून पुढच्या काळातही अधिकाधिक प्रमाणात हेच होणार आहे.

विचार

# भ्रष्टाचार कमी, रोजगाराची हमी

*अर्थव्यवस्थेच्या प्रकृतीबाबत माहिती देणारा आणखी एक ताजा अहवाल अलिकडेच समोर आला. त्यानुसार अनिश्चितेच्या काळात अर्थव्यवस्था जोमात आहे. दुसरी एक आनंदवार्ता म्हणजे भ्रष्टाचाराच्या बाबतीत भारताच्या प्रतिमेत सुधारणा होत आहे. दरम्यान, भारतात बेरोजगारी कमी होत असल्याचाही एक अहवाल समोर आला आहे. सरत्या आठवड्यातील या दखलपात्र बातम्यांचा मागोवा घ्यायला हवा.*



महेश देशपांडे

अर्थव्यवस्थेच्या प्रकृतीबाबत आणखी एक ताजा अहवाल अलिकडेच समोर आला. त्यानुसार अनिश्चितेच्या काळात अर्थव्यवस्था जोमात आहे. दुसरी एक आनंदवार्ता म्हणजे भ्रष्टाचाराच्या बाबतीत भारताच्या प्रतिमेत सुधारणा होत आहे. दरम्यान, भारतात बेरोजगारी कमी होत असल्याचाही एक अहवाल समोर आला आहे. सरत्या आठवड्यातील या दखलपात्र बातम्यांचा मागोवा घ्यायला हवा.

भारत वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून स्वतःला सिद्ध करत आहे. जागतिक स्तरावर अनेक प्रमुख अर्थव्यवस्था मंदी आणि अनिश्चिततेशी झुंजत असतानाही भारतीय अर्थव्यवस्थेने चांगली कामगिरी केली आहे. सरकारने २०४७ पर्यंत विकसित भारताचे ध्येय साध्य करण्याचे ठरवले आहे आणि 'मूडीज' या जागतिक रेटिंग एजन्सीने भारताच्या आर्थिक वाढीबाबत एक महत्त्वपूर्ण अंदाज जाहीर केला आहे. त्यामुळे देशाची विकासगाथा आणखी मजबूत होईल. 'मूडीज रेटिंग्ज'नुसार, २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये भारताचा वास्तविक सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) विकास दर ६.४ टक्के राहण्याचा अंदाज आहे. देशांतर्गत वाढता वापर, सरकारी धोरणांचे पाठबळ आणि स्थिर बँकिंग प्रणालीमुळे भारत जी-२० देशांमध्ये सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था राहील. देशासमोरील वाढत्या आव्हानांमध्येही अर्थव्यवस्था बदलत आहे. 'मूडीज'ने त्यांच्या बँकिंग सिस्टीम आउटलुक अहवालात म्हटले आहे, की मालमत्तेची गुणवत्ता एकूणच मजबूत राहील. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांमध्ये (एमएसएमई) काही दबाव दिसून येऊ शकतो. असे असूनही बँकांकडे संभाव्य कर्ज तोट्यांना तोंड देण्यासाठी पुरेसे बफर आहेत. मजबूत समष्टिगत आर्थिक परिस्थिती आणि संरचनात्मक सुधारणांमुळे २०२६-२७ मध्ये बँकांसाठीचे ऑपरेटिंग वातावरण सकारात्मक राहील, असे रेटिंग एजन्सीचे मत आहे.

मजबूत देशांतर्गत वापर आणि सरकारी धोरणात्मक पुढाकारांमुळे भारताचा विकास इतर प्रमुख अर्थव्यवस्थांपेक्षा वेगवान राहील, असे 'मूडीज'ने स्पष्ट केले. तथापि, हे अंदाज अर्थ मंत्रालयाच्या आर्थिक सर्वेक्षणात वर्तवण्यात आलेल्या ६.८ ते ७.२ टक्के या श्रेणीपेक्षा कमी आहेत. महागाई नियंत्रणात 'मूडीज'ने असेही म्हटले आहे, की सप्टेंबर २०२५ मध्ये 'जीएसटी' लागू होण्यापूर्वी वैयक्तिक उत्पन्न करमर्यादेत वाढ झाल्याने ग्राहकांची खरेदी क्षमता सुधारली आहे. त्यामुळे उपभोग-नेतृत्वाखालील वाढीला आणखी पाठिंबा मिळेल.
अधिकृत अंदाजानुसार, २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये भारताचा विकास दर ७.४ टक्के असण्याची अपेक्षा आहे. २०२४-२५ मध्ये नोंदवलेल्या ६.५ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. महागाईच्या आघाडीवरही दिलासा मिळण्याची शक्यता आहे. 'मूडीज'च्या मते महागाई नियंत्रणात राहून आर्थिक वाढ मजबूत राहिल्यास आर्थिक मंदीची स्पष्ट चिन्हे दिसल्यासच भारतीय रिझर्व्ह बँक चलनविषयक धोरण आणखी शिथिल करेल. हे लक्षात घेण्यासारखे आहे, की २०२५ मध्ये रिझर्व्ह बँकेने धोरणात्मक व्याजदरात एकूण १.२५ टक्के कपात केली आहे. त्यामुळे तो ५.२५ टक्के झाला आहे. याव्यतिरिक्त, 'मूडीज'चा अंदाज आहे, की २०२६-२७ मध्ये बँकिंग प्रणालीमध्ये कर्जवाढ ११ ते १३ टक्क्यांपर्यंत वाढू शकते. ती २०२५-२६ मध्ये आतापर्यंत १०.६ टक्के होती.

दरम्यान, भारताच्या जागतिक प्रतिमेबाबत चांगली बातमी समोर आली आहे. आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार देखरेख संस्था 'ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनल'ने जारी केलेल्या 'करप्शन पर्सेप्शन इंडेक्स' (सीपीआय) मध्ये भारताचे रँकिंग सुधारले आहे. १८२ देशांच्या या यादीत भारत पाच स्थानांची झेप घेऊन ९१ व्या स्थानावर आला आहे. तथापि, अहवालात पत्रकारांच्या सुरक्षिततेबद्दल आणि भ्रष्टाचाराविरुद्ध वृत्तांकन करण्याबद्दल गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली आहे. अहवालानुसार, गेल्या वर्षीच्या तुलनेत भारताने आपले स्थान सुधारले आहे. २०२४ मध्ये भारत ९६ व्या स्थानावर होता, तो आता ९१ व्या स्थानावर आला आहे. निर्देशांक देशांना शून्य (अत्यंत भ्रष्ट) ते १०० (अत्यंत स्वच्छ) या पट्टीवर गुण दिले जातात. गेल्या वर्षीच्या तुलनेत भारताचा स्कोअर एका अंकाने वाढून ३९ वर पोहोचला आहे. सुधारणा असूनही, भारताचा स्कोअर (३९) अजूनही जागतिक सरासरीपेक्षा (४२) खाली आहे. पन्नासपेक्षा कमी गुण असलेल्या देशांमध्ये भ्रष्टाचार ही एक गंभीर समस्या आहे. यादीमध्ये डेन्मार्कने आपले वर्चस्व कायम ठेवले आहे. ८९ गुणांसह तो जगातील सर्वात कमी भ्रष्ट देश राहिला आहे. त्यानंतर फिनलंड आणि सिंगापूरचा क्रमांक लागतो. अमेरिका २९ व्या आणि ब्रिटन विसाव्या क्रमांकावर आहे. दक्षिण सुदान आणि सोमालिया फक्त नऊ गुणांसह यादीमध्ये तळाशी आहेत. अहवालात म्हटले आहे, की अमेरिका आणि ब्रिटनसारख्या मजबूत लोकशाही देशांचीही भ्रष्टाचाराशी लढताना घसरण होत आहे. भारताचे सुधारलेले रँकिंग व्यवसाय आणि गुंतवणुकीसाठी चांगले लक्षण आहे. 'ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनल'ने 'भ्रष्टाचारावर वृत्तांकन करणाऱ्या पत्रकारांसाठी भारत एक धोकादायक' देश असल्याचे म्हटले आहे. अहवालानुसार, २०१२ पासून जगभरात मारल्या गेलेल्या ८२९ पत्रकारांपैकी ९० टक्के पत्रकार ५० पेक्षा कमी 'सीपीआय स्कोअर' असलेल्या देशांमध्ये घडले आहेत. या श्रेणीमध्ये भारत (३९), ब्राझील (३५), मेक्सिको (२७) आणि पाकिस्तान (२८) यांचा समावेश आहे. संघटनेचे म्हणणे आहे की पत्रकारांना लक्ष्य केले जाते तेव्हा जबाबदारी कठीण होते आणि भ्रष्टाचार वाढतो. अहवालात भ्रष्टाचार कमी करण्याबाबत अनेक देशांची प्रगती मंद असल्याचे वर्णन केले गेले आहे. त्यात इशारा देण्यात आला आहे, की जगभरातील लोक जबाबदारीच्या अभावाविरुद्ध संतप्त असून सरकारचा निषेध करत आहेत. भारतासाठी संदेश स्पष्ट आहे, रँकिंगमधील सुधारणा स्वागतार्ह आहे; परंतु ३९ चा स्कोअर सूचित करतो, की भ्रष्टाचारमुक्त होण्यासाठी अजून बराच पल्ला गाठायचा आहे.

आता एक नजर रोजगाराच्या बाजारपेठेवर. भारतीय अर्थव्यवस्था आणि नोकरी बाजारासाठी एक चांगली बातमी आहे. सांख्यिकी मंत्रालयाने जारी केलेल्या ताज्या आकडेवारीनुसार देशातील बेरोजगारीचा दर कमी झाला आहे. ऑक्टोबर-डिसेंबर २०२५ या तिमाहीतील रोजगार डेटा सकारात्मक चिन्हे दर्शवतो. या आकडेवारीनुसार ग्रामीण भारत आणि महिला कामगारविषयक निकषांमध्ये सुधारणा झाली आहे. सरकारी आकडेवारीवरून दिसून येते, की कामगार बाजार पुन्हा जागेवर येत आहे. अधिकृत आकडेवारीनुसार, १५ वर्षे आणि त्यावरील वयाच्या लोकांसाठी बेरोजगारीचा दर मागील तिमाहीच्या तुलनेत कमी झाला आहे. ग्रामीण भागात सुधारणांचा वेग अधिक आहे. ऑक्टोबर-डिसेंबर २०२५ मध्ये येथील बेरोजगारीचा दर चार टक्क्यांपर्यंत घसरला. तो मागील तिमाहीमध्ये ४.४ टक्के होता. पुरुष आणि महिला दोघांमध्येही वाढलेल्या रोजगारामुळे बेरोजगारीच्या दरात घट झाली आहे.

शहरांमध्येही परिस्थिती सुधारत आहे. शहरी बेरोजगारीचा दर मागील तिमाहीमध्ये ६.९ टक्क्यांवरून ६.७ टक्क्यांपर्यंत घसरला आहे. हे मुख्यत्वे शहरी पुरुषांमुळे झाले. त्यांचा बेरोजगारीचा दर ६.२ टक्क्यांवरून ५.९ टक्क्यांपर्यंत घसरला. या अहवालातील सर्वात उत्साहवर्धक पैलू म्हणजे कामगार दलात महिलांचा वाढता सहभाग. काम करणाऱ्या किंवा कामाच्या शोधात असलेल्या लोकसंख्येचे प्रमाण मोजणारा कामगार दल सहभाग दर (एलएफपीआर) वाढला आहे. ऑक्टोबर-डिसेंबर २०२५ दरम्यान एकूण 'एलएफपीआर' ५५.८ टक्क्यांपर्यंत वाढला. तो मागील तिमाहीमध्ये ५५.१ टक्के होता. विशेषतः, महिलांसाठी (१५ वर्षे आणि त्यावरील वयाच्या) हा दर ३३.७ टक्क्यांवरून ३४.९ टक्क्यांपर्यंत वाढला. यावरून दिसून येते, की महिला आता मोठ्या संख्येने कामगार दलात सामील होत आहेत. आकडेवारी दर्शवते की पारंपारिक क्षेत्रे रोजगार निर्मितीवर वर्चस्व गाजवत आहेत. ग्रामीण रोजगाराचा कणा म्हणून कृषी क्षेत्र राहिले आहे. या तिमाहीमध्ये ५८.५ टक्के रोजगार असलेले लोक शेतीत गुंतले असल्याचे आढळले. ते मागील तिमाहीतील ५७.७ टक्क्यांवरून वाढले आहे. लोक नोकरी शोधण्यापेक्षा स्वतःचे व्यवसाय सुरू करण्यास प्राधान्य देत आहेत. ग्रामीण भागात स्वयंरोजगार ६३.२ टक्के आणि शहरी भागात ३९.७ टक्के झाला आहे. रोजगाराचा आणखी एक महत्त्वाचा निर्देशक असलेले कामगार लोकसंख्या प्रमाण (डबल्यूपीआर) जुलै-सप्टेंबर २०२५ मध्ये ५२.२ टक्क्यांवरून ५३.१ टक्क्यांपर्यंत वाढला. बेरोजगारी दरात घट आणि 'डबल्यूपीआर'मध्ये झालेली वाढ यामुळे अर्थव्यवस्थेत रोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत, असे आढळते. तथापि, शेती आणि स्वयंरोजगारावरील वाढते अवलंबित्वदेखील संघटित क्षेत्रात अधिक संधींची आवश्यकता दर्शवते.

# महाराष्ट्र हा हिन्दुस्थानचे खड्ग झाला पाहिजे!

बाळ सिंगासने

स्वातंत्र्यवीर सावरकर हे महाराष्ट्र भूमीला पडलेले गोड, सुंदर स्वप्न होते. इंग्रजांच्या दास्यशृंखलात भारतीय जनता गुदमरलेली होती. सन १९५७ पासून भारतीयांनी स्वातंत्र्यासाठी बंड केलेले होते. हळूहळू त्याचा वणवा १९४७ सालापर्यंत धगधगत राहिला. या लढ्यांत झाशीची राणी, लोकमान्य टिळक, पंडित जवाहरलाल नेहरु, महात्मा गांधी, वल्लभभाई पटेल इत्यादी अनेक झुंजार नेत्यानी आपले सर्वस्व पणाला लावले. याच मालिकेत धिंग्रा राजगुरु, सुखदेव, वासुदेव फडके सारख्या क्रांतीविरानी बलिदान केले. या क्रांतीवीरात आणखी एक ज्योत प्रज्वलीत झाली होती ती म्हणजे 'स्वातंत्र्यवीर सावरकर! अथक प्रयत्नानंतर पुढे देशाला स्वातंत्र्य मिळाले.



नंतरच्या काळात एक सत्कार प्रसंगी स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणाले ' आपले राष्ट्र आता स्वतंत्र झालेले आहे. वीरांचे रक्त सांडून आम्ही ते मिळविले आहे.मात्र स्वातंत्र्य मिळल्यावर त्याचे रक्षण करणे अधिक कठीण आहे. यासाठी प्रत्येक व्यक्तीने कणश: कणश: झिजले पाहिजे. आपण भाग्यविधाते आहोत. छत्रपती शिवाजी राजेनी हिन्दुना स्वराज्य दिले. यापुढे अखंड भारत जातीभेद- धर्मभेद पंथभेद विसरुन एक ध्वजाखाली यावा आणि एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे तो अविचल रहावा. महाराष्ट्राचा तर इतिहासच शौर्यांनी ओथंबलेला आहे. सह्याद्रीच्या दगडांतून देखील चैतन्याच्या लाटा उसळत आहेत. संत रामदासही म्हणाले, 'बुडाला औरंग्या पापी। म्लेंच्छ संहार जाहला। हिन्दुस्थान बळावला।'' सुर्य व चंद्राबद्दल जसे प्रत्येकाला आकर्षण असते तसेच प्रत्येक जाती-धर्माबद्दलही असते. हिन्दुनी आपल्या धर्मांचे संस्कार जोपासणे हिताचे आहे. संत रामदासच सांगतात. 'मराठा तितुका मेळवावा । महाराष्ट्र धर्म वाढवावा ।' यासाठी मराठी मने वेळप्रसंगी सजग राहून कणखर बनली पाहिजेत. स्त्रीयांचे स्वातंत्र्य जपणेही तितकेच अनमोल आहे. आपल्या धर्मवीरांच्या कृतकृत्य पिढीने आपला देश स्वतंत्र झालेला आहे. यादेशासाठी हातावर शिर घेऊन लढण्याची ईषा सैनिक म्हणून आपण बाळगली पाहिजे. आपल्या मातृभूमीकडे कोणीही शत्रुत्वाने पहावयास धजूच नये, असे शस्त्रबळ सैन्यबळ प्रबळ केले तर त्यागी हुतात्म्यांना ती मानवंदनाच ठरेल'

स्वातंत्र्यवीर सावरकराचे हे अमूल्य विचार आज आपल्या कोट्यवधी देशप्रेमीनी जतन करुन राष्ट्रधर्म वाढविला पाहिजे हे कोणीही टाळता कामा नये. तारुण्याला शोभेलसा तेजस्वी बाणा ही महाराष्ट्राची ओळख आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे वक्तृत्वही गंगौद्याप्रमाणे ओजस्वी व प्रभावशाली होते. स्वातंत्र्य लढ्यांत ब्रिटीशानी त्यांनी कैद करुन अंदमान-निकोबारच्या तुरुंगात डांबले. भारतभूमीपासून दूर महासागर ओलांडून दूर ठिकाणी अन्य काही स्वातंत्र्यसैनिकांसोबत ठेवले. पण अस्वस्थ सावरकर थोडेच स्वस्थ बसणारे होते. त्यानी 'ने मजशी नेऽऽ परत मातृभूमीला।सागरा प्राण तळमळला।ऽऽऽ अशा गीत रचनेतून आपले मातृ-भू प्रेम व्यक्त केले. सावरकर हे प्रतिभाशाली कवीही होते. कल्पना सौंदर्य आणि ओजस्वीता हे त्यांच्या काव्यांतील वैशिष्ट्य आहे.'त्यांचा 'कमला' ही दीर्घ कवेताची किमया वाचकांना मोहांत पाडते. कवितेचा साज, शब्द सौंदर्य, उपमा, अलंकार अवर्णनीयच आहे.

वीररसाचा स्थाईभाव, अहंप्रभूतेची उत्कृष्ट भावना कल्पना शक्ती काव्यध्येय, शैली एकूणच सावरकरांच्या व्यक्तीमत्वाला शोभून दिसते. 'स्वातंत्र्य देवीस' उद्देशून ते म्हणतात 'जयोस्तुते महन्मंगले शिवास्पदे शुभ दे! स्वतंत्रते भगवती! त्वामंह यशो युतां वन्दे।।'

हा भक्ती भाव किती महान आहे हे आपण जाणतोच.

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी मराठी साहित्यांतली भर घातलेली आहे. कृष्णाक्ती, सिंहगडचा पोवाडा, भगतसिंग, हाय हा! जगन्नाथाचा रथोत्सव, मृत्युशय्येवर अशा कितीतरी कवीताप्रमाणेच काही प्रबोधनात्मक नाटके ही लिहिली सन्यस्तखडग, संगीत अतुरक्रिया ही नाटके उत्कृष्ट संवाद व भाषा वैभवाची प्रचिती देतात. 'माझ्या आठवणींतील नाशिक' या पुस्तकाद्वारे त्यांनी नाशिकच्या भू-भागाचे परिसराचे सुक्ष्म अवलोकन करुन नाशिकच्या ऐतिहासिक, पौराणिक, सांस्कृतिकतेचे दर्शन घडविले आहे.

अंधश्रद्धा निर्मुलनासाठी त्यांचा कटाक्ष होता. त्यांनी यासाठी काही कथा लिहून समाजमन जागे करण्याचा प्रयत्न केला. यामध्ये 'देवसकी आणि माणुसकी, विटाळाचे वेड ताबुतांची गोष्ट, व्रते आणि वैकल्ये, गाढव संघटन या कथा निश्चितच एक जागृतीसाठी अंजन आहे. अस मला वाटतं।

एकूणच स्वातंत्र्यवीर सावरकर हे भारतीय स्वातंत्र्यानंतरही 'हिंदु महासभेच्या माध्यमातून आपले सद्विचार प्रकट करीत होते. एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व म्हणून या देशभक्तासाठी म्हणूया!

**धन्य तू धन्य स्वातंत्र्यवीर सावरकर ।**
**पुण्यस्मरणी तुझ्या हृदयातूनी**
**शतदा नमस्कार ।।**

लोकसंसद

## भाषिक अस्मितेचा, सांस्कृतिक आत्मसन्मानाचा गौरव

भारताच्या दक्षिणेकडील राज्य असलेल्या मल्याळम भाषिक केरळ राज्याचे नाव आता अधिकृतपणे 'केरळम' झाले असून केंद्र सरकारने राज्याच्या या नव्या नावास नुकतीच मंजुरी दिली आहे. त्यामुळे आता मल्याळी भाषिकांच्या राज्याच्या नामबदलाच्या दीर्घकाळ मागणीचा, भाषिक अस्मितेचा आणि सांस्कृतिक आत्मसन्मानाचा गौरव झाला आहे. खरे तर स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील अनेक राज्यांची नावे कालानुरूप बदलली गेली आहेत. त्याचा इतिहासही अत्यंत रोचक आणि रंजक आहे. भारतावर दीडशे वर्ष राज्य केलेल्या इंग्रजांनी देशातील अनेक शहरांची, राज्यांची नावे चुकीच्या उच्चाराने, अपभ्रंशाने तर कधी जाणीवपूर्वक बदलली. त्यामुळे खंडप्राय अशा आपल्या भारतातील विविध राज्यांच्या स्थानिक संस्कृतीचा, भाषेचा वारसा जपण्यासाठी आणि मूळ अस्सल भारतीय नावे देण्यासाठी अनेक शहरांचे आणि राज्यांचे यथोचित नामकरण केले गेले. पूर्वीच्या युनायटेड प्रॉव्हिन्सेसचे नाव बदलून १९५० मध्ये उत्तर प्रदेश करण्यात आले. सेंट्रल प्रॉव्हिन्स आणि बेरारचे मध्य प्रदेश (१९५०), मद्रासचे तामिळनाडू (१९६९), म्हैसूरचे कर्नाटक (१९७३), उत्तरांचलचे उत्तराखंड (२०००) आणि ओरिसाचे ओडिशा (२०११) ही काही राज्यांच्या नामांतराची उदाहरणे. शहरांची आणि राज्यांची ही नवीन नावे म्हणजे भारताच्या दोन हजार वर्षांहून अधिक काळाच्या प्राचीन, ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि भाषिक आत्मसन्मानाचे संचित आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# गझल सम्राट ; पंकज उधास

आपल्या मलमली आवाजाने गझल गायकीला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवणारे संगीत रसिकांचे आवडते गझल गायक पंकज उधास यांचा आज दुसरा स्मृतिदिन. दोन वर्षापूर्वी २६ फेब्रुवारी २०२४ रोजी पंकज उधास यांचे वयाच्या ७२ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने संगीत विश्वातील एक तारा निखळून पडला. पंकज उधास हे भारतातीलच नाही तर जगातील एक प्रमुख गझल गायक म्हणून ओळखले जात होते. १९८६ साली आलेल्या नाम चित्रपटातील त्यांनी गायलेल्या चिठ्ठी आई है.... आई है...या गाण्याने ते घराघरात पोहचले. हे गाणे आजही तितकेच लोकप्रिय आहे. नाम चित्रपट यशस्वी होण्यात या गाण्याचा खूप मोठा वाटा होता. या गाण्यांनंतर त्यांनी हिंदी चित्रपटात अनेक गाणी गायली. घायल, साजन, ये दिल्लगी, फिर तेरी कहाणी याद आई, मोहरा यासारख्या चित्रपटातून त्यांनी गाणी गायली. त्यांनी गायलेले ना कजरे की धार, आज फिर तुमपे प्यार आता है, जिये तो जीये कैसे, और आहिस्ता अशी कितीतरी गाणी लोकप्रिय झाली व ही सर्व गाणी गाजली ती त्या गाण्यातील अर्थपूर्ण शब्दांनी आणि पंकज उधास यांच्या



मधुर आवाजाने. चित्रपटातील त्यांनी गायलेले गाणी लोकप्रिय झाली तरी त्यांची ओळख ही गझल गायक म्हणूनच राहिली. त्यांचे मोठे बंधू मनहर उधास हे देखील प्रख्यात गझल गायक आहेत त्यांनीच पंकज उधास यांना पहिल्यांदा स्टेजवर गझल गाण्याची संधी दिली. १९७१ साली त्यांनी कर्मा या चित्रपटात पहिल्यांदा पार्श्वगायन केले मात्र त्यांची दखल कोणी घेतली नाही त्यामुळे ते कॅनडाला निघून गेले. तिथे त्यांनी छोट्या मोठ्या समारंभात गाण्यास सुरुवात केली. तिथे ते स्टेज शो देखील करू लागले. त्यांचे स्टेज शो ही लोकप्रिय होऊ लागले. भारतात परतल्यावर त्यांनी अनेक स्टेज शो केले मात्र चित्रपटात त्यांना म्हणावी तशी संधी मिळत नव्हती कारण तो जमाना मोहंमद रफी आणि किशोर कुमार यांचा होता. १९७९ साली त्यांना जवाब या चित्रपटातील मितवा रे मितवा... हे गाणे गाण्याची संधी मिळाली या संधीचे त्यांनी सोने केले. हे गाणे लोकप्रिय झाल्यावर त्यांनी गझल क्षेत्रात करियर करण्याचा निर्णय घेतला. दरम्यान त्यांनी अनेक गझल गायली. पंकज उधास यांनी एक से बढकर एक गझल गात रसिकांना मंत्रमुग्ध केले. १९८० साली त्यांच्या गाण्याचा पहिला अल्बम आला. त्यानंतर त्यांच्या गाण्यांचा धडाका सुरू झाला. १९८१ साली मुकर्रर, १९८२ साली तरनुम, १९८३ साली महाफिल, १९८५ साली नायाब हे त्यांचे अल्बम आले. या अल्बम मधील सर्व गाणी रसिकांना आवडली. त्यांच्या गझला इतक्या लोकप्रिय झाल्या की रसिकांनी त्यांना गझल सम्राट ही पदवी दिली. सारं काही विसरायला लावणाऱ्या त्यांच्या गझला आजही रसिक गुणगुणताना दिसतात. त्यांनी आपल्या आवाजाने गझल क्षेत्राला आणि गझल गायकीला ऊर्जितावस्था मिळवून दिली. गझल गायकी लोकप्रिय करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. गझल गायन आणि संगीत क्षेत्रात त्यांनी भरीव योगदान दिले. त्यांच्या याच योगदानासाठी भारत सरकारने त्यांना पद्मश्री हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. त्यांच्या निधनाने संगीत आणि गायन क्षेत्राची कधीही भरून न निघणारी हानी झाली आहे. गझल सम्राट पंकज उधास यांना दुसऱ्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार, पुणे**

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**२६ फेब्रुवारी**

१) श्री.दत्तात्रय श्रीधर नवरे
अलिबाग, २६-०२-१९५७

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**कै. सुरेखा बाळाराम पाटील, स्मरणार्थ अलिबाग**

**श्री. अश्विन गांगजी लालन, वाढदिवस अलिबाग**

## लाच घेताना पोलीस उपनिरीक्षक जाळ्यात

**रत्नागिरी :** सावर्डे पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक मनीष कांबळे यांना २५ हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात अटक केली. मुंबई-गोवा महामार्गावरील असुर्डे येथे झालेल्या अपघातानंतर संबंधित कुटुंबीयांना विमा प्रक्रियेसाठी कागदपत्रांची गरज होती. ही कागदपत्रे देण्यासाठी २५ हजार रुपयांची मागणी करण्यात आली. यापैकी १५ हजार रुपये त्रयस्त व्यक्तीमार्फत स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी यांच्या पथकाने सापळा रचून कांबळे यांना पकडले. या प्रकरणात अभिजीत शिर्के याच्याविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे जिल्हा पोलीस दलात मोठी खळबळ उडाली असून सावर्डे परिसरात चर्चेला उधाण आले आहे.

# बनावट कॉल सेंटरवर छापा

## • परदेशी नागरिकांची फसवणूक करणारी टोळी जेरबंद

**। पालघर । प्रतिनिधी ।**

पालघरमधील माहीम परिसरात सुरू असलेल्या बनावट कॉल सेंटरवर पोलिसांनी छापा टाकून ५ जणांना अटक केली आहे. हे आरोपी कॉल सेंटरच्या माध्यमातून परदेशी नागरिकांची ऑनलाईन फसवणूक करून डॉलरमध्ये पैसे उकळत होते.

पालघर पश्चिमेतील माहीम परिसरात सुंदरम शाळेच्या लगत असलेल्या फिया एकांत या इमारतीमधील तिसऱ्या माळ्यावर बेकायदा कॉल सेंटर सुरू होते. या कॉल सेंटरमधून आर्थिक आणि सायबर फसवणुकीचे प्रकार सुरू होते. पालघरच्या स्थानिक गुन्हे शाखेला याबाबतची माहिती समजल्यानंतर सोमवारी रात्री १२ वाजता या इमारतीत छापा टाकला. या कारवाईत ५ आरोपींना अटक करण्यात आली असून, आरोपी



विदेशी नागरिकांना विविध आमिषे दाखवून आर्थिक गंडा घालत असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

आरोपींमध्ये भरत ललानी (३५) मीरा रोड, रोहित निंबाळकर (२९) नायगाव, रोहित झोन्हे (२३) मीरा रोड, अमरदीप गिल (२४) पंजाब आणि सागर पाठडिया (२९) यांचा समावेश आहे. पालघरचे पोलीस अधीक्षक यतीश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणी पालघर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पाचही आरोपींना अटक करून २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. पुढील तपास सुरू असून आणखी मोठा सायबर रॅकेट उघड होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

यापूर्वीही सीबीआयच्या पथकाने सप्टेंबर २०२५ मध्ये इगतपुरीमधील रेन फॉरेस्ट या पंचतारांकित हॉटेलमध्ये चालवल्या जाणाऱ्या बनावट कॉल सेंटरच्या अड्ड्यावर छापा टाकून पाचजणांना अटक केली होती. त्यामधील मीरा-भाईंदर येथील दोन आरोपींनी रायगड व पालघर जिल्ह्यात वरिष्ठ अधिकारी यांना हप्ता देऊन बनावट कॉल सेंटर चालवले जात असल्याची कबुली दिली होती.

### लाखोंचे साहित्य जप्त

छाप्यात ५.७२ लाख रुपये किमतीचे ४ लॅपटॉप, १२ मोबाईल फोन, ४ हेडफोन, राउटर व डोंगल जप्त करण्यात आले.

### फसवणुकीची हायटेक पद्धत

आरोपी स्वतःला मायक्रोसॉफ्ट किंवा ॲपल कंपनीचे प्रतिनिधी असल्याचे सांगून 'डिव्हाइस व्हायरसग्रस्त आहे' अशी भीती दाखवत. त्यानंतर Lawes, Apple, Nike, Amazon गिफ्ट कार्डच्या माध्यमातून किमान ५०० ते ४००० अमेरिकन डॉलर उकळून ती रक्कम यूएसडीटीमध्ये रूपांतरित करून हवालामार्गे रोख स्वरूपात मिळवत असल्याचे तपासात समोर आले आहे.

# महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

हुमाना पीपल टू पीपल इंडिया आणि मर्क स्पेशालिटीज प्रायव्हेट लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने मोहोपाडा नवीन पोसरीतील हनुमान मंदिराच्या सभागृहात परिसरात भव्य मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. महिलांच्या आरोग्याबाबत जनजागृती आणि तपासणीसाठी राबवण्यात आलेल्या या आरोग्य शिबिराला नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभला. या शिबिरात रक्तदाब, मधुमेह, स्तन तपासणी, सिकलसेल तपासणी तसेच गर्भाशय मुखाचा कर्करोग याची तपासणी करण्यात आली. तसेच तज्ज्ञ डॉक्टरांकडून मार्गदर्शन देण्यात आले.

या उपक्रमात डॉ. तृप्ती पोयरेकर (स्त्री रोग तज्ज्ञ व प्रसुती तज्ज्ञ) आणि डॉ. प्राची जोशी (स्त्री रोग तज्ज्ञ व



प्रसुतीतज्ज्ञ) यांनी सविस्तर तपासणी करून योग्य वैद्यकीय सल्ला दिला. प्रोजेक्ट लीडर पिंटू कुमार शर्मा, हेल्थ एक्सिलेटर मनीषा गणेश खंडागळे, कम्युनिटी मोबिलायझर तनिष्का तुळशीदास कर्णेकर आणि एमआयएस ऑपरेटर अर्णव गांगुली, हुमानाचे माजी कर्मचारी प्रवीण पवार यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

यावेळी ग्रुप ग्रामपंचायत वासांबे सरपंच उमा मुंढे, संदिप मुंढे, ग्रामपंचायत सदस्या रसिका राकेश खराडे, सदस्या प्रतीक्षा राऊत, सदस्या वेदिका पाटील, सदस्या मयुरा गोपाळे, वर्षा पाटील, सारिका कांबळे, उज्वला शेंडकर, मयुरी गोपाळे, नीलीमा पाटील, सुनिता पाटील, सुप्रिया खारकर, पूर्वा खाने व ममता काळोखे, प्रियंका तेलंगे, राजेश जगताप आदी उपस्थित होते.

हुमाना पीपल टू पीपल इंडिया आणि मर्क स्पेशालिटीज प्रायव्हेट लिमिटेड यांच्या विद्यमाने गेल्या दीड वर्षापासून आरोग्य जनजागृतीचे उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. प्रकल्प निरामया मुंबई पाताळगंगा अंतर्गत महिलांचे व किशोरवयीन मुलींचे आरोग्य गट तयार करून दरमहा प्रशिक्षण, गृहभेटी, जनजागृती रॅली, मोफत सॅनिटरी पॅड वाटप करणे, शाळा कॉलेजमध्ये मुलींसाठी आरोग्य प्रशिक्षण सत्र घेणे, असे उपक्रम राबविले जात आहेत.

## ट्रक अपघातात चालकाचा मृत्यू

**रत्नागिरी :** ओणी तिवंदामाळ येथील एका धाब्यासमोर रस्त्याच्या कडेला एक ट्रक उभा होता. त्याचवेळी गोव्याहून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या भारत बेंझ कंपनीच्या एका भरधाव ट्रकने उभ्या असलेल्या टाटा ट्रकला पाठीमागून धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, यात भारत बेंझ ट्रकच्या केबिनमध्ये अडकल्यामुळे या ट्रकच्या चालकाचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच राजापूर पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने बचावकार्य केले. अपघातग्रस्त वाहने रस्त्यावरून बाजूला हटवून महामार्गावरील विस्कळीत झालेली वाहतूक सुरळीत केली.

# लाल भेंडीकडे शेतकऱ्यांचा वाढता कल

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

दापोली विद्यापीठाच्या वाकवली प्रक्षेत्रात लाल भेंडीसह विविध भाज्यांवर संशोधन सुरू असून, उत्पादन, गुणवत्ता आणि बाजारमूल्य या तिन्ही बाबतीत लाल भेंडी समाधानकारक ठरत असल्याचे निष्पन्न झाले आहे. लाल भेंड आकर्षक रंगाबरोबरच पोषणमूल्यांनी समृद्ध पीक भविष्यात महत्त्वाचे ठरू शकते, असा विश्वास डॉ. चाळासाहेव सावंत कोकण कृषी विद्यापीठ येथील कृषितज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. पारंपरिक हिरव्या भेंडीला पर्याय म्हणून तालुक्यात लाल भेंडीच्या लागवडीकडे शेतकऱ्यांचा कल वाढताना दिसत आहे.

पुढील हंगामात सुधारित



वाणांचे बियाणे शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करून देण्याची तयारी सुरू आहे. मार्गदर्शन शिबिरे, प्रात्यक्षिके आणि तांत्रिक सल्ल्याद्वारे अधिकाधिक शेतकऱ्यांना या पिकाकडे वळविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. विद्यापीठाच्या वाकवली प्रक्षेत्रात लाल भेंडीसह विविध भाज्यांवर संशोधन सुरू असून उत्पादन, गुणवत्ता आणि बाजारमूल्य या तिन्ही बाबतीत लाल भेंडी समाधानकारक ठरत असल्याचे निष्पन्न झाले आहे. पुढील हंगामात सुधारित वाणांचे बियाणे शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करून देण्याची तयारी सुरू आहे.

# योजनांची माहिती देणारे फलक शाळांमध्ये लावावे

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

विद्यार्थ्यांसाठी शासनाच्या अनेक योजना असून त्यांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे गरजेचे आहे. यासाठी सर्व शाळांमध्ये प्रमुख पाच ते सहा योजनांची ठळक माहिती देणारे फलक प्रदर्शित केले जावे, असे निर्देश शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिले. शालेय शिक्षण विभागाच्या विविध योजनांबाबत आढावा बैठक मंत्रालयात झाली. यावेळी मंत्री दादाजी भुसे बोलत होते. बैठकीला शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजीतसिंग देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळाचे अध्यक्ष नंदकुमार बेडसे, शिक्षण संचालक (एनसीईआरटी) हेमंत वसेकर, शिक्षण संचालक (माध्यमिक) महेश पालकर, शिक्षण संचालक (प्राथमिक) शरद गोसावी, उपसचिव तुषार महाजन व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मंत्री दादाजी भुसे म्हणाले, विद्यार्थ्यांसाठी शासनाच्या वतीने अनेक योजना राबविल्या जातात. या योजनांची माहिती बऱ्याच वेळेला विद्यार्थ्यांना व पालकांना नसते. या योजनांपासून विद्यार्थी वंचित राहू नये म्हणून प्रयत्न केले जावे. यावेळी शालेय शिक्षण विभागाच्या संबंधित विविध बाबींची माहितीच सादरीकरणाद्वारे देण्यात आली.

# पोषणमूल्यांच्या अभावामुळे होणारा ॲनिमिया

**ॲनिमिया-रक्तक्षय किंवा पंडुरोग म्हणजेच शरीरातील हिमोग्लोबिनची मात्रा कमी करणारा आजार. रक्तक्षय होण्याची अनेक कारणे आहेत. पोषण मूल्यांच्या अभावामुळे होणारा ॲनिमिया म्हणजेच 'न्यूट्रिशनल ॲनिमिया' हा सर्वसामान्यपणे अतिशय प्रचलित असणारा पंडूरोगाचा एक प्रकार!!**

**डॉ. राजेंद्र चांदोरकर**

पौष्टिक तत्त्वांची अथवा मूल्यांची मनुष्याच्या शारीरिक व मानसिक वाढीसाठी खूप गरज असते. विशेषतः लहान मुलं, वयात आलेली मुलं/मुली, स्तनदा माता व गर्भवती स्त्रिया यांना या पोषक मूल्यांची खूप गरज असते ज्यामध्ये आयर्न (लोह), व्हिटामिन बी १२, फॉलिक ॲसिड इत्यादी मूल्यांचा मुख्यत्वे करून समावेश होतो.

नॅशनल फॅमिली हेल्थ सर्व्हेच्या एका सर्वेक्षणानुसार भारतामध्ये रक्तशयाचे प्रमाण खालील प्रमाणे आहे.

सहा महिने ते पाच वर्षे वयोगटातील मुलांमध्ये - ६७.१%
किशोरवयीन मुलांमध्ये - ३१.१%
किशोरवयीन मुलींमध्ये - ५९.१%
गर्भवती स्त्रियांमध्ये - ५२.२%
२० ते ४९ वयोगटातील पुरुषांमध्ये - २५%
२० ते ४९ वयोगटातील स्त्रियांमध्ये - ५७%

वर नमूद केलेल्या ॲनिमियाच्या टक्केवारीत पोषण मूल्यांच्या अभावाने दिसून येणारा रक्तक्षय हा स्वाभाविकपणे सर्रास पाहायला मिळतो.

आयर्न किंवा लोह या पोषक तत्त्वाविषयी सांगायचं झालं तर ते हिरव्या पालेभाज्या, नाचणी, सफरचंद, बीट, बीन्स, बदाम, काजू, शेंगदाणे, गुळ इत्यादी शाकाहारी पदार्थांमध्ये तसेच मासे, मटण, चिकन, अंडी इत्यादी मांसाहारी पदार्थांमध्ये मुबलक प्रमाणात असते.

व्हिटामिन बी १२ हे मात्र अंडी, मासे, मटण, दूध यामध्ये मुबलक प्रमाणात असते तर फॉलिक ॲसिड हे हिरव्या पालेभाज्या, ब्रॉकोली, तृणधान्य, डाळी-कडधान्य, ड्रायफ्रूट्स, सिट्रस फ्रुट्स (संत्र, मोसंब, अननस, लिंब, पेरू इत्यादी), अंडी, केळं, यामध्ये अधिक व चांगल्या प्रमाणात असतं.

आपल्या आहारात वर नमूद केलेल्या पदार्थांचा समतोल साधला गेला पाहिजे व या अनुषंगाने योग्य तो समतोल आहार घेतला पाहिजे याची खात्री करणं पर्याप्त होऊन जातं. जेव्हा आहारात या पोषण मूल्यांचा समतोल साधू शकला जात नाही तेव्हा आपल्याला न्यूट्रिशनल ॲनिमियास समोर जावं लागतं.

आता जाणून घेऊयात ॲनिमियात दिसून येणाऱ्या काही सर्वसामान्य लक्षणांविषयी...

थकवा येणे, अशक्तपणा वाटणे, श्वास घेण्यास त्रास होणे, हृदयाचे ठोके वाढणे, चिडचिडेपणा येणे, भूक मंदावणे, शरीराला सफेदी येणे, शरीर निस्तेज वाटणे, डोकं दुखणे, चक्कर येणे, तापामध्ये झटका येणे, काविळचा त्रास जाणवणे, पोटात दुखणे, कार्यक्षमता कमी होणे, शरीराची प्रतिकारशक्ती कमी होणे



इत्यादी लक्षणं वारंवार दिसून येतात.

आता फक्त लोहाच्या कमतरतेविषयी सांगायचं झालं तर लहान मुलांमध्ये अभ्यासामध्ये अडचणी निर्माण होणे, चंचलता वाढणे, शरीराची प्रतिकारशक्ती कमी होऊन विविध जंतू संसर्गाचे आजार होणे, तापामध्ये झटके येणे इत्यादी लक्षणं सर्वसामान्यपणे आढळून येतात. तर हातापायाला मुंग्या येणे, त्वचेचा रंग काळपट होणे तसेच मेंदू व मज्जारज्जुशी संबंधित काही लक्षणं ही व्हिटॅमिन १२ च्या कमतरतेमुळे दिसून येतात. लोहाच्या कमतरतेमुळे रक्तक्षय झाला की मुलं सत्व नसलेले पदार्थ खायला लागतात, त्यामुळे त्यांना जंत होतात, मुलांनी सेवन केलेल्या अन्नातील सत्व जंत शोषून घेतात व या सर्वाचा विपरीत परिणाम मुलांच्या वाढीवर व मानसिकतेवर होतो ज्याचा आपण सर्वांनी सखोल विचार करणं गरजेचं आहे. न्यूट्रिशनल ॲनिमियाचं नियंत्रण करण्यासाठी लेखाच्या सुरुवातीस नमूद केलेल्या वयोगटातील व्यक्तींना रक्तक्षय आहे किंवा नाही हे पाहणं खूप गरजेचे होऊन जाईल. विशेष करून सहा महिने ते पाच वर्ष वयोगटातील मुलांमध्ये, वयात आलेल्या मुला-मुलींमध्ये तसेच गर्भवती स्त्रियांमध्ये न्यूट्रिशनल अनेमिया संदर्भात स्क्रिनिंग करणं खूप गरजेचं आहे. सहा महिने ते पाच वर्षापर्यंत असलेल्या मुला-मुलींमध्ये रक्तक्षय आहे किंवा नाही हे लहान मुलांच्या डॉक्टरांकडून माहीत करून घेणं पालकांसाठी ईष्ट राहील. अंगणवाडी सेविकांचा सुद्धा सहभाग यामध्ये अतिशय महत्त्वाचा होऊन जातो. गर्भवती स्त्रियांमध्ये रक्तक्षय आहे किंवा नाही हे पडताळून पाहण्यामध्ये स्त्रीरोग व प्रसुती शास्त्रतज्ज्ञ यांचं योगदान खूप महत्त्वाचे बनून जाते. खाजगी दवाखान्यात या लाभार्थींचे उपचार करणे सोपे असते. परंतु पोषणमूल्यांच्या अभवामुळे होणाऱ्या न्यूट्रीशनल ॲनिमिया या विकाराच्या उपचारांपासून एकही लाभार्थी वंचित राहू नये, यासाठी बच्चावात्मक पवित्रा म्हणून सरकारने 'ॲनिमियामुक्त भारत' हा उपक्रम चालू केला आहे. त्याचा लाभ शाळेतील सर्व मुलांनी तसेच गर्भवती स्त्रियांनी व स्तनदा मातांनी घेणं खूप गरजेचे आहे.

'ॲनिमियामुक्त भारत' या उपक्रमाद्वारे आयर्न व फॉलिक ॲसिड यांचे सिरप (औषध) व टॅबलेट्स (गोळ्या) लाभार्थींपर्यंत पोहोचवण्याचं काम अंगणवाडी सेविका तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली करतात. या उपक्रमाअंतर्गत लहान मुलांना जंताचं औषध व गोळ्यादेखील पुरवल्या जातात. रक्तक्षय अथवा पंडूरोग याविषयी तसेच पोषण मूल्यांच्या अभावी होणाऱ्या रक्तक्षयाच्या 'न्यूट्रिशनल ॲनिमिया' याविषयी सोशल मीडियाचा वापर करून जनजागृती केली जाते. विशिष्ट वयोगटात ॲनिमिया संदर्भात स्क्रीनिंग सुद्धा केली जाते.

विशेषतः अंगणवाड्या, शाळा, कॉलेजेस इत्यादी ठिकाणी संमोहनासाठी/समुपदेशनासाठी शिबिरे आयोजित केली जातात ज्यामध्ये तज्ज्ञ डॉक्टर्स हे पालक व मुलांना मार्गदर्शन करतात व नियमितपणे योग्य व समतोल आहार तसेच आयर्न तसेच फॉलिक ॲसिड सप्लीमेंट्स घेणं किती गरजेचं आहे, याविषयी माहिती देतात. या अनुषंगाने सरकारी प्लॉसिज बनवताना इंडियन अकॅडमी ऑफ पेडियाट्रीशियन्समधील तज्ज्ञ डॉक्टरांना देखील विश्वासात घेतले जाते व भविष्यात ॲनिमियाचे निवारण करण्यासाठी योग्य ती पावले उचलली जातात.

चला तर मग... सरकारच्या ॲनिमियामुक्त भारत या उपक्रमास आपण हातभार लावूयात व पोषण मूल्यांच्या अभावाने होणाऱ्या रक्तक्षयास हद्दपार करूयात!!

## निवडक

### पैशांसाठी अल्पवयीन मुलींचा सौदा

**नवी मुंबई :** नवी मुंबईच्या कोपरखैरणे परिसरात धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. एका व्यक्तीने त्याच्या दोन अल्पवयीन मुलींना पैशांसाठी वेश्या व्यवसायात ढकलले आहे. एका दलालामार्फत तो त्याच्या मुलींना वेगवेगळ्या ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याचे काम करत होता. या प्रकरणी पोलिसांनी छापेमारी करत दोन्ही मुलींची सुटका केली आहे. पोलिसांनी आरोपी दलालाला अटक केली आहे. तर मुलींचा सौदा करणारा आरोपी वडील फरार असून पोलीस त्याचा कसून शोध घेत आहेत. नवी मुंबईच्या बेलापूर परिसरात काही अल्पवयीन मुलींकडून वेश्या व्यवसाय करून घेतला जात असल्याची गुप्त माहिती नवी मुंबई पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी छापा टाकला. यावेळी १६ आणि १४ वर्षांच्या दोन अल्पवयीन मुलींकडून वेश्याव्यवसाय करवून घेतला जात असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. पोलिसांनी कसून तपास केला असता यामागे याच मुलींचा नराधम बाप असल्याचे उघड झाले आहे. नवी मुंबईतील कोपरखैरणेमध्ये राहणारा हा नराधम बाप पोटच्या मुलींचा पैशांसाठी सौदा करत होता. त्याने दीड लाखाला मुलीचा सौदा केला होता. त्यातील सव्वा लाख त्याला मिळाले तर २५ हजार रुपये दलालाला देण्यात आले होते. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

### गोवा बनावट दारूचा साठा जप्त



**रत्नागिरी :** मुंबई-गोवा महामार्गावर सावर्डे पोलिसांनी एक मोठी कारवाई केली आहे. वहाळ फाटा उड्डाणपुलावर रचलेल्या सापळ्यात ५ लाख ८६ हजार ७२० रुपयांच्या मुद्देमालासह एका संशयिताला ताब्यात घेण्यात आले आहे. मुंबई-गोवा महामार्गावरून एका वाहनातून गोवा बनावटीच्या विदेशी मद्याची तस्करी केली जात असल्याची गोपनीय माहिती सावर्डे पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आबासाहेब पाटील यांना मिळाली होती. या माहितीची खातरजमा करून सावर्डे पोलिसांनी मंगळवारी (दि.२४) दुपारी १२:३० वाजण्याच्या सुमारास वहाळ फाटा उड्डाणपुलावर सापळा रचला. यावेळी संशयित क्रेटा गाडी थांबवून तिची झडती घेतली असता, त्यात मोठ्या प्रमाणात विदेशी मद्य आढळून आले. पोलिसांनी या कारवाईत गोवा बनावटीचे विदेशी मद्य, क्रेटा गाडी असा पाच लाखांहून अधिकचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी वाहन चालक समुंदर सिंग श्यामसिंग राठोड (वय २४, राहणार: पेडणे, गोवा; मूळ गाव: जि. पाली, राजस्थान) याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याच्याविरोधात सावर्डे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### केंद्र उतेखोलचा बाल आनंद मेळावा




**विद्यार्थ्यांनी लुटला खेळांचा आनंद**

**माणगाव :** रा.जि.प. केंद्र उतेखोल तालुका माणगाव या केंद्राचा वार्षिक बाल आनंद मेळावा व विविध कार्यक्रम बुधवारी (दि.२५) कुणबी भवन हॉल, निजामपूर रोड माणगाव याठिकाणी मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात साजरा झाला. या मेळाव्यात केंद्र उतेखोलमधील १३ शाळांच्या बाल-गोपाळ विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम व गमतीदार खेळांचा विद्यार्थ्यांनी मनमुराद आनंद लुटला. यावेळी मार्गदर्शन करताना मेळाव्याचे उद्घाटक प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा यांनी आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देऊन केंद्रप्रमुख शंकर शिंदे व सहकारी यांनी चांगल्याप्रकारे या बाल आनंद मेळावा कार्यक्रमाचे आयोजन केल्याचे सांगत अशा कार्यक्रमातूनच विद्यार्थी पुढे जात असल्याचे सांगितले. माणगाव पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट यांनी आपल्या मार्गदर्शनात बोलताना या बाल आनंद मेळाव्याने विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळत असल्याचे सांगितले. या स्पर्धातूनच विद्यार्थ्यांना धाडस निर्माण होत असते असे सांगत त्यांनी बाल आनंद मेळाव्याला शुभेच्छा दिल्या. या मेळाव्यात केंद्र उतेखोल शाळेतील राजिप शाळा उतेखोल, विकास कॉलनी, गिरिजनवाडी, बामणोली, जुने माणगाव, खांदाड, कळमजे, नाणोरे, चव्हाणवाडी, खर्डी बुद्रुक, उतेखोलवाडी, उतेखोल आदिवासीवाडी, खर्डी बुद्रुक आदिवासीवाडी या १३ शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन अप्रतिम वेषभूषेसह सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून विविध गमतीशीर खेळांचाही मनमुराद आनंद घेतला.

### महिलांसाठी 'धुळवड' उत्सवाचे आयोजन

**माथेरान :** महिलांना एकत्र आणत उत्साहात होळी साजरी करण्यासाठी क्रांतीज्योती महिला विकास फाउंडेशनतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही महिलांसाठी खास 'धुळवड' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम मंगळवार दि.३ मार्च रोजी फाउंडेशनच्या कार्यालयात, सेक्टर १६, नवीन पनवेल, पिल्लई कॉलेजजवळ आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी फक्त महिलांनाच प्रवेश दिला जाणार असून 'महिला स्पेशल धुळवड' म्हणून हा उत्सव साजरा केला जाणार आहे. कार्यक्रमात डीजे म्युझिक, विविध मनोरंजनात्मक उपक्रम (फन ॲक्टिव्हिटीज) तसेच स्वादिष्ट नाष्ट्याची व्यवस्था करण्यात आली आहे. होळीचा आनंद सुरक्षित आणि आनंददायी वातावरणात महिलांनी मनमुराद लुटावा, हा यामागील मुख्य उद्देश आहे. कार्यक्रमासाठी विशेष 'होळी स्पेशल ग्रुप' तसेच वॉट्सअॅप ग्रुपची सोय करण्यात आली आहे, जेणेकरून अधिकाधिक महिलांनी यात सहभागी व्हावे. अधिक माहितीसाठी ८६५२४१४३४३ या दूरध्वनीवर संपर्क साधावा. तरी महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धुळवडीचा आनंद घ्यावा, असे आवाहन या उपक्रमाच्या आयोजक रुपाली शिंदे (अध्यक्ष, क्रांतीज्योती महिला विकास फाउंडेशन) यांच्याकडून करण्यात आले आहे.

### ज्येष्ठ नागरिकांची धार्मिक सहल

**खांब :** रोहा तालुक्यातील संभे येथील ज्येष्ठ नागरिकांनी उत्तर भारत धार्मिक सहलीचा आनंद घेतला. किर्तनकार व समाजप्रबोधनकार हभप रायगड भूषण दहिंबेकर महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत व पो.पाटील अनंत सानप आणि सामाजिक कार्यकर्ते विलास दहिंबेकर यांच्या मार्गदर्शनाखाली अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने सहल आयोजित करण्यात आली होती. या धार्मिक सहलीमध्ये संभे गावासह संपूर्ण तालुक्यातून मोठ्या संख्येने भाविक भक्त या सहलीमध्ये सहभागी झाले होते. नियोजनानुमार सर्वप्रथमन पाली बल्लाळेश्वर गणपतीचे दर्शन घेऊन पुढे महड, त्र्यंबकेश्वर, ओंकारेश्वर, उज्जैन, आग्रा, मथुरा, दिल्ली, गोकूळ, हरिद्वार, ऋषीकेश, अयोध्या, काशी, गया, प्रयागराज, चित्रकुट, खजुराहो, रामटेक आणि शेवटी शेगाव येथील गजानन महाराज आणि शिर्डी येथील साईबाबांचे दर्शन घेतले.

# बसस्थानक परिसरात बेकायदा वाहतूक

## ।। खासगी वाहनांवर कारवाईची मागणी ।। पैशावरून रिक्षाचालक प्रवाशांमध्ये वाद

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड बसस्थानक परिसरातून भाडे वाहतूक करणाऱ्या खासगी वाहनांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी महाड तालुका रिक्षा युनियन, रिक्षा चालक मालक संघ, स्वराज्य रिक्षा संघटना आदी संघटनांनी निवेदनाद्वारे महाड शहर पोलीस ठाण्याकडे केली आहे.



१९ फेब्रुवारी २०२६ रोजी पहाटे छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त गडाकडे जाणाऱ्या प्रवाशांची गर्दी असताना काही प्रवाशांची शेवटची गाडी चुकली. त्यावेळी एका खासगी इर्टिका वाहनचालकाने त्यांना गडावर नेण्याचा प्रयत्न केला. रिक्षा स्टॉपवरील रिक्षा चालकांनी त्या वाहतूक करणाऱ्या खासगी वाहनचालकाला रोखण्याचा प्रयत्न केला.

दरम्यान यावेळी रिक्षा चालक व खासगी वाहन चालक यांच्यामध्ये बाचाबाची होऊन हाणामारी झाली. याप्रकरणी संतप्त महाड रिक्षाचालक व महाड तालुका रिक्षा युनियन, रिक्षा चालक मालक संघ, स्वराज्य रिक्षा संघटना आदी संघटनांच्या वतीने महाड शहर पोलिसांना निवेदन सादर करत बसस्थानक परिसरात खासगी वाहनांकडून बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या वाहन चालकांबविरोधात कारवाई करण्याची मागणी केली आहे.

दरम्यान महाडमध्ये बेकायदेशीर भाडे वाहतूक होत असून याबाबत यापूर्वीही शहर पोलीस, शहर वाहतूक पोलीस, उपविभागीय पोलीस अधिकारी, रायगड पोलीस अधीक्षक तसेच पेण आरटीओ कार्यालयाकडे तक्रारी करण्यात आल्या आहेत; मात्र अद्याप ठोस कारवाई झालेली नाही, असा आरोप संघटनानडून करण्यात आला आहे. भविष्यात अशा प्रकारांमुळे अनुचित घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोणाची, असा सवालही सर्व संघटनांनी उपस्थित केला आहे.

### दर फलक लावण्याची मागणी

महाड शहरालगत असणाऱ्या दादली, शिरगाव, गंधारपाले, साहिल नगर, मोहप्रे, करंजखोल, लाडवली, सुंदर वाडी, चांभारखिंड या गावांमध्ये तसे शासकीय रुग्णालय येथे जाणाऱ्या प्रवाशांना देखील या रिक्षा चालकांकडून दर निश्चित नसल्यामुळे पैशावरून सतत रिक्षाचालक व प्रवाशांमध्ये वाद होण्याचे प्रकार घडलेले आहेत. याप्रकरणी आता प्रवाशांकडून देखील अशी मागणी होत आहे की प्रत्येक रिक्षा स्टँडवर अथवा रिक्षामध्ये जवळच्या प्रवासाला किलोमीटर मागे किती भाडे असावे याचे दर फलक लावण्याची मागणी केली आहे.

# एसटी बंद पडल्याने विद्यार्थ्यांचे हाल

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

सध्या दहावी, बारावीच्या परीक्षा सुरू असून बुधवारी (दि.२५) रोजी दहावीचा पेपर होता. पेपर देण्यासाठी निघालेल्या विद्यार्थ्यांना घेऊन निघालेला एसटी गाडीमध्ये बिघाड झाल्याने विद्यार्थ्यांचे हाल झाले. कळंब येथून नेरळकडे येत असलेल्या एसटी गाडीला पोशीर जवळ बिघाड झाला. त्यानंतर विद्यार्थ्यांना पायपीट करून परीक्षा केंद्र गाठावे लागले.



सकाळची वेळ शक्यतो आपल्या निश्चित ठिकाणी जाण्याची प्रत्येकाची धावपळ असते. त्यात सध्या दहावीच्या परीक्षेचा पेपर आहेत. त्यामुळे परीक्षा केंद्रावर जाणाऱ्या विद्यार्थ्यांची मोठी संख्या असते.

एसटीचे चालक आणि वाहकांनी गाडी सुरू करण्याचा प्रयत्न केला. मात्र गाडी तास झाला तरी सुरू होत नव्हती. या गाडी मधून नेरळकडे जाणारे शहजाद लोगडे या तरुणाने रस्त्यावर उतरून पोशिर नेरळकडे जाणाऱ्या वाहनांना थांबवून एसटीमधून प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांना पाठवून देऊ लागले. परीक्षेची वेळ जवळ येत असल्याने अनेक विद्यार्थ्यांनी तेथून पायी वारी देखील सुरू केली. मात्र दीड दोन किलोमीटर अंतराचा प्रवास आणि त्यानंतर परीक्षा द्यायची असल्याने रस्त्याने जाणारे वाहनचालक यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत होता. अनेक दुचाकी चालक तसेच कार चालक हे विद्यार्थ्यांना घेऊन पोशिर विद्यालयाच्या जवळ सोडतानाचे आशादायक चित्र एसटी गाडी बंद पडल्यानंतर दिसून येत होते.

> “अचानक बंद पडलेल्या एसटीमध्ये २५ च्या आसपास विद्यार्थी होते. ते सर्व परीक्षा देण्यासाठी निघाले होते. ओलमनपासून बोरगाव आणि वारे भागातील हे विद्यार्थी परीक्षा देण्यासाठी निघाले होते. साधारण दहाहून अधिक गावातील विद्यार्थी एसटी गाडी बंद पडल्याने तेथे थांबून होते.”
>
> –शहजाद लोगडे
> स्थानिक रहिवाशी

### कंत्राटदारामुळे गमावला डोळा

**पनवेल** : खारघरमधील एका नामवंत गृहनिर्माण सोसायटीत सुरू असलेल्या दुरुस्ती कामातील कंत्राटदाराच्या निष्काळजीपणामुळे एका ८८ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाला आपला एक डोळा गमवावा लागल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात संबंधित कंत्राटदार कंपनीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खारघर सेक्टर ४ येथील रेलविहार गृहनिर्माण सोसायटीमध्ये इमारतीच्या दुरुस्तीचे काम सुरू होते. सोसायटीत राहणारे ८८ वर्षीय नागरिक घराजवळ कामासाठी वापरण्यात येणारा बांबू उडून त्यांच्या डोळ्याला आणि हनवटीला गंभीर दुखापत झाली. या प्रकरणाची दखल घेत खारघर पोलिसांनी कंत्राटदार विरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.



# पीएनपीच्या विद्यार्थ्यांचे विज्ञान प्रदर्शनात यश

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

एल्डेगिव्ह आणि अगस्त्य इंटरनॅशनल फाऊंडेशन आयोजित विज्ञान प्रदर्शन स्पर्धेत पीएनपी होली चाईल्ड इंग्रजी माध्यम शाळा वेश्वीच्या विद्यार्थ्यांनी अलिबाग तालुक्यांत शाळेचा मान उंचावत घवघवीत यश संपादन केले. माध्यमिक विभागा मधून अर्णव महेंद्र पालकर व साईश नित्यानंद झुरे यांनी यश संपादन करून प्रथम क्रमांक मिळून रोख रक्कम १०,००० रुपये पारितोषिक प्राप्त केले. प्राथमिक विभागामधून दिनेश राऊत व श्लोक भगत यांनी यश संपादन करून तृतीय क्रमांक मिळून रोख रक्कम ५,००० रुपये पारितोषिक प्राप्त करून घवघवीत यश संपादन केले. या नेत्रदीपक यशाबद्दल पीएनपी संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा नृपाल पाटील, निसर्गा चेवले, शर्मिला शेटे व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### देशमुख नर्सिंग होममध्ये मोफत डायलेसिस

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाडमधील देशमुख नर्सिंग होम हे हॉस्पिटल १९६० पासून गोर गरिब व सामान्य रुग्णांना कमी खर्चात वैद्यकिय सेवा देत आहे. या रुग्णालयाची सुरुवात दिवंगत डॉ. ए. ए. देशमुख यांनी केली. डॉ. देशमुख कोकणातील ज्येष्ठ डॉक्टर होते. ते सामान्य जनतेला परवडेल अशा खर्चात ते रुग्ण सेवा देत होते. त्यानंतर देशमुख कुटुंबिय ही सेवा आजपर्यंत देत आहेत. २०१२ साली डॉ. देशमुख यांच्या निधनानंतर डॉ. ए.ए. देशमुख चॅरिटेबल ट्रस्ट द्वारे देशमुख कुटुंबीय ही सेवा देत आहे. शासनाच्या महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ पात्र रुग्णांना या हॉस्पिटलमधून मिळत आहे. मुंबईतील पेक्स किडनी संस्थेच्या सहकार्यातून या हॉस्पिटलमध्ये डायलेसिस सेंटर सुरू असून त्यासाठी सहा बेडची व्यवस्था असून येथील डॉक्टर सेवाकार्ड व शासकिय पात्र लाभार्थ्याला मोफत व अन्य रुग्णांना माफक दरात देत आहेत.



### डॉक्टरांनी घेतली महापौरांची भेट

**पनवेल** : पनवेल डॉक्टर्स जनरल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन ने पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितिन पाटील यांची सदिच्छा भेट घेतली. संघटनेचे अध्यक्ष डॉ.वैभव मोकल यांनी संघटनेविषयी व संघटना करत असलेल्या विविध सामाजिक उपक्रमांविषयी माहिती दिली. सदर भेटीत डॉ. आशिष गांधी, डॉ. लक्ष्मण आवटे, डॉ. मिलिंद जोशी, डॉ. टिपणीस, डॉ. बहाडकर, डॉ. भावेश ठक्कर, डॉ.राजेश गांधी, डॉ. पटेल, डॉ. ओक, डॉ आशिष भगत, डॉ शेख, डॉ. सोमवंशी, डॉ वसंत पाटील, डॉ.अमित दवे उपस्थित होते.

# शिघ्रे येथे आरोग्य शिबिराचे आयोजन

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड तालुक्यातील शिघ्रे ग्रामपंचायतीमध्ये उज्वल जनसेवा कल्याण संस्थेच्या वतीने आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला महिलांनी लाभ घेतला. यावेळी शिघ्रे ग्रामपंचायत सरपंच गुलाब वाघमारे, उपसरपंच हाफीज कबले, डॉ. देवेंद्र खरे, डॉ. सतीशचंद्र कीर, डॉ. अदिती कीर, डॉ. डायना, संदीप पाटील स्वयंसेवक उपस्थित होते. या आरोग्य शिबिरामध्ये रुग्णांना मोफत औषधे देण्यात आल्याचे डॉ. देवेंद्र खरे यांनी सांगितले.



या शिबिरामध्ये रुग्णांची रक्तदाब, मधुमेह विविध आरोग्याची तपासणी करण्यात आली. सरपंच वाघमारे यांनी सांगितले की, सामाजिक बांधिलकी जपत उज्वल जनसेवा कल्याण संस्थेच्या वतीने आरोग्य शिबीराचे आयोजन हाती घेतला आहे. गरजू आणि ग्रामीण भागातील लोकांना आरोग्य संबंधित सुविधा उपलब्ध करून देण्याचा उद्देश समोर ठेवून ही संस्था काम करित आहे.

# नागोठणे पोलिसांची दमदार कामगिरी

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

नागोठणे पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या अज्ञान मुलगी अपहरित प्रकरणी नागोठणे पोलिसांनी वैज्ञानिक व तांत्रिक तपासाच्या आधारे त्या मुलीचा शोध सहा तासांच्या आत लावण्याची दमदार कामगिरी केली आहे. या अपहरित मुलीला सुखरूपपणे तिच्या आई वडिलांच्या ताब्यात देण्यात आली आहे. नागोठणे पोलिसांनी केलेल्या या दमदार कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत असून नागोठणे पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी व या प्रकरणाच्या टीममध्ये सहभाग असलेल्या पोलिसांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

यासंदर्भात नागोठणे पोलीस ठाण्यातून उपलब्ध झालेल्या माहितीनुसार अपहरित बालिका हिचा शोध घेणे कामी पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रसाद गोकुळे यांचे मार्गदर्शनाखाली नागोठणे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी यांनी तात्काळ दोन पथके रवाना करून सीसीटीव्ही फुटेज याचे आधारे गुन्ह्यातील अपहरित मुलगी हिचा शोध सुकेळी परिसरात घेतला होता. त्यानुसार सदर मुलगी ट्रकने पनवेल येथे गेली असल्याचे समजल्याने पनवेल येथून शिवडी मुंबई परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासणी केली. शिवडी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासणी करून शोध घेतला असता ती शिवडी परिसरामध्ये झोपडपट्टी भागामध्ये मिळून आलेली आहे. अपहरित मुलगीस शिवडी पोलीस ठाण्यात नेऊन जवळच्या सरकारी रुग्णालयांमध्ये तिची वैद्यकीय तपासणी करून सदर मुलगी हिला सुखरूप तिला आई-वडिलांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

आई वडील रागावल्यामुळे सदर मुलगी घरातून रागावून निघून गेली असलेलेची माहिती सदर मुलीने दिली. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रसाद गोकुळे यांचे मार्गदर्शनाखाली नागोठणे प्रभारी अधिकारी स.पो.नि सचिन कुलकर्णी, गोटीराम पावरा, संचिता सानप, चंद्रशेखर नागावकर यांनी केलेली असून रायगड पोलीस दलातिला नागोठणे पोलीस ठाण्यांनी केलेल्या कारवाईचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

### तळोजात दहशतीचे वातावरण

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

तळोजा सेक्टर २ येथील एका नामांकित गृहसंकुलात शुल्लक कारणावरून सुरू झालेला वाद थेट चाकू आणि कोयत्याने हल्ला झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या धक्कादायक घटनेत तिघेजण जखमी झाले असून हल्लेखोर कुटुंब फरार आहे. घटनेनंतर सोसायटीत भीती आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. तळोजा येथील सेक्टर २ मधील ऑलिव्ह पॅराडाईस सोसायटीमध्ये काही रहिवासी नेहमीप्रमाणे परिसरात उभे होते. त्याचवेळी सोसायटीतील एका महिलेने केलेल्या टिप्पणीमुळे वादाला तोंड फुटले. या टिप्पणीवर प्रत्युत्तर दिल्यानंतर शब्दांची देवाणघेवाण चिघळली. याच दरम्यान शशी सिंग या सदनिकाधारकाने खिशातील चाकूची मूठ गौरव सिंग यांच्या डोक्यावर मारली.

उपस्थित रहिवाशांनी तातडीने हस्तक्षेप करून भांडण थांबवले. मात्र काही वेळातच पुन्हा शिवीगाळ सुरू झाल्याने वाद तीव्र झाला. शशी याने आपल्या दोन २२ वर्षीय मुलांना चिथावणी दिल्यानंतर त्यांनी चाकू आणि कोयत्याने हल्ला करत पुजा आणि जितेंद्र पितळे या दाम्पत्यांना जखमी केले. या प्रकरणी शशी, त्यांची पत्नी व दोन मुलांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## हवामानातील बदलामुळे बागायतदार चिंतेत | मोहराच्या संरक्षणासाठी नियोजनबद्ध फवारणी आवश्यक

# ‘भुरी’मुळे आंबा काळवंडणार

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

हवामानातील सततचे चढ-उतार, पहाटेचे दाट धुके आणि दिवसाच्या तापमानातील अचानक वाढ यामुळे माणगाव तालुक्यातील आंबा बागायतदारांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. तालुक्यात सुमारे ७०९ हेक्टर क्षेत्रावर आंबा बागायती असून, संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये जवळपास ९,७७५ हेक्टर क्षेत्र आंबा उत्पादनाखाली आहे. सध्या बहुतांश बागांमध्ये मोहर बहरात असून काही ठिकाणी लहान फळधारणा सुरू झाली आहे. मात्र बदलत्या हवामानामुळे मोहरावर कीडरोगांचा प्रादुर्भाव वाढू लागला आहे.



मावा आणि भुरीचा वाढता प्रादुर्भाव गेल्या काही दिवसांपासून सकाळ-संध्याकाळ दाट धुके आणि वातावरणातील आर्द्रता वाढल्याने आंबा पिकावर मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. मावा किडीमुळे फुलोऱ्यावर चिकट थर तयार होतो आणि त्यातून बुरशीजन्य रोगांचा प्रसार वेगाने होतो. परिणामी मोहर कोमेजतो, गळतो आणि फळधारणा कमी होते. याचबरोबर भुरी रोगाचा प्रादुर्भावही वाढत आहे. भुरीमुळे मोहर आणि कोवळी फळे काळवंडून वाळू लागतात. त्यामुळे उत्पादनात मोठी घट येण्याची भीती बागायतदार व्यक्त करत आहेत.

माणगाव कृषी विभागाने शेतकऱ्यांना वेळेत प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे आवाहन केले आहे. नुकसानीच्या भरपाईची वाट न पाहता मोहराचे संरक्षण करण्यासाठी नियोजनबद्ध फवारणी करावी, असे कृषी अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. उत्पादनावर परिणामाची भीती शेतकऱ्यातून बोलताना व्यक्त होत असून माणगाव तालुक्यातील आंबा हे शेतकऱ्यांचे प्रमुख नगदी पीक मानले जाते. विशेषतः हापूस आंब्यामुळे या परिसराची बाजारपेठेत वेगळी ओळख आहे. मात्र सध्याच्या हवामान बदलामुळे जर कीडरोगावर वेळेत नियंत्रण मिळाले नाही, तर यंदाच्या हंगामात उत्पादन घटण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### फवारणीचे टप्पे

पहिली फवारणी मोहर येण्यापूर्वी सायपरमेथ्रीन २५ टक्के प्रवाही किंवा फेनव्हलरेट २० टक्के प्रवाही किंवा डेकामेथ्रीन २ टक्के प्रवाही औषध खोड, फांद्या व पानांवर सम प्रमाणात फवारावे, दुसरी फवारणी मोहर फुटत असताना क्विनॉलफॉस २५ टक्के प्रवाही २० मि.ली. प्रति पाणी प्रमाणात फवारावे. यासोबत पाण्यात मिसळणारे गंधक २० ग्रॅम आणि कार्बेन्डाझिम मिसळल्यास भुरी व करपा रोगावर नियंत्रण मिळविता येते, तिसरी फवारणी दुसऱ्या फवारणीनंतर १५ दिवसांनी इमिडाक्लोप्रिड १७ टक्के ३ मि.ली. पाण्यात मिसळून फवारणी करावी. भुरी नियंत्रणासाठी गंधक २० ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम १० ग्रॅम किंवा हेक्झाकोनॅझोल ५ मि.ली. यांचा वापर करावा. औषधांची मात्रा, पाण्याचे प्रमाण व फवारणीची वेळ याबाबत संबंधित कृषी तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. आंबा फळांवर तुडतुडे कीड व भुरी रोगाचा प्रादुर्भाव असल्यास थायमेथॉक्साम १० लि पाण्यात १ गॅम + कार्बनडायझीम २० गॅम मिसळून फवारावे. आंबा फळे वाटाणा, गोटी व अंडाकृती अवस्थेत असताना १ टक्के पोटॅशियम नायट्रेट प्रति लिटर पाण्यात १० ग्रॅम मिसळून याच्या लीन फवारण्या कराव्या. फळाचे वजन व आकारमान वाढणेस मदत होते.

## निवडक

### विज्ञान प्रदर्शनात शहाबाज शाळेचा सन्मान

**अलिबाग** : अगस्त्या इंटरनॅशनल फाऊंडेशनतर्फे सोमवारी (दि.२३) फेब्रुवारी रोजी अलिबाग नगरपालिका उर्दू शाळा येथे संपन्न झालेल्या विज्ञान प्रदर्शनामध्ये को.ए.सो. माध्यमिक विद्यामंदिर शहाबाज शाळेच्या विद्यार्थिनींनी उत्कृष्ट यश संपादन केले. को. ए. सो. शहाबाज हायस्कूलमधील स्वरा दयानंद पाटील व कनिष्का गिरीश पाटील इयत्ता नववीमधील विद्यार्थिनींनी बनवलेल्या Helpful stand for workers हे मॉडेल द्वितीय क्रमांकाचे मानकरी ठरले. त्यांना रोख रक्कम ७००० रुपये आकर्षक प्रशस्तीपत्रक, आकर्षक ट्रॉफी आणि पदक देण्यात आले. पारितोषिक वितरण प्रसंगी कैसर धनसे तसेच अगस्त्या फाऊंडेशनचे पराग यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. त्यांचे मार्गदर्शक पारस पाटील, मार्गदर्शक शिक्षक, शाळा समिती चेअरमन अशोक कुमार भगत, जगदीश पाटील, सचिन पाटील, नितीन पाटील, सर्व पदाधिकारी, सदस्य संकुलातील मुख्याध्यापिका, सर्व सेवक वर्ग तसेच पंचक्रोशीतील नागरिकांनी अभिनंदन केले.





### भवानी किल्ल्यावर दुर्ग संवर्धन अभियान

**सोगाव** : रोहा तालुक्यातील चणेरा- बिरवाडी येथील भवानी किल्ल्यावर रविवार (दि.२२) फेब्रुवारी रोजी श्रीस्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक विकास मार्ग (दिंडोरी प्रणीत) तर्फे दुर्ग संवर्धन अभियान राबविण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने किल्ल्यावरील ऐतिहासिक ठिकाणे, अवशेष स्मारके, मंदिरे, पाण्याच्या टाक्या, बुरुज आदी ठिकाणी स्वच्छता अभियान, पक्ष्यांसाठी धान्याची व्यवस्था, पाण्याच्या टाक्यांची सफाई, पक्ष्यांसाठी पाण्याची व्यवस्था, किल्ल्यावरील जैवविविधतेची माहिती संकलित करणे, महत्वाच्या स्थळांचे निरीक्षण आदी उपक्रम राबविण्यात आले. या उपक्रमात रायगड जिल्ह्यातील डॉ. किरण शेटे, सुनिता संजय सोनावणे, आरती मयेकर, संजय सोनावणे, सुरज विचारे, संदेश कदम व शिवशंभो प्रतिष्ठान, रोहा. आदी सेवेकरी व दुर्ग संवर्धक प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ३५० पेक्षा जास्त किल्ले हिंदवी स्वराज्यासाठी आभूषणे ठरली आहेत. परंतु आज या किल्ल्यांची जी अवस्था आहे ती पाहता कुणाही संवेदनशील माणसाचे मन अस्वस्थ झाल्याशिवाय राहणार नाही. या शक्ती स्थळांना गतवैभव प्राप्त करून देणे अवघड वाटत असले तरी ही सांभाळुन ठेवणे आपल्या हाती आहे. यासाठी श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक विकास मार्ग (दिंडोरी प्रणीत) तर्फे दुर्ग संवर्धन अभियानाच्या माध्यमातून हा खारीचा वाटा उचलण्याचा प्रयत्न करत आहे.



### पत्रकार संघाचा पुरस्कार वितरण उत्साहात

**वेणगाव** : अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद आयोजित, रंगाअण्णा वैद्य आदर्श जिल्हा व वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळा रायगड जिल्ह्यातील कर्जत येथे रॉयल गार्डन येथे पार पडला. यावेळी खा. श्रीरंग बारणे, एस एम देशमुख, शरद पाबळे, किरण नाईक, मिलिंद आष्टीवकर, हेमंत देसाई, मंदार फणसे, शिवराज काटकर, अनिल वाघमारे, प्रशांत गोपाळे, संजय मोहिते, संजय पाटील, भारत रंजणकर, अनिल भोळे, संतोष पाटील, आदी उपस्थित होते यावेळी चामोर्शी तालुका पत्रकार संघ, जि. गडचिरोली, नांदगाव मनमाड मराठी पत्रकार संघ जिल्हा नाशिक, पनवेल महानगर प्रेस क्लब जि. रायगड, आंबेगाव तालुका पत्रकार संघ जि. पुणे, किनवट तालुका पत्रकार संघ जि. नांदेड, अंबाजोगाई तालुका पत्रकार संघ जि.बीड, संग्रामपूर तालुका पत्रकार संघ जि.बुलढाणा, पलूस तालुका मराठी पत्रकार संघ जि. सांगली, मुंबई उपनगर पत्रकार संघ, व रायगड प्रेस क्लबचे माजी अध्यक्ष अभय आपटे, मुरुड तालुका प्रेस क्लब यांचे विशेष सत्कार सन्मानचिन्हे देऊन करण्यात आले. पुरस्कार सोहळ्याच्या आयोजनासाठी कर्जत प्रेस क्लबचे अध्यक्ष गणेश पवार, विलास श्रीखंडे, अनिल गवळे, विजय मांडे, अजय गायकवाड, राहुल देशमुख, विदयानंद ओव्हाळ, मल्हार पवार, विपुल माळी, दर्वेश पालकर, मोतीराम पादीर, संजय अभंगे, ज्ञानेश्वर बागडे, दीपक पाटील, आनंद सकपाळ, ऋषिकेश कांबळे, सुमित शिरसागर यासंह अनेक पत्रकारांनी उत्तम आयोजन नियोजन केले.

### कोमसापतर्फे काव्य स्पर्धेचे आयोजन

**चिरनेर** : कोकण मराठी साहित्य परिषद शाखा उरण दर १७ तारखेला कवी संमेलन संपन्न होते. मधुबन कट्ट्याच्या या काव्य संमेलन प्रवासास १७ मार्च रोजी १२५ महिने पूर्ण होत आहेत. या १२५ व्या कवी संमेलनानिमित्त कोकण मराठी साहित्य परिषद उरण शाखेने प्रा. एल बी पाटील, रामचंद्र म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली काव्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. को.म.सा.प. उरण शाखेचे कार्यवाह मच्छिंद्रनाथ म्हात्रे यांनी दिली असून, ९८१९६५२९५१ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे त्यांनी आवाहन केले आहे. सदर काव्य स्पर्धा ही व्हाट्सअप समूहावर संपन्न होणार आहे. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या कवींनी आपल्या कवितेची लेखी प्रत ९८१९६५२९५१ या नंबरवर पाठवावी. स्पर्धेचे प्रकार पुढील प्रमाणे आहेत. १) छोटा अभंग काव्य स्पर्धा २) अष्टाक्षरी काव्य स्पर्धा ३)दशपदी काव्य स्पर्धा ४) गझल प्रकारानुसार कोणत्याही एकाच प्रकारामध्ये स्पर्धकाला सहभागी होता येईल.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- सहारा ट्रॅव्हल्स अलिबागमध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे. वय २५ ते ४५ ९२७०५६०४५६
- अलिबाग एसटी स्टँडजवळ दुकान गाळा विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे - सहाण, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील नमूद वर्णनाची जमीन मिळकती पैकी क्षेत्र ०-१६-१० हे. आर श्री. श्रीकांत अनंत नाईक, व श्री. दत्तात्रेय अनंत नाईक रा. सहाण, पो. बामणगांव, ता. अलिबाग, जि.रायगड यांच्या मालकीचे असून, सदर जमिन मिळकत माझे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले असून, तशा आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान झालेला आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| सहाण, ता.अलिबाग जि. रायगड | ३२ | ०-७६-७०<br>पो.ख. ०-१०-९०<br>एकूण ०-८७-६० | १९.४८ |

सदर वर नमूद जमिन मिळकतीपैकी श्री. श्रीकांत अनंत नाईक वगैरे १ यांचे मालकीचे क्षेत्र ०-१४-१० हे. आर पो.ख. ०-०२-०० हे. आर आकार ३.५८ रु. पैसे एकूण क्षेत्र ०-२६-१० हे. आर मिळकत नोटीसीचा विषय आहे.

सदर जमीन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. मात्र तरी देखील सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध व अन्य कोणताही बोजा, साठेकरार, ताबा, कब्जा, कुळव्यवहार, चार्ज, पोटगी हक्क, बक्षिस भाडेपट्टा, फरोक्तखत, जाण्या-येण्याचे मार्ग लिज, दावा वगैरे अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ७ (सात) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : २४/०२/२०२६

सही-
**(ॲड. वैभव वसंत पाटील)**
रा.नवेदर बेली, ता.अलिबाग
जि.रायगड, मो. ९८५०२६१००८
खरेदीदाराचे वकील

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिशीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी खालील वर्णनाची जमीन मिळकत, मिळकतीचे मालक श्री. सलील सुधाकर भालेराव, श्री.शशांक सुधाकर भालेराव यांचे सामाईक मालकीची मिळकत विकत घेण्याचे ठरविले असून तशी बोलणी चालू आहेत. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| वेश्वी | ८६/१ | ०-२६-८०<br>पो.ख.०-०२-५०<br>एकूण ०-२९-३० | ५.५० |

सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी दिलेला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क, व हितसंबंध वा दुरान्वये संबंध असल्यास अशा व्यक्तीनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात, कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार याजकडे हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसाचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध असून तिचे मार्केटेबल टायटल क्लिअर आहे, असे समजून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. २१/२/२०२६

**(ॲड. वैभव गिरीधर पाटील)**
जिल्हा न्यायालय अलिबाग, रायगड
मु. सांबरी, पो. कुर्डूस,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ८८०५५१८०६८

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
**(भारत सरकारचा उपक्रम)**

सादर सेवा

### रोजगार अधिसूचना

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडने लेखा विभागात विविध पदांसाठी करार तत्त्वावर मुलाखतीद्वारे 20.02.2026 रोजी अधिसूचना **क्र. सीओ/पी/-आर/2सी/2026** जारी केली आहे. तपशील खाली दिले आहेत:

**अधिसूचना क्र. सीओ/पी-आर/2सी/2026, दिनांक 20.02.2026**

| क्र. सं. | पदाचे नाव/ ग्रेड | यूआर | ईडब्ल्यूएस | ओबीसी | एससी | एसटी | पदांची एकूण संख्या | मुलाखतीची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | लेखा सहाय्यक | 2 | 1 | 1 | 0 | 0 | **4** | 10.03.2026 |
| 2 | सहाय्यक लेखा अधिकारी | 0 | 0 | 1 | 0 | 0 | **1** | 11.03.2026 |
| 3 | उप महाव्यवस्थापक /लेखा | 2 | 0 | 0 | 0 | 0 | **2** | 12.03.2026 |
| 4 | विभाग अधिकारी | 2 | 1 | 1 | 0 | 0 | **4** | 12.03.2026 |

उमेदवारांनी अधिसूचना, पात्रता निकष इत्यादी तपशीलांसाठी केआरसीएल संकेतस्थळ **www.konkanrailway.com** वर लिंक ➔ नियुक्ती ➔ वर्तमान अधिसूचना पहावी व त्यानुसार अर्ज करावा.

**मुख्य कार्मिक अधिकारी**

मे वसुली व विक्री अधिकारी यांचे कार्यालय
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.
अलिबाग केंद्र कार्यालय अलिबाग निलीमा हॉटेल
शेजारी चेंढरे ता.अलिबाग जि. रायगड
फोन क्र. ०२१४१-२२४३१५-१६

## मिळकतीचा जाहीर लिलाव विक्री जाहीरनामा

महाराष्ट्र संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ अन्वये लवाद वसुली दाखल्यानुसार खालील नमुद केलेल्या कर्जदाराच्या जप्ती आदेशाने जप्त केलेल्या स्थावर मिळकतीचा जाहीर लिलाव शुक्रवार दिनांक २७.०३.२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता बँकेचे केंद्र कार्यालय अलिबाग जि. रायगड येथे केला जाईल. लिलावाच्या अटी व शती विक्री जाहीरनामा केंद्र कार्यालय अलिबाग येथे बँकेच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. या करीता जाहिर लिलावात भाग घेण्याकरीता अनामत रक्कम रु.५०,०००/- (अक्षरी पन्नास हजार मात्र) भरणे आवश्यक आहे. अनामत रक्कम स्विकारण्याची अंतीम मुदत रविवार व सुट्टीचे दिवस वगळून दिनांक २३.०३.२०२६ रोजी सायंकाळी ३.३० वाजे पर्यंत राहील. परंतु लिलावाच्या दिवशी १ तास अगोदर एखाद्या इसमाने जाहिर लिलावात भाग घेण्याची इच्छा प्रदर्शित केल्यास त्याचे कडुन अनामत रक्कम भरून घेवून त्यास जाहिर लिलावात बोली लावण्यास अनुमती देण्याबाबत विचार करण्यात येईल अनामत रक्कम भरणा केल्याशिवाय जाहिर लिलाव प्रक्रीयेत भाग घेता येणार नाही. तसेच ज्या स्थावर मालमत्तेच्या लिलाव प्रक्रियेत भाग घ्यावयाचा आहे त्याच्या स्थावर मालमत्तेचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

**कर्जदार व स्थावर मालमत्तेचा तपशिल खालीलप्रमाणे.**

| अ. क्र | कर्जदार व जामिनदारांची नावे | वसूली दाखला क्र. व दिनांक | राखीव किंमत | जप्त केलेल्या व लिलावात विक्री करणेत येणाऱ्या स्थावर मालमत्तेचा तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | **कर्जदार**<br>१. मे. सुयश मेडिलायन्स तर्फे प्रो. प्रा. सौ. रूपाली रामचंद्र म्हात्रे पत्ता:- श्री गणेश कृपा हौ. सोसायटी ३ रा मजला डॉ. रानवडे हॉस्पिटल शेजारी मु.पो. चेंढरे ता. अलिबाग जि.रायगड<br>**जामिनदार -**<br>२. श्री प्रदिप पाडुरंग सुर्वे पत्ता-विष्णू लक्ष्मी विहार, पाटील वाडी मु.पो. चेंढरे ता.अलिबाग जि.रायगड<br>३ श्री दत्तात्रेय रामा म्हात्रे पत्ता :-मु.वृंदावन सोसायटी गोंधळपाडा पो. वेश्वी ता.अलिबाग जि.रायगड<br>४. सौ. मंदा पाडुरंग पाटील (तारणदार) पत्ता:- श्री. गणेश कृपा हौ. सोसायटी ३ रा मजला डॉ. रानवडे हॉस्पिटल शेजारी मु.पो. चेंढरे ता. अलिबाग जि. रायगड<br>४. सौ. सोनाली पांडुरंग पाटील (तारणदार) पत्ता:- श्री. गणेश कृपा हौ. सोसायटी ३ रा मजला डॉ. रानवडे हॉस्पिटल शेजारी मु.पो. चेंढरे ता. अलिबाग जि.रायगड | अर्ज क्र. १०७७<br>दि. १२/१२/२०२<br>जा.क्र. जिउनि/ कात -१०/ अपसेट<br>प्रा. आदेश/ दिराजिबँकशाखा अलिबाग / ४२११ / सन २०२५<br>दिनांक /२०२५ | रु. १,१७,५०,०००/-<br>रू.६२,८९,१४३/-<br>रु. १,०३,७७,९६९/-<br>रू.२६,३०,८८०/- | मौजे अलिबाग नगरपरिषद चेंढरे ता. अलिबाग,जि. रायगड हद्दीतील सर्वे नं. १६/२/३ क्षेत्र ०.०२.३५ चौ.मि.<br>२. मौजे अलिबाग नगरपरीषद चेंढरे ता. अलिबाग जि. रायगड हद्दीतील घर क्र. झेड.२ सीएचडी ०००७६४ क्षेत्र ९२६ स्क्वेअर फुट<br>३. मौजे अलिबाग नगरपरीषद चेंढरे ता. अलिबाग जि.रायगड जि. रायगड हद्दीतील घर क्र.झेड-२सीएचडी ०००७६४<br>३ मौजे नगरपरीषद अलिबाग चेंढरे ता. अलिबाग जि.रायगड हद्दीतील घर क्र.झेड-२ सीएचडी ०००७६४ |

**स्थावर मालमत्ता जाहिर लिलावाच्या अटी व शर्ती**
**अटी व शर्ती :-**

१) सोबतचं यादीत वर्णन केलेली स्थावर मालमत्ता आहे त्या ठिकाणी आहे त्या परिस्थितीत विकणेत येईल.
२) लिलावात भाग घेणेसाठी व बोली बोलणेसाठी रक्कम रू.५०,०००/- मात्र अनामत भरावी लागेल.
३) वाजवी किंमतीपेक्षा कमी बोली नोंदल्या जाणार नाहीत.
४) शासन मान्यता प्राप्त अधिकृत व्हॅल्युअर (सक्षम अधिकारी) यांचे मुल्यांकन दाखल्याच्या किमतीपेक्षा व वाजवी किमतीपेक्षा स्थावर मालमत्ता विक्रीची रक्कम कमी स्विकारली जाणार नाही.
५) सर्वात जास्त बोली स्विकारणे अथवा न स्विकारणे हे बँकेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी यांचेवर अवलंबून राहील.
६) ज्यांचे नावे लिलाव पूर्ण करणेत येईल त्याने बोली रक्कमेच्या किमान २५ टक्के रक्कम ताबडतोब अनामत भरली पाहिजे. तसे न केल्यास लिलाव केला जाईल.
७) ज्याचे नावे लिलाव पुरा करणेत येईल त्याने उरलेली बोली रक्कमेच्या ७५ टक्के रक्कम लिलावाचे तारखेपासून ३० दिवसांचे आत भरणा करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास आधी भरलेली २५ टक्के रक्कम (लिलावाचा खर्च वजा करून) सरकारी खजिन्यात जमा करणेत येईल.
८) विक्री केलेल्या मालमत्तेवरील कर, विमा इत्यादी कर खरेदी दराने भरले पाहिजे. तसेच विक्री केलेल्या मालमत्ते संदर्भात मोजणी व त्या अनुषंगाने इतर कामे खरेदीदाराने करावयाचे आहेत.
९) बोली किमान किती रक्कमेने वाढवावयाची ती रक्कम लिलावाचे वेळी बँकेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी ठरवतील.
१०) खरेदीदाराने कसूर केल्यास लिलाव करण्याची वेळ आल्यास त्यासाठी होणारा खर्च व खरेदीदाराने बोललेल्या किमतीपेक्षा लिलावाचे दुसऱ्या खरेदीदाराने बोललेली रक्कम कमी आल्यास अशी कमी होणारी रक्कम पहिल्या खरेदीदाराकडून वसुल केली जाईल.
११) पहिल्या विक्री पेक्षा दुसऱ्या विक्रीची किंमत जास्त असल्यास पहिल्या खरेदीदारास त्या जास्त असलेल्या किंमतीवर हक्क सांगता येणार नाही.
१२) ज्यावेळी स्थावर मालमत्तेची विक्री नियमाप्रमाणे कोणत्याही कारणास्तव कायम करणेत आली असेल त्यावेळी खरेदीदाराने भरलेली अनामत रक्कम लिलावाच्या रक्कमेतून कमी करणेत येईल.
१३) थकबाकीदाराने लिलाव उद्घोषणे प्रमाणे होणारी सर्व रक्कम आणि लिलाव किंमतीच्या ५ टक्के रक्कम अर्जासह विक्री अधिकारी यांच्याकडे सुपूर्त केल्यास विक्री अधिकारी लिलाव रद्द करतील आणि लिलाव रद्द झाल्यास किमतीच्या १५ टक्के रक्कम अधिक लिलावात खरेदी दाराने भरलेली सर्व रक्कम खरेदीदारास परत केली जाईल.
१४) स्थावर मालमत्ता ज्या बोलीदाराचे नावाने अंतिम आदेशाने देण्याचा आदेश होईल त्या बोलीदाराने खरेदीखताच्या स्टॅम्प ड्यूटीचा व इतर अनुषंगिक खर्च करावयाचा आहे.
१५) खरेदीदाराने लिलाव कायम केल्यास स्थावर मालमत्तेचा ताबा ३० दिवसांचे आत घेतला पाहिजे.
१६) सकारण लिलाव रद्द करणेचा अगर एखादी अट शिथिल करणेचा अधिकार विशेष वसुली व विक्री अधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे.
१७) महाराष्ट्र अधिनियम १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ मधील संबंधीत तरतुदी लिलाव खरेदीरावर बंधनकारक राहतील.
१८) जाहीर लिलावात भाग घेणाऱ्या इसमाने जास्तीत जास्त बोली बोलून लिलाव घेतला असेल तरी कर्जदाराने ३० दिवसांच्या आत संपुर्ण रक्कम भरून विनंती केल्यास सदरचा लिलाव रद्द होईल व लिलाव घेण्याऱ्या इसमास त्याने भरलेल्या रक्कमेवर १२ टक्के दराने व्याजासह रक्कम परत केली जाईल.

अलिबाग
दिनांक २५.०२.२०२६

**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**दि रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग**

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
**(भारत सरकारचा उपक्रम)**

सादर सेवा

### खुली - ई-निविदा आमंत्रण सूचना

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड यांचे वतीने विभागीय विद्युत अभियंता, केआरसीएल, रत्नागिरी यांचे द्वारे खालील कार्यासाठी ई-खुल्या निविदा आमंत्रित करण्यात येत आहेत. **कामाचे नाव**: कोंकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागाअंतर्गत गोरेगांव स्थानकावरील प्रस्तावित उच्चस्तरीय प्लॅटफॉर्म क्रमांक 1 साठी प्रकाश व्यवस्था उपलब्ध करून देणे. **निविदा सूचना क्र.: केआर/आरएन/ ईएल/टी/20/2025, दिनांक 26.02.2026. अंदाजित खर्च**: रु. 19,61,977/- (जीएसटी वगळून). **निविदा प्रपत्राची किंमत**: शून्य. **ईएमडी**: रु. 39,200/- (किंवा आयआरईपीएस पोर्टलवर दर्शविल्यानुसार). **ऑनलाइन निविदा सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ**: 20.03.2026 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोळे, रत्नागिरी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा रेल्वेचे संकेतस्थळ **www.ireps.gov.in** पहावे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. पोही, ता. कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| जमिन मालक | सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|---|
| श्री. सतिश व्ही बागलकर | ३० | १०/ब | ०-२९-० | ०-२० |
| श्री. सतिश व्ही बागलकर | ३० | ११ | ०-५७-० | ०-५० |
| १) श्री.सतिश विष्णू बागलकर<br>२) श्री. राजेंद्र मधुकर चोबळ | ३० | १०/अ | ०-३६-० | ०-३५ |
| श्री.राजेंद्र मधुकर चोबळ | ३७ | ६ | ०-२६-८० | ०-२५ |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक: २६/०२/२०२६

**ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफीस-कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
**(भारत सरकारचा उपक्रम)**

सादर सेवा

### लक्ष द्या

**अभियांत्रिकी पदवीधर/डिप्लोमा धारक/पदवीधर (विविध शाखा) जे अप्रेंटिस अधिनियम, 1961/1973 (सुधारित) अंतर्गत प्रशिक्षण घेऊ इच्छितात.**

**अधिसूचना क्रमांक - सीओ/एपीपीआर/2026/01, दिनांक 20.02.2026**

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड कडून अभियांत्रिकीमध्ये पदवी/डिप्लोमा (सिव्हिल, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल किंवा इलेक्ट्रॉनिक्स) तसेच सामान्य शाखेतील पदवीधर, ज्यांनी वर्ष 2021, 2022, 2023, 2024 आणि 2025 दरम्यान उत्तीर्ण केले आहे, यांच्याकडून अप्रेंटिस अधिनियम, 1961/1973 (सुधारित) अंतर्गत एक वर्षाच्या अप्रेंटिसशिप प्रशिक्षणासाठी ग्रॅज्युएट अप्रेंटिस किंवा तंत्रज्ञ (डिप्लोमा) अप्रेंटिस म्हणून नोंदणीसाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. प्रशिक्षण महाराष्ट्र, गोवा आणि कर्नाटक राज्यांतील केआरसीएलच्या विविध स्थानकांवर व कार्यस्थळांवर दिले जाईल. खालील विषयांतील उमेदवार अर्ज करू शकतात.

| विषय | वैद्यकीय श्रेणी | यू आर | ओबीसी एनसीएल | एस सी | एस टी | ईडब्ल्यू एस | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सिव्हिल अभियांत्रिकी | B1 | 14 | 8 | 4 | 2 | 2 | **30** |
| इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी | B1 | 10 | 5 | 3 | 1 | 1 | **20** |
| इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी | B1 | 6 | 2 | 1 | 0 | 1 | **10** |
| मेकॅनिकल अभियांत्रिकी | B1 | 10 | 5 | 3 | 1 | 1 | **20** |
| डिप्लोमा (सिव्हिल) | B1 | 14 | 8 | 4 | 2 | 2 | **30** |
| डिप्लोमा (इलेक्ट्रिकल) | B1 | 10 | 5 | 3 | 1 | 1 | **20** |
| डिप्लोमा (इलेक्ट्रॉनिक्स) | B1 | 6 | 2 | 1 | 0 | 1 | **10** |
| डिप्लोमा (मेकॅनिकल) | B1 | 10 | 5 | 3 | 1 | 1 | **20** |
| सामान्य शाखेतील पदवीधर | C1 | 14 | 8 | 4 | 2 | 2 | **30** |
| **एकूण** | | **94** | **48** | **26** | **10** | **12** | **190** |

**यूआर** – अनारक्षित, **ईडब्ल्यूएस** – आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, **एससी** – अनुसूचित जाती, **एसटी** – अनुसूचित जमाती, **ओबीसी (एनसीएल)** – इतर मागासवर्ग (नॉन क्रीमी लेयर).
उमेदवारांनी सविस्तर अधिसूचना व पात्रता निकषाचा तपशील केआरसीएलच्या वेबसाइट **https://konkanrailway.com/** वर Quick Links ➔ Graduate Apprentice/Technician Apprentice for training in KRCL अंतर्गत पाहावे व 21/03/2026 पर्यंत अर्ज करावा.

**मुख्य कार्मिक अधिकारी**

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी खालापूर, यांचे न्यायालयात**
**तालुका खालापूर. जि. रायगड**

दुरध्वनी क्रमांक ०२१९२/२७५०४८ ई मेल-tahasil.khalapur3@gmail.com
क्र.जन्म/रजि/एसआर ५३/२०२६/१०२२

(१) श्री. लहानु लक्ष्मण पवार (कातकरी) — वादी
रा. न्यु.एस.ई.बी.आई. रोड कातकरीवाडी शिवनगर,
पो. मोहोपाडा, ता. खालापुर, जि. रायगड

**विरुद्ध**

१) निबंधक जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी, — प्रतिवादी
ग्रुप ग्रामपंचायत वासांबे, ता. खालापूर, जि. रायगड

**विषय:- जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) नुसार**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमूद किरकोळ फौजदारी अर्जातील अर्जदार श्री. लहानु लक्ष्मण पवार (कातकरी), रा. न्यु.एस.ई.बी.आई. रोड कातकरीवाडी शिवनगर, पो. मोहोपाडा, ता. खालापुर, जि. रायगड (अपिलार्थी) यांनी यांचे वडील कै.लक्ष्मण गणु कातकरी यांचा मृत्यू दिनांक ११/०४/१९६७ रोजी रिसवाडी, ता. खालापूर येथे झाला आहे. सदर मृत्यूची नोंद झाली नसल्याने या न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे मृत्यूची नोंदणी करण्याचा आदेश मिळणेबाबत या न्यायालयात किरकोळ अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणाची काही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आवश्यक त्या पुराव्याचे कागदपत्रांसह आपले लेखी म्हणणे मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर अर्जदारास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील आदेश करणेत येईल याची नोंद घ्यावी. सदरची जाहीर नोटीस आज दि २४/२/२०२६ रोजी माझे सहीने व शिक्क्यानिशी दिली असे.

ठिकाण:- खालापूर
दिनांक:- २४/०२/२०२६

सही/-
**(अभय चव्हाण)**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसिलदार खालापूर**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सतिश शिवाजी कोठावले, रा. फ्लॅट नं. १२०२, सुमंगल हेरिटेज टॉवर, १२ वा मजला, त्रिमुर्ती सोसायटीच्या समोर, एव्हर्ड नगर, सायन बीकेसी, सायन ट्रॉम्बे रोड, सायन चुनाभट्टी (पु.) मुंबई ४०००२२ यांजकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. सदर मिळकतीच्या मालकी हक्काबाबत शोध घेण्याकरीता व त्या मिळकतीच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करण्याकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमच्याकडे दिले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर. (आर.चौ.मी) | आकार (रू.पै.) | विद्यमान मालक |
|---|---|---|---|---|
| नागाव अलिबाग | १९१३ | क्षेत्र ११-१०-०० (बिनशेती) | १११.०० | श्री.सतिश शिवाजी कोठावले |

सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी स्वरूपात खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात.

येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न असल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

कळावे,
अलिबाग,
तारीख : २६/०२/२०२६

**(ॲड. सागर विजय पाटील)**
पत्ता : मु.घर नं.१६०६,
लालबाग, ब्राम्हण आळी,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो.नं. ९९२२५६७८९१

## अलिबाग नगरपरिषद
### ई-निविदा सुचना सन २०२५-२६

अलिबाग नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागाकडील साहित्य पुरवठा करणे कामी ई निविदा मागविण्यात येत आहेत. सविस्तर ई निविदा सुचना शासनाच्या : https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २६/०२/२०२६ पासुन उपलब्ध होईल. सदर कामाच्या निविदा प्रक्रियेत कोणताही बदल/सुधारणा असल्यास वरील संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेंत येईल.

सही /-
**मुख्याधिकारी**
**अलिबाग नगरपरिषद**

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. चंद्रकांत नामदेव जाधव यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे अंत्राट तर्फे निड, ता. कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं २८/३ एकुण ०.२१.०० गुंठे क्षेत्र जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक २६/०२/२०२६

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## जाहीर नोटीस

दि. २४/०२/२०२६

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरच्या मिळकतीच्या विक्री संबंधीत बोलणी विद्यमान मालक रुपाली सुशील म्हात्रे यांचेसोबत झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| कुरकुंडी कोलटेंभी ता.अलिबाग | १९३/४ | एकुण ०-२०-०० | ०.३३ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीपैकी रूपाली सुशील म्हात्रे यांच्या हिश्याचे क्षेत्र ०-०२-०० हे. आर आकार ०.०३ रू. पैसे हि मिळकत या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु. पेझारी पो. पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा.नं.९२७३२७३८४३/९६३७२७००१९

## जाहीर हरकत नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे-वावर्ले, ता.खालापूर, जि.रायगड येथील खालील वर्णनांकीत मिळकती ह्या आमचे अशिल श्रीमती. बेला धरम गोधा यांच्या ताबेकब्जे वहिवाटीत होत्या व आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-वावर्ले, ता.खालापूर, जि.रायगड**

गट नं.१५३/१/अ, १५३/१०, १५३/११, १५३/१२, १५३/१३, १५३/१४, १५३/१५, १५३/१६, १५३/१७, १५३/१८, १५३/१९, १५३/२०, १५३/२१, १५३/२२, १५३/२३, १५३/२४, १५३/२५, १५३/२६, १५३/२७, १५२/२८, १५३/२९, १५३/०३, १५३/३०, १५३/३१, १५३/३२, १५३/३३, १५३/३४,१५३/३५, १५३/३६, १५३/३७, १५३/३८, १५३/३९, १५३/०४, १५३/४०, १५३/४१, १५३/०५, १५३/०६, १५३/०७, १५३/७७, १५३/७८, १५३/०८, १५३/८०, १५३/८१, १५३/०९, १५३अ/१, १५३अ/२, असे अकृषीक जमिन मिळकती व गट नं १५३/२/अ व १५८/अ अशा कृषिक जमिन मिळकती आहेत.

वरील मिळकती संदर्भात आमचे अशिलांनी श्री.सागर सुभाष खोंड, रा.कांडपिळ अपार्टमेंट, माथेरान रोड, मालेवाडी, आकुरली नवीन पनवेल-४१० २०६ यांच्या लाभात दि.१२/०९/२०२५ रोजी अनोंदणीकृत सामंजस्य करार केला होता. त्यांच्या लाभात दि. १२/०९/२०२५ रोजी काही विशेष कामकाज पाहण्याकरीता अखत्यारपत्र लिहून दिले होते. परंतु श्री. सागर सुभाष खोंड यांनी सदर सामंजस्य करारातील अटी शर्तींचा भंग केला आहे व अखत्यारपत्राप्रमाणे कार्य करण्यास कसुर केला आहे त्यामुळे आमचे अशिलांनी वरील नमुद सदरचे दोन्ही दस्त श्री.सागर सुभाष खोंड यांना रितसर नोटीस देऊन रद्द केले आहेत.

तरी वर नमुद जमिन मिळकतीबाबत कोणाही व्यक्तीने, संस्थेने कोणताही व्यवहार, खरेदीखत साठेकरार, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र, गहाण, तारण, भाडेपट्टा या अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हस्तांतरणीय व्यवहार करू नये. याऊपरही असा व्यवहार केल्यास तो आमचे अशिलांनी बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दि. /०२/२०२६

सही/-
**ॲड.महेश एच. मोहिते**
अष्टगंध सो.तळमजला रायवाडी कॉम्प्लेक्स,
चेंढरे, अलिबाग-रायगड
संपर्क- ८८८८१६७७७७/९८२३४३६३२७

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे कारिवणे, ता. रोहा, जि. रायगड येथील खालील व्यक्तीचे नावे असलेली ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची खालील वर्णनाची रोहा नगरपरिषद हद्दीतील जमीन मिळकत आमचे अशिलांनी कायम स्वरूपात विकत घेण्याचा विचार केलेला आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे कारिवणे, ता. रोहा, जि. रायगड येथील सर्व्हे नं. १७/अ/१ मधील एकूण क्षेत्र हे. आर. पा. १३-७८-७० पैकी खालील वर्णनाची शेतजमिन**

| अ. क्रं | कब्जेदाराचे /मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. जयंत सुरेश कोकरे | १७ | अ/१ | ०-२०-००<br>पो.ख ०-२०-००<br>एकूण ०-४०-०० | ०.१४ |
| २. | श्री.सर्वेश गजानन चोरगे | १७ | अ/१ | ०-२०-००<br>पो.ख.०-२०-००<br>एकूण ०-४०-०० | ०.१४ |
| ३. | जगिता गजानन चोरगे | १७ | अ/१ | ०-४०-००<br>पो.ख ०-४०-००<br>एकूण ०-८०-०० | ०.२८ |

सबब वर नमुद शेत जमीन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विशद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात, अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वैगेरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत तक्रार दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमुद मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल यांची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : २४/०२/२०२६

सही /-
**ॲड. सानिया सचिन शिंदे**
ऑफिस : :- गाळा नं. २८, सिटी पार्क बिल्डींग,
खान्देश हॉटेल समोर, साई इंटरप्रायझेस से १३,
खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प),
ता. पनवेल - ४१०२०६, जि. रायगड.

विनायक दळवी

## उपांत्य फेरीच्या प्रवेशासाठी जर तर ती परिस्थिती

सध्या भारत आणि श्रीलंकेत सुरू असलेली टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धा नेट रन रेट सरासरी आणि जर तर च्या परिस्थितीत पोहोचली आहे. भारताच्या मोठ्या पराभवानंतर गट १ मधील जय आणि पर्याय यांचे 'इक्वेशन' खूपच बदलले आहे. दक्षिण आफ्रिका उपांत्य फेरीत पोहोचण्यासाठी मजबूत स्थितीत आहे, तर भारताला नेट रन रेट मधील तूट भरून काढण्यासाठी आणि शर्यतीत वेस्ट इंडिजला हरवण्यासाठी मोठा विजय मिळवावा लागेल. आफ्रिकेविरुद्ध भारताचा मोठा पराभव आणि वेस्ट इंडिजचा झिम्बाब्वेवरचा मोठा विजयामुळे सुपर एटमधील गट १ मध्ये गोष्टी अत्यंत चुरशीच्या बनल्या आहेत.

गटात चार सामने शिल्लक असताना, सध्याची परिस्थिती अशी असेल ते पाहूया. जर भारताने दोन्ही सामने जिंकले तर चार गुणांसह, दक्षिण आफ्रिकेने त्यांचे उर्वरित दोन्ही सामने-वेस्ट इंडिज आणि झिम्बाब्वे विरुद्ध-जिंकले किंवा दोन्ही गमावले तर भारत पात्रता निश्चित करेल. जरी दक्षिण आफ्रिकेने वेस्ट इंडिजला हरवले आणि झिम्बाब्वेकडून हरले तरी, नेट रन-रेट विचारात न घेता भारताचे उपांत्य फेरीतील स्थान निश्चित होईल. जर आफ्रिका संघ वेस्ट इंडिजकडून हरला आणि झिम्बाब्वेला हरवले, तर आफ्रिका, वेस्ट इंडिज आणि भारत हे तीन संघ चार गुणांसह समान पातळीवर असतील. अशा परिस्थितीत, नेट रन रेट वर कोणता संघ उपांत्य फेरी गाठणार हे निश्चित होईल. मात्र आफ्रिका विरुद्ध सामना मोठ्या धावांनी गमावल्यामुळे आणि वेस्ट इंडिजने झिंबाब्वेवर मोठ्या फरकाने विजय मिळवल्यामुळे, भारतीय संघाची परिस्थिती अशाप्रसंगी बिकट असेल. भारतापुढे वेस्टइंडीज संघाचे यावेळी कडवे आव्हान असेल.

कारण वेगवान गोलंदाजी व झंझावाती फलंदाजी आणि त्याला जोड म्हणून त्यांच्याकडे असलेले मोती आणि होसेन हे दोन फिरकी गोलंदाज जे सध्या प्रभावी गोलंदाजी करीत आहेत. सध्या अशाश्वत फलंदाजी करणारी भारतीय फलंदाजीची फळी या दोन पिरकी गोलंदाजांचा सामना कसा करते यावरच भारताचा उपांत्य फेरीतील प्रवेश निश्चित होईल. अशावेळी भारत आणि झिंबाब्वे या सामन्याचा विचार करूया. १८० धावा काढल्यानंतर गुरुवारी भारताने झिम्बाब्वेला ६० धावांनी हरवले असे गृहीत धरूया. जर वेस्ट इंडिजने दक्षिण आफ्रिकेला पाच धावांनी हरवले आणि दक्षिण आफ्रिकेने झिम्बाब्वेला कोणत्याही फरकाने हरवले, आणि वेस्ट इंडिजने प्रथम फलंदाजी करून १८० धावांची एकूण धावसंख्या उभारली व अन्य प्रतिस्पर्ध्याला हरवले असेगृहीत धरले तर उपांत्य फेरीत पोहोचण्यासाठी भारताला वेस्ट इंडिजविरुद्ध ६४ धावांनी विजय मिळवावा लागेल. दुसरीकडे, जर आफ्रिका वेस्ट इंडिजविरुद्ध ४० धावांच्या मोठ्या फरकाने हरला आणि झिम्बाब्वेला एका धावेने हरवले, तर आफ्रिकेला मागे टाकण्यासाठी भारताला वेस्ट इंडिजवर ५४ धावांनी विजय मिळवावा लागेल. जर भारत एक जिंकला आणि एक हरला तर या परिस्थितीत भारताला आशा बाळगायची असेल तर आफ्रिका किंवा वेस्ट इंडिज यापैकी कोणत्याही संघाला तिन्ही सामने जिंकावे लागतील आणि इतर संघांनी प्रत्येकी एक जिंकून नेट रन रेट वर निर्णय निश्चित करावा लागेल. जर आफ्रिका तिन्ही सामने जिंकली तर वेस्ट इंडिज, भारत आणि झिम्बाब्वे हे सर्व प्रत्येकी एक विजयासह दुसऱ्या उपांत्य फेरीच्या स्थानासाठी लढतील.

भारतासाठी ही आकडेवारी अत्यंत अशक्य आहे असं दिसत असले तरीही, ते झिम्बाब्वेकडून फक्त एका धावेने हरले आणि वेस्ट इंडिज दक्षिण आफ्रिकेकडून ५० धावांनी हरले तरी, दुसरे उपांत्य फेरीचे स्थान मिळविण्यासाठी भारताला वेस्ट इंडिजवर ६७ धावांनी विजय मिळवावा लागेल. जर वेस्ट इंडिजने भारताविरुद्धच्या एका धावेने विजयासह तिन्ही सामने जिंकले आणि दक्षिण आफ्रिकेने त्यांचे उर्वरित दोन सामने अनुक्रमे ५० आणि २० धावांनी गमावले, तर दक्षिण आफ्रिकेच्या नेट रन रेटला मागे टाकण्यासाठी भारताला झिम्बाब्वेवर ८४ धावांनी विजय मिळवावा लागेल. भारताविरुद्धच्या जोरदार विजयामुळे दक्षिण आफ्रिकेला उपांत्य फेरीत प्रवेश करण्यासाठी मजबूत स्थितीत आहे. तथापि, अंतिम चारमध्ये स्थान निश्चित करण्यासाठी त्यांना गुरुवारी वेस्ट इंडिजविरुद्धचा विजय जवळजवळ उपांत्य फेरीसाठी पात्र होण्याकरता पुरेसा असेल.

# भारताला मोठ्या विजयाची गरज

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

टी-२० विश्वचषकाचा सुपर ८ सामना वेस्ट इंडीज विरुद्ध झिम्बाब्वे यांच्या खेळला गेला. या सामन्यात वेस्ट इंडीजने झिम्बाब्वेचा १०७ धावांनी पराभव केला. या पराभवामुळे मात्र भारताच्या अडचणी वाढल्या आहेत. भारतीय संघाने सुपर ८ चा पहिला सामना आफ्रिकेविरुद्ध ७६ रनांनी गमावला होता. त्या सेमीफायनलसाठी ग्रुपमधील टॉप २ संघच पात्र ठरतील. सेमीफायनलसाठी पात्र ठरण्यासाठी भारतासमोर दोन संघांचे आव्हानं आहे. भारताने आफ्रिकासोबत खेळला गेलेला पहिला सामना गमावला असल्याने पुढील दोन्ही सामने जिंकणं फार आवश्यक आहे. जर भारत वेस्टइंडीज आणि



### सेमीफायनलच्या शर्यतीत टिकण्यासाठी कसरत

झिम्बाब्वे या दोन्ही संघांचा पराभव करेल तर त्याचे ४ अंक होतील. जर आफ्रिका त्यांचे उर्वरित सामने जिंकतील तर भारत आणि साउथ आफ्रिका दोन्ही संघ सेमीफायनलसाठी पात्र ठरतील. जर भारत दोन्ही मॅच जिंकेल आणि आफ्रिका त्यांचा एक सामना गमावतील तर ३ संघांचे अंक सारखे होतील. अशा परिस्थितीत कोणते संघ सेमीफायनल खेळतील हे नेट रन रेटवरुन ठरवलं जाईल.

### वेस्टइंडीजला हरवणं आव्हान

**भारतीय संघाला टी-२० विश्वचषकातील पुढचा सामना २६ फेब्रुवारीला झिम्बाब्वेविरोधात खेळला जाणार आहे. त्यानंतर भारतीय संघाचा पुढचा सामना १ मार्चला वेस्टइंडीज संघासोबत खेळला जाईल. सध्या वेस्टइंडीय संघाचे फलंदाज आणि गोलंदाज दोघेही चांगल्या फॉर्ममध्ये आहेत. वेस्टइंडीजने आतापर्यंत खेळलेले पाचही सामने जिंकले आहेत. त्यामुळे भारतासमोर हे मोठं चॅलेंज ठरणार आहे.**

जर भारतने आपले दोन्ही सामने जिंकले आणि आफ्रिकेला आपल्या दोन्ही सामन्यांमध्ये पराभव स्वीकारावा लागला तर भारत आणि वेस्टइंडीज हे दोन्ही संघन सेमीफायनलसाठी पात्र ठरतील. यापुढे खेळल्या जाणाऱ्या सामन्यांपैकी भारत फक्त एक सामाना जिंकू शकला तर त्याची सेमीफायनलमध्ये जाण्याची संधी हुकते. इतर परिस्थितीत काहीही बदल झाला तरीही भारत एका विजयाने सेमी फायनलमध्ये पोहोचू शकणार नाही.

सुपर ८ च्या पहिल्याच सामन्यात भारतविरोधात झालेल्या मॅचमध्ये आफ्रिकाने भारताचा पराभव करत दणदणीत सुरुवात केली आहे. त्यामुळे आफ्रिकाकडे चांगला मुमेंटम आहे.

भारतावर विजय मिळवल्यानंतर आता आफ्रिका संघाला वेस्टइंडीज आणि झिम्बाब्वे यांच्याविरोधात खेळायचे आहे.

जर आफ्रिका संघाने त्यांचे उर्वरीत दोन्हीही सामने जिंकले तर त्यांची सेमीफायनलमधील जागा निश्चित होईल.

४ मार्चला पहिली सेमीफायनल खेळली जाईल. तर ५ मार्चला वानखेडे स्टेडियमवर दुसरी सेमीफायनल खेळली जाईल. या दोन्ही सेमीफायनलमध्ये विजय मिळवणाऱ्या टीम थेट ८ मार्चला एकमेकांविरोधात फायनलमध्ये धडकतील. टी-२० विश्वचषक २०२६मधील सर्वच संघ तितक्याच ताकदीने लढताहेत त्यामुळे मोठी चुरस पाहायला मिळत आहे. त्यामुळे कोणते संघ फायनलमध्ये धडक मारतील आणि विश्वचषक कोण जिंकेल हे पाहणं महत्त्वाचे ठरणार आहे.

एमसीए क्रिकेट स्पर्धेत

## क्लब ऑफ महाराष्ट्र, नाशिक संघ विजयी

| रायगड | क्रीडा प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यात सध्या सुरू असलेल्या महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या पुरुषांच्या दोन दिवसीय क्रिकेट स्पर्धेतील साखळी फेरीच्या झालेल्या सामन्यात क्लब ऑफ महाराष्ट्र, नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशन व सेंट्रल डिफेन्स अकॅडमी पुणे संघानी विजय मिळवला आहे. पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर झालेल्या क्लब ऑफ महाराष्ट्र विरुद्ध रायगड यांच्यातील सामन्यात क्लब ऑफ महाराष्ट्र संघानी रायगडच्या संघावर ५ गडी राखून विजय मिळवला आहे.



प्रथम फलंदाजी करतांना रायगडचा संघाने पहिल्या डावात सर्व गडी बाद १२० धावा काढल्या त्यामध्ये रायगडचा अष्टपैलू खेळाडू डावखुरा फलंदाज सागर मुळे यांनी सर्वाधिक ५३ धावा केल्या. क्लब ऑफ महाराष्ट्र कडून अंकित विश्वकर्मा व वैभव गोसावी यांनी प्रत्येकी ४ फलंदाज बाद केले. क्लब ऑफ महाराष्ट्र संघाने पहिल्या डावात फलंदाजी करतांना सर्व गडी बाद २२८ धावा काढल्या त्यामध्ये शुभम कटारे यांनी सर्वाधिक ५३ धावांची खेळी केली.रायगड कडून अमित कदम, कौस्तुभ म्हात्रे यांनी प्रत्येकी ३ अभिषेक खातू यांनी २ फलंदाज बाद केले. रायगडच्या संघाने दुसऱ्या डावात खेळताना १७९ धावांवर डाव घोषित केला त्यामध्ये प्रेम नाईक यांनी ५१ धावांची खेळी केली. क्लब ऑफ महाराष्ट्र संघाला जिंकण्यासाठी शेवटच्या दिवसाच्या अखेरच्या सत्रात ६९ धावांचे लक्ष ठेवले असता त्यांनी ५ गडी गमावत लक्ष पूर्ण करत सामना जिंकला रायगडकडून सागर मुळे यांनी ३ गडी बाद केले.

बेलापूर येथील सिडकोच्या मैदानावर झालेल्या सेंट्रल झोन विरुद्ध सेंट्रल डिफेन्स अकॅडमी पुणे यांच्यातील सामन्यात सेंट्रल डिफेन्स अकॅडमी पुणे संघानी सामना ९० धावांनी जिंकला आहे. पहिल्या डावात फलंदाजी करतांना सेंट्रल डिफेन्स अकॅडमी पुणे संघानी ८ गडी बाद ३४८ धावांवर डाव घोषित केला त्यामध्ये संकीर्ण पाटील यांनी १०८ धावा काढून शतक झळकावले. सेंट्रल झोन पहिला डाव सर्व गडी बाद २७१ त्यामध्ये पीयूष अष्टेकर ५१ सचिन लवेरा ५८ सेंट्रल डिफेन्स अकॅडमी कडून कुनाल त्रिपाठी ४ पीयूष कनोजिया यांनी ३ फलंदाज बाद केले, सेंट्रल डिफेन्स अकॅडमी संघाचा दुसरा डाव १५४ धावसंख्वर घोषित केला त्यामध्ये श्रेयस मिटकरी यांनी ९१ धावा काढल्या, सेंट्रल झोन संघाला जिंकण्यासाठी २३१ धावांची गरज असताना त्यांचा डाव १४१ धावांवर आटोपला.

गव्हाण उलवे येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर झालेल्या सामन्यात नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या संघाने वायएमसीए संघाने सामना ८ गडी राखून दिमाखात जिंकला आहे.

## सुस्मिताची सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून निवड

| पाली/गोमाशी | प्रतिनिधी |

ज्ञानेश्वर विद्यालय वडाळा, येथे महाराष्ट्र राज्य क्लासिक सीनियर, मास्टर १,२,३,४ पॉवर लिफ्टिंग स्पर्धा २१ व २२ फेब्रुवारी आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत २०० पेक्षा जास्त स्पर्धकांना सहभाग घेतला होता, या स्पर्धेत ठाण्याची खेळाडू सुस्मिता सुनील देशमुख हिने ५२ किलो वजनी गटात ३८० किलो वजन उचलून सुवर्णपदक पटकावले तसेच स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट बहुमान मानला जाणारा सर्वोत्कृष्ट महिला खेळाडू २०२६ पटकाविले. गेली ८ वर्ष सलग महाराष्ट्राची सर्वोत्कृष्ट खेळाडू पुरस्कार पटकाविले आहेत. ३१ जानेवारी २०२६ रोजी श्री कृष्ण खामकर विद्यालय, येथे ठाणे जिल्हा स्तरीय क्लासिक पॉवर लिफ्टिंग स्पर्धा संपन्न झाली



होती, त्या स्पर्धेत सुस्मिता सुनील देशमुख हिला सुवर्णपदक तसेच सलग ९ वर्ष सर्वोत्कृष्ट महिला खेळाडू ठाणे जिल्हा २०२६ मिळवत जोरदार कामगिरी केली. ठाण्याच्या रीओ फिटनेस व्यायाम शाळेत सराव करते तसेच प्रशिक्षक किरण देवीदास सनस, स्वप्निल पाटील यांच्या मदतीने या स्पर्धेत यश मिळविले यशाचे श्रेय रीओ जिम टीम, प्रशिक्षक, आई-वडील वंदना सुनील, देशमुख, सुनील देशमुख यांना दिले.

## गावदेवी धानकान्हेत रंगली बैलगाडी शर्यत

| खांब | प्रतिनिधी |

हौशी बैल गाडा शर्यत धानकान्हे रोहा यांच्या वतीने भव्य जिल्हास्तरीय बैलगाडा शर्यत धानकान्हे माती बंदर येथे संपन्न झाली. या स्पर्धेत संतोष गायकर आणि किशोर सावंत यांच्या बैलगाडीने बैलगाडी शर्यतीमधील आपला ठसा कायमच उमटवित ही स्पर्धा जिंकली आहे.

बैलगाडा शर्यतीचा शुभारंभ महेंद्र पोटफोडे, नरेंद्र जाधव, सुरज कचरे, राजेंद्र भादवकर, डॉ. श्यामभाऊ लोखंडे, धोंडू कचरे, पांडुरंग गोसावी, पांडूरंग कचरे, नामदेव देवकर, विश्वास राऊत आदींच्या हस्ते करण्यात आला. गावदेवी धानकान्हे माती बंदरावर रंगलेल्या बैल गाड्यांचा थरार पाहण्यासाठी हजोरोंच्या संख्येने हौशी रसिकांनी एकच गर्दी केली होती. तर स्पर्ध्येत सहभागी झालेल्या शंभरहून अधिक बैल गाड्यांच्या माध्यमातुन एकुण बारा गटातून सोडण्यात आलेल्या. बैल गाडा शर्यतींचा थरारचे समालोचन नंदकुमार मरवडे यांनी केले. बैलगाडा मालक धानकान्हे यांनी केले तर शर्यत यशस्वी करण्यासाठी नामदेव देवकर, आदेश गायकवाड निलेश देवकर, राजु जाधव, दिलीप गायकवाड, संजय आंबेतकर, आदी हौशी बैल गाडी मालक ग्रामस्थ धानकान्हे यांनी परिश्रम घेतले.

## इंग्लंडचे उपांत्य फेरीतील स्थान पक्के

| नवी दिल्ली| वृत्तसंस्था |

इंग्लंड टी-२० वर्ल्ड कप स्पर्धेच्या उपांत्य फेरीत जाण्याचा पहिला मान पटकावला. कर्णधार हॅरी ब्रूकच्या वादळी शतकाने पाकिस्तानची गोलंदाजांना झोडपले आणि एकट्याने सामना खेचून नेला. ब्रूकने ५१ चेंडूंत शतक पूर्ण करताना १० चौकार व ४ षटकार खेचला. टी-२० वर्ल्ड कप स्पर्धेत शतक झळकावणारा तो पहिला कर्णधार ठरला.

- **हॅरी ब्रूकचे विश्व विक्रमी शतक**
- **पाकिस्तान वर्ल्ड कप स्पर्धेतून बाहेर**

इंग्लंड सलग दोन विजयांसह उपांत्य फेरीत पोहोचला आहे आणि पाकिस्तानचे आव्हान जवळपास संपुष्टात आले आहे. लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडला पहिल्याच चेंडूवर शाहीन आफ्रिदीने धक्का दिला.

कर्णधार ब्रूकने पाकिस्तानी क्षेत्ररक्षकांची परीक्षा घेताना दिसला, त्याने चपळाईने दुहेरी धावांचा सिलसिला लावला. १७ व्या षटकात त्याने शाहीन आफ्रिदीला १७ धावा कुटल्या, परंतु पाकिस्तानी गोलंदाजानं शेवटच्या चेंडूवर ब्रूकचा



त्रिफळा उडवला. तो पर्यत त्याने आपले काम चोख पार केले होते.

ब्रूक ५१ चेंडूत १० चौकार व ४ षटकारासह १०० धावांवर बाद झाला. त्याने सामना १८ चेंडूत १० धावा एवढा जवळ आणला होता. विजयासाठी ५ धावा हव्या असताना विल जॅक्स (२८) त्रिफळाचीत झाला. जॅक्सने ब्रूकसह ३१ चेंडूत ५२ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली. मोहम्मद नवाजने १९ व्या षटकात दोन विकेट्स घेऊन सामन्यात रंगत आणली. जोफ्रा आर्चरने चौकार खेचून इंग्लंडचा २ विकेट्स राखून विजय पक्का केला.

## महिला विश्वचषकाचे वेळापत्रक जाहीर

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) महिलांच्या टी-२० विश्वचषक २०२६ चे वेळापत्रक जाहीर केले आहे. ही स्पर्धा इंग्लंडमध्ये १२ जून ते ५ जुलै २०२६ या कालावधीत होणार आहे. १२ संघ सहभागी होणार आहेत. भारताचा पहिलाच सामना पाकिस्तानविरुद्ध होणार असून, भारतीय महिला संघाला वनडे विश्वचषकानंतर टी-२० ट्रॉफी जिंकण्याची संधी आहे. स्पर्धेत दोन गटांत विभागणी झाली



असून, प्रत्येक गटातून दोन अव्वल संघ सेमीफायनलसाठी पात्र ठरतील. अंतिम सामना ५ जुलैला लॉर्ड्सवर होईल.

गट १ (ग्रुप) ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, भारत, पाकिस्तान, बांगलादेश, नेदरलँड्स गट २ (ग्रुप): वेस्ट इंडिज, इंग्लंड, न्यूझीलंड, श्रीलंका, आयर्लंड, स्कॉटलंड बांगलादेश, आयर्लंड, स्कॉटलंड आणि नेदरलँड्स हे संघ गेल्या महिन्यात नेपाळमध्ये झालेल्या पात्रता फेरीतून क्वालिफाय झाले आहेत. ही स्पर्धा ३३ सामन्यांची असून, एका दिवशी तीन सामने खेळवले जातील. भारतीय वेळेनुसार पहिला सामना दुपारी ३ वाजता, दुसरा संध्याकाळी ७ वाजता आणि तिसरा रात्री ११ वाजता होणार आहे. सर्व सामने संध्याकाळी ७ वाजता (स्थानिक वेळेनुसार) सुरू होणार आहेत.

### मुक्ताई कॅडमीचे बुद्धिबळपट्टू चमकले

**सावंतवाडी :** राष्ट्रीय बुद्धिबळपटू बाळकृष्ण पेडणेकर याने ले. कमांडर गोपाळ सुखटणकर यांच्या स्मरणार्थ पणजी-गोवा येथे आयोजित केलेल्या चौदाव्या राष्ट्रीय रॅपिड रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेत नववा क्रमांक पटकावला. पणजी, गोवा येथील मुष्टीफंड हायस्कूल पॅरेंट्स-टिचर्स असोसिएशन आणि तिसवाडी तालुका बुद्धिबळ असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

## २२ वर्षांनी बकनरंना उपरती

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

क्रिकेटच्या इतिहासात काही निर्णय असे असतात, जे वर्षानुवर्षे चाहत्यांच्या मनात कायम राहतात. भारताचा दिग्गज फलंदाज सचिन तेंडुलकर आणि वेस्ट इंडिजचे माजी पंच स्टीव्ह बकनर यांच्याशी संबंधित २००३-०४ मधील एक प्रसंग आजही चर्चेत आहे. तब्बल २२ वर्षांनंतर आता बकनर यांनी त्या वादग्रस्त निर्णयाबद्दल खंत व्यक्त केली आहे. ब्रिस्बेन येथे झालेल्या भारत-ऑस्ट्रेलिया कसोटी सामन्यात हा प्रसंग घडला होता. त्या वेळी आपल्या



कारकिर्दीच्या सर्वोच्च शिखरावर असलेला सचिन फलंदाजी करत होता. ऑस्ट्रेलियाचा गोलंदाज जेसन गिलेस्पीने टाकलेला चेंडू सचिनच्या पॅडला लागला आणि ऑस्ट्रेलियन खेळाडूंनी जोरदार अपील केले. अनुभवी पंच असलेल्या बकनर यांनी क्षणाचाही विलंब न करता बोट वर केलं. नंतरच्या रिप्लेमध्ये स्पष्ट दिसत होतं की चेंडू स्टम्पच्या वरून जात होता. त्या वेळी समालोचक टोनी ग्रेग यांनीही थेट प्रक्षेपणात हा निर्णय भयानक असल्याचं म्हटलं होतं. मैदानावर सचिनच्या चेहऱ्यावरचे भाव चाहत्यांना अजूनही आठवतात. आता ७९ वर्षीय बकनर यांनी एका मुलाखतीत कबूल केलं की तो निर्णय चुकीचा होता.

सहा राज्यांतील ३३७ जलतरणपटूंचा जल्लोष | चैतन्य, दीक्षा यादव ठरले वेगवान जलतरणपटू

# मुंबईच्या लाटांवर 'संक रॉक'चा महासंग्राम

| मुंबई | प्रतिनिधी |

'महाराष्ट्र स्टेट अमेच्युअर क्वेटिक असोसिएशनच्या वतीने आयोजित ऐतिहासिक '६२ वी संक रॉक ओशन स्विमॅथॉन २०२६' स्पर्धा जल्लोषात पार पडली. अथांग अरबी समुद्राच्या थरारक लाटांवर जिद्द, वेग आणि सहनशक्तीचा अफलातून संगम पाहायला मिळाला होता.

महाराष्ट्रासह ६ राज्यांतील तब्बल ३३७ जलतरणपटूंनी गेटवे ऑफ इंडियाच्या साक्षीने समुद्राला आव्हान दिले. त्यापैकी ३३० जलतरणपटूंनी हि स्पर्धा विक्रमी वेळेत पूर्ण केली. पुण्याच्या चैतन्य शिंदे आणि दीक्षा यादव यांनी सर्वात वेगवान जलतरणपटूचा किताब पटकावत स्पर्धेवर आपली ठसठशीत छाप उमटवली. आठ गटांमध्ये मुलं-मुली, पुरुष-महिला आणि दिव्यांग खेळाडूंनी लाटांवर वर्चस्व गाजवत जलतरणाचा खरा महोत्सव रंगवला.

पुरुष गटात पुण्याचा चैतन्य शिंदे ३९:१५ मिनिटांत सुवर्ण, सुरतचा युग अजय भाई सायलर ४०:०३ मि. रौप्य आणि नाशिकचा



वरद घनश्याम कुवर ४०:४९ मि. कांस्य. १६ ते २५ वर्षे (५ किमी) महिला गटात पुण्याची दीक्षा यादव ३९:३३ मिनिटांत सुवर्ण, तर सिंधुदुर्गची पूर्वा संदीप गावडे ४१:१६ मि. रौप्य आणि नागपूरची संजना सुनील जोशी ४३:२२ मि.

दिव्यांग गटात नाशिकची विभूती युवराज पाटील १२:५३ मि. प्रथम, नागपूरची मंत्रा पराग खुळे २६:०३ मि. द्वितीय, नाशिकची गार्गी तुषार कुवार २८:५४ मि. तृतीय. बेळगावचा स्कंद राहुल घाडगे १०:०९ मि. प्रथम, मुंबईचा आदि समित गोसार १०:३६ मि. द्वितीय, मुंबईचा ऋग्वेद दत्तात्रय सुर्वे १२:२८ मि. तृतीय क्रमांक

महिला गटात हुगळीची तुली बॅनर्जी ५०:४० मि. प्रथम, मुंबईची मृण्मयी भोईर १:१५:०४ द्वितीय, सोलापूरची दिपाली जक्कल १:२४:०७ तृतीय ठरली.

पुरुष गटात ठाण्याचा विवेक वामन शिसवे ४७:०६ मि. प्रथम, वडोदऱ्याचा पटेल जैमीन राजेश ५२:०७ मि. द्वितीय, मुंबईचा गौरांग अरविंद पटेल ५५:५९ मि. तृतीय.

४६ ते ५५ वर्षे (२ किमी) गटात महिला: आरती डागा १९:५९ मि. प्रथम, मुंबईची शीतल भागवत २३:०५ मि. द्वितीय, मुंबईची प्रिती चव्हाण ३७:०१ मि. तृतीय. पुरुष: मुंबईचा सुखबिंदर सिंग १७:११ मि. प्रथम, मुंबईचा अजित सदाशिव पवार १७:४२ मि. द्वितीय, पुण्याचा विकास जगन्नाथ देसाई १८:०० मि. तृतीय.

१२ ते १३ वर्षे (२ किमी) गटात रायगडचा क्रिश विजय कुठे १४:११ मि., अबीर मांडवकर १४:२१ मि., अभीर साळसकर १४:३२ मि.

बक्षीस वितरण खा. अरविंद सावंत, उदय देशपांडे, बाळ वाडवलिकर, बाळ तोरसकर यांच्या हस्ते पार पडला. स्पर्धा आयोजनात समीर शिरसेकर, युसुफ छोटेसरा, अरुण जगताप, कैलास आखाडे, नीलकंठ आखाडे, दिलीप कोळी, संतोष पाटील, इशिका पालकर, रूपाली रेपाळे, बरखा केडिया, छाया डोयले, किशोर वैद्य, घनश्याम कुवर, अजय फाटक, किशोर पालकर, डॉ. सचिन शिंदे, अनिल परसुरे, भास्कर कुलकर्णी यांनी मोलाचे योगदान दिले, असे सरचिटणीस राजेंद्र पालकर यांनी सांगितले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)